# महिलांचे हक्क व कल्याण समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

यवतमाळ व अकोला जिल्हा परिषद तसेच अमरावती महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच, त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ व अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, गोरेगांव, जि. अकोला येथे दिलेल्या भेटीसंदर्भाबाबतचा

# सातवा अहवाल

सत्यमेव जयते

**(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, मुंबई/नागपूर**

**२०१८**

# महिलांचे हक्क व कल्याण समिती

**(२०१७-२०१८)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

यवतमाळ व अकोला जिल्हा परिषद तसेच अमरावती महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच, त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ व अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, गोरेगांव, जि. अकोला येथे दिलेल्या भेटीसंदर्भाबाबतचा

# सातवा अहवाल

एचबी ३०८३–१

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**सन २०१७-२०१८**

**समिती प्रमुख**

(१) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(६) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(७) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(८) श्री. नारायण पाटील, वि.स.स.

(९) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.

(१०) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(११) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१५) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी

## महिलांचे हक्क व कल्याण समिती

## सन २०१६-२०१७

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.

(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.

(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.

(१५) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती माधवी सुर्वे, कक्ष अधिकारी

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| १ | **प्रस्तावना** | | (९) |
| २ | **अहवाल** | | १ |
| ३ | **यवतमाळ जिल्हा परिषद (प्रकरण १)** | | |
| | **१.१** | यवतमाळ जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | ३ |
| | १.२ | यवतमाळ जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक | ९ |
| | १.३ | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ | २२ |
| ४ | | **अकोला जिल्हा परिषद (प्रकरण २)** | |
| | २.१ | अकोला जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | २९ |
| | २.२ | अकोला जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक | ३२ |
| | २.३ | अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. गोरेगाव, जि. अकोला यांची साक्ष | ३७ |
| ५ | | **अमरावती, महानगरपालिका (प्रकरण ३)** | |
| | ३.१ | अमरावती महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | ४५ |
| | ३.२ | अमरावती महानगरपालिकेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक | ४८ |
| ६ | | **परिशिष्ट-"अ" - विभागाची माहिती** | ६१ |
| | | **परिशिष्ट-"ब" - शासन निर्णय** | ७१ |
| | | **परिशिष्ट-"क" - बैठकीचे उपस्थिती पट** | ९५ |

**प्रस्तावना**

मी, महिलांचे हक्क व कल्याण समितीची समिती प्रमुख, या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा सातवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**"यवतमाळ व अकोला जिल्हा परिषद तसेच अमरावती महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच, त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि.यवतमाळ व अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, गोरेगांव, जि.अकोला येथे दिलेल्या भेटी"** यासंबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले, त्यानुसार यवतमाळ जिल्हा परिषद, अकोला जिल्हा परिषद व अमरावती महानगरपालिके संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी यवतमाळ जिल्हा परिषद आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ व दिनांक २० ऑगस्ट, २०१५रोजी अमरावती, महानगरपालिका तसेच, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी अकोला जिल्हा परिषद आणि अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. दर्यापूर, जि. अकोला येथे भेटी दिल्या. जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सहकार व पणन विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, वित्त विभाग, सचिव, गृह विभाग यांची दिनांक ३० मे, २०१७ व दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्यासंदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार यवतमाळ जिल्हा परिषद तसेच, अकोला जिल्हा परिषद आणि अमरावती महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती, शासन निर्णय तसेच समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, महिला व बालविकास

विभाग, सह सचिव नगरविकास विभाग तसेच यवतमाळ जिल्हा परिषद, अकोला जिल्हा परिषद व अमरावती महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन,**
**मुंबई, दिनांक १२ मार्च २०१८.**

**डॉ. भारती लव्हेकर,**
समिती प्रमुख,
महिलांचे हक्क व कल्याण समिती.

**अहवाल**

**"यवतमाळ जिल्हा परिषद, अकोला जिल्हा परिषद, अमरावती महानगरपालिका"**

महिलांचे हक्क व कल्याण समितीने "यवतमाळ व अकोला जिल्हा परिषद तसेच अमरावती महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच, त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना" यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले त्यानुसार यवतमाळ जिल्हा परिषद, अकोला जिल्हा परिषद, अमरावती महानगरपालिका, यांच्याकडून प्रश्नावली संदर्भात माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी यवतमाळ जिल्हा परिषद आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा अंतर्गत शासकीय व माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि.यवतमाळव दिनांक २० ऑगस्ट,२०१५ रोजी अमरावती, महानगरपालिका तसेच, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी अकोला जिल्हा परिषद आणि अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, गोरेगाव, जिल्हा अकोला येथे भेटी दिल्या.यवतमाळ जिल्हा परिषद, अकोला जिल्हा परिषद तसेच अमरावती महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी,यवतमाळ, जिल्हा परिषद, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला, जिल्हा परिषद, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, नगरविकास विभाग यांची दिनांक ३० मे, २०१७ व दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीत उपस्थित झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

## १. यवतमाळ जिल्हा परिषद

### १.१ यवतमाळ जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबतः-

दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

शासकीय, निम शासकीय व शासन अनुदानीत सेवामधील भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या सेवामधील भरती करताना करण्यात येते काय? असल्यास, त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इ.बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी? जिल्हा परिषदेतील वर्ग १ ते ४ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक, अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती, त्यापैकी सन २०१४-२०१५ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली त्यामध्ये सवंर्गनिहाय महिला अधिकारी/कर्मचारी यांची संख्या किती आहे? उक्त मंजूर पदांपैकी १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहेत? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी यवतमाळ जिल्हापरिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली आहे.:-**

महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ अन्वये जिल्हा परिषदे अंतर्गत वर्ग, ३ व वर्ग, ४ च्या पदांकरिता सरळसेवा भरतीअंतर्गत महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षीत ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येते. सरळ सेवा भरतीसाठी जाहिरात देतांना रिक्त पदांच्या ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात येतात व महिला राखीव पदांसाठी प्राप्त आवेदन पत्रांनुसार पात्र उमेदवारांची वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयानुसार लेखी परीक्षा व तोंडी मुलाखत घेण्यात येऊन गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची जिल्हा निवड समिती, यवतमाळमार्फत निवड करण्यात येऊन भरतीची प्रक्रिया पुर्ण केली जाते.

महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय दिनांक २५ मे, २००१ अन्वये महिलांकरिता ३० टक्के आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती, खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रांची तपासणी मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षीत पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्र व त्यांची तपासणी तसेच शासन निर्णया सोबतचे परिशिष्ट, २ प्रमाणे खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता भरतीसाठी आरक्षित असलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी क्रिमीलेअर यामध्ये मोडत नसल्याबाबतचा प्रमाणपत्रांच्या नमुन्यांत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येते.

सदर शासन निर्णयानुसार महिलांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खूला प्रवर्ग यांच्यासाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष

आरक्षण असल्याने ते आडवे आरक्षण आहे. (कप्पीकृत आरक्षण) त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. तसेच भरती वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येते व महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येत नाही.

जिल्हा परिषद अंतर्गत मंजुर पदांपैकी वर्ग - ३ व ४ मधील महिलांकरीता आरक्षित करण्यात आलेली व भरण्यात आलेल्या पदाबाबत वर्षनिहाय भरती विवरणपत्र खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | भरती वर्ष | जाहीरात दिलेली एकुण रिक्त पद | जाहीरातीपैकी महिला आरक्षणाची रिक्त पदे | महिला आरक्षणापैकी पदे | महिला आरक्षणाची भरलेली पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०११ | १७७ | ५२ | ५० | २ |
| २. | २०१२ | – | – | – | – |
| ३. | २०१३ | १५८ | ४४ | ४३ | १ |
| ४. | २०१४ | १२१ | ३४ | २४ | १० |

वर्ग, १ व २ ची पदे शासनस्तरावरुन भरली जातात.जिल्हा परिषदेने स्वतंत्र सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. तथापि महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ नुसार कार्यवाही केली जाते.जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची एकूण मंजूर पदे ८९९१ आहेत त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या २६७४ आहे. शिक्षकांची पदे भरतांना महिलासाठी ३० टक्के आरक्षणानुसार भरण्यात आली आहेत पदोन्नती देतांना महिलांना आरक्षणाचा लाभ देण्याबाबत शासनाचे कोणतेही निर्देश नाहीत. तथापि सेवाज्येष्ठतेनुसार महिलांना पदोन्नती दिली जाते. तसेच तशा प्रकारे सेवाशर्ती आणि नियमावली मध्ये बदल करणेत आलेला नाही.

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

यवतमाळ जिल्हा परिषदेला दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने माध्यमिक शाळांकरिता ६०९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ९२ महिला शिक्षिका कार्यरत असल्याचे नमूद केले आहे. सदर पदे ३० टक्क्यांपेक्षा कमी असण्याची कारणे काय आहेत ? स्थापत्य अभियांत्रिकी सहायक संवर्गात सन २०१४ मध्ये १२ पैकी १० उमेदवारांची निवड करण्यात आली. परंतु सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने नियुक्ती देता आली नसल्याचे नमूद केले आहे. याचे कारण काय आहे ? माहे मे, २००१ पासून नोकरीत महिलांसाठी ३०% जागा राखून ठेवण्याचे बंधनकारक असताना त्यांचे तंतोतंत पालन का केले जात नाही? नसल्यास, त्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यवतमाळ जिल्हा परिषदेमार्फत गत वर्षी शिक्षण विभागाकरिता संच मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु, या संदर्भात स्थगिती देण्यात आली होती. आता स्थगिती उठविल्यामुळे आतापर्यंत शिक्षकाची पदे भरण्यात आली नव्हती. परंतु, आता रितसर जाहिरात देऊन ३० टक्के महिला शिक्षकांची पदे भरली जातील.

तसेच, गत वर्षी स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाच्या १२ जागा रिक्त होत्या, त्यापैकी १० उमेदवारांची निवड करण्यात आली. परंतु सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे उमेदवारांना नियुक्ती देता आली नाही. तसेच भटक्या जमाती (ड) संवर्गात एक पद महिलेकरिता राखीव होते. परंतु महिला उमेदवार उपलब्ध झाली नाही. ईएसबीसी मराठा करिता आरक्षण असलेल्या एक पदासंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदर पद भरलेले नाही, असे समितीस सांगितले.

समितीने मे, २००१ पासून महिलांकरीता ३० टक्के आरक्षण लागू झाले असल्यामुळे त्यांच्याकरीता सेवा प्रवेश नियमामध्ये तरतूद करणे आवश्यक नाही काय? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन स्तरावर सेवा प्रवेश नियम तयार केले जातात, असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ जिल्हा परिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली.**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या दिनांक २५ मे २००१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये महिला करीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेतील वर्ग, १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी कर्मचांरी यांची सन २०१०-११ व सन २०१४-१५ ची मंजुर पदे खालील प्रमाणे आहे :—

| अ.क्र | वर्ग | तांत्रिक | | | अतांत्रिक | | | एकुण महिला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर | कार्यरत | महिला | मंजुर | कार्यरत | महिला | |
| | | | | | सन २०१०-११ | | | |
| १ | वर्ग-१ | १३ | १० | ०० | २७ | २३ | १ | १ |
| २ | वर्ग-२ | २८५ | २२१ | ३७ | ४३ | २७ | ३ | ४० |
| ३ | वर्ग-३ | २०४४ | १५८० | ६०२ | ९१९३ | ८९०३ | २७१४ | ३३१६ |
| ४ | वर्ग-४ | ०० | ०० | ०० | ९८५ | ७९६ | १९४ | १९४ |
| | **एकूण** | **२३४२** | **१८११** | **६३९** | **१०२४८** | **९७४९** | **२९१२** | **३५५१** |

| अ.क्र | वर्ग | तांत्रिक | | | अतांत्रिक | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर | कार्यरत | महिला | मंजुर | कार्यरत | महिला | महिला |
| | | | | | सन २०१४-१५ | | | |
| १ | वर्ग-१ | १३ | १० | १ | २७ | २४ | १ | २ |
| २ | वर्ग-२ | २८५ | २१५ | ३९ | ४३ | २१ | २ | ४१ |
| ३ | वर्ग-३ | १९९६ | १५८४ | ६३१ | ९४१० | ८८८१ | २७८५ | ३४१६ |
| ४ | वर्ग-४ | ०० | ०० | ०० | ९८५ | ९१८ | २४० | २४० |
| | **एकूण** | **२२९४** | **१८०९** | **६७१** | **१०४६५** | **९८४४** | **३०२८** | **३६९९** |

जिल्हा परिषद अंतर्गत मंजुर पदांपैकी वर्ग - ३ व ४ मधील महिलांकरीता आरक्षित करण्यात आलेली व भरण्यात आलेली पदाबाबत भरती वर्षनिहाय विवरणपत्र खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | भरती वर्ष | जाहीरात दिलेली एकुण रिक्त पदे | जाहीरातीपैकी महिला आरक्षणाची पदे | महिला आरक्षणापैकी भरलेली पदे | महिला आरक्षणाची रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०११ | १७७ | ५२ | ५० | २ |
| २ | २०१२ | – | – | – | – |
| ३ | २०१३ | १५८ | ४४ | ४३ | १ |
| ४ | २०१४ | १२१ | ३४ | २४ | १० |

वर्ग, १ व २ ची पदे शासनस्तरावरुन भरली जातात. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ अन्वये जिल्हा परिषदेअंतर्गत वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांकरीता सरळसेवा भरती अंतर्गत महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षीत ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यांत येते. सरळ सेवा भरतीसाठी जाहिरात देतांना रिक्त पदांच्या ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षीत ठेवण्यांत येतात व महिला राखीव पदांसाठी प्राप्त आवेदनपत्रांनुसार पात्र उमदवारांची वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयानुसार लेखी परीक्षा व तोंडी मुलाखत घेण्यात येऊन गुणानुक्रमे पात्र उमेदवरांची जिल्हा निवड समिती, यवतमाळ मार्फत निवड करण्यात येऊन भरतीची प्रक्रिया पुर्ण केली जाते.

महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ अन्वये महिलांकरीता ३० टक्के आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती, खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रांची तपासणी मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील

महिलांच्या आरक्षीत पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्र व त्यांची तपासणी तसेच शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट २ प्रमाणे खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता भरतीसाठी आरक्षीत असलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी क्रिमीलेअर यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रांच्या नमुन्यात प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात येते.

सदर शासन निर्णयानुसार महिलांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांच्यासाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण/ विशेष आरक्षण असल्याने ते आडवे आरक्षण आहे. (कप्पीकृत आरक्षण) त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. तसेच भरती वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येते व महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येत नाही. जिल्हा परिषदेने स्वतंत्र सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. तथापि, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ नुसार कार्यवाही केली जाते.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

यवतमाळ जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी यवतमाळ जिल्हापरिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली.

सन २०१५-२०१६ ची ऑनलाईन संच मान्यता अप्राप्त होती त्यामुळे समितीला शासनाकडून मंजूर पायाभूत ६०९ पदाची माहिती सादर करण्यात आली होती. परंतु, सदर भेटीनंतर ३० सप्टेंबर, २०१५ च्या पटसंख्येनुसार जरी यवतमाळ जिल्ह्यातील माध्यमिक शाळाकरिता ६०९ पदे मंजूर असली तरी सन २०१५-१६ ची ऑनलाईन संच मान्यतेनुसार विद्यार्थी पटसंख्येप्रमाणे विविध संवर्गाची फक्त ३०३ पदे मंजूर होती. या ३०३ मंजूर पदापैकी सर्व संवर्गाची २८२ पदे कार्यरत होती. या २८२ पदापैकी इयत्ता ६ ते ८ करीता ९२ निम्न श्रेणी महिला शिक्षिका, इयत्ता ९ ते १० वी करीता ४३ उच्च श्रेणी महिला शिक्षिका व इयत्ता ११ वी ते १२ वी करीता ३ कनिष्ठ महाविद्यालयीन महिला शिक्षिका कार्यरत होत्या. उत्तरामध्ये ९२ निम्नश्रेणी संवर्गातील महिला शिक्षकांचा उल्लेख झालेला आहे. उर्वरित ४३ उच्च श्रेणी महिला शिक्षिका व ३ कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षिका मिळून एकूण १३८ महिला शिक्षिका होत्या. मंजूर पदे ३०३ पैकी १३८ महिला शिक्षिका कार्यरत म्हणजे ४५.५% प्रमाण आहे.

जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व खाते प्रमुखांना ३० टक्के महिला आरक्षणाचे अनुषंगाने स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यापासून त्यामध्ये व्यवस्थीतपणे नोंदी घेऊन अद्यावत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीने दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी जिल्हापरिषदेस भेट देऊन साक्ष घेतली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यवतमाळ यांनी साक्षीच्या वेळी जिल्हापरिषदेमध्ये महिला उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग १ ते ४ मधील अनेक पदे रिक्त असल्याचे तसेच, जिल्हापरिषदेकडील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत तसेच, याबाबत सेवाशर्ती आणि नियमावलीमध्ये बदल करण्यात आला आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यवतमाळ यांनी शासन निर्णयानुसार महिलांकरीता भरतीसाठी आरक्षित असलेल्या ३० टक्के जागा भरण्यात येतात. तसेच, जिल्हापरिषदेने स्वतंत्र सेवा प्रवेश नियम तयार केलेले नसून महाराष्ट्र जिल्हापरिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ नुसार याबाबत कार्यवाही केली जाते असे समितीला सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यवतमाळ यांनी समितीला असेही सांगितले की, जिल्हापरिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची एकूण मंजूर पदे ८१९१ आहेत त्यापैकी महिला शिक्षकांची संख्या २६७४ आहे. शिक्षकांची पदे भरताना महिलांसाठी ३० टक्के आरक्षणानुसार भरण्यात आलेली आहेत आणि पदोन्नती देताना महिलांना आरक्षणांचा लाभ देण्याबाबत शासनाचे कोणतेच निर्देश नाहीत, तसेच सन २०१५-१६ ची ऑनलाईन संच मान्यता अप्राप्त असल्यामुळे समितीला शासनाकडून मंजूर पायाभूत ६०९ पदांची माहिती सादर करण्यात आली होती, यापैकी ऑनलाईन संच मान्यतेनुसार विद्यार्थी पटसंख्येप्रमाणे विविध संवर्गाची फक्त ३०३ पदे मंजूर होती. सदरहू ३०३ मंजूर पदांपैकी १३८ महिला शिक्षिका सद्यस्थितीत कार्यरत आहेत.

साक्षीच्या वेळी समितीला दिलेल्या लेखी व मौखिक माहिती नुसार ज्या उद्देशाने शासनाने महिलांचे नोकऱ्यांमधील प्रतिनिधीत्व वाढावे यासाठी नोकर भरतीत ३० टक्के जागांचे आरक्षण मंजूर केले आहेत. त्यांची अंमलबजावणी जिल्हापरिषदेकडून होत नसल्याचे समितीला प्रकर्षाने दिसून आले. प्राथमिक व माध्यमिक शाळांकरीता मंजूर पदांपैकी केवळ ४५.५ टक्के इतक्या प्रमाणातच महिलांची पदे भरण्यात आली असल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, **सदरहू पदे भरण्याबाबत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यवतमाळ आणि विभागीय सचिव यांना शासन निर्णयानुसार यापुढे कोणत्याही परिस्थितीमध्ये महिलांना पद भरतीमध्ये ३० टक्के आरक्षणाची पुर्तता जिल्हा परिषदेकडून करून घेऊन याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यात समितीला पाठविण्यात यावा.**

**यासंदर्भांत विभागीय साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे पदोन्नतीमध्ये आरक्षण हे महिलांना भरती झाल्यानंतर त्यांच्या ज्येष्ठता आणि पात्रता या सुत्रानुसार मिळणारच आहे. या गृहितकावर निष्कर्ष करणे समितीला पटत नाही. कारण ज्या अर्थी शासनाने ३० टक्के राखीव**

**जागांचे धोरण अवलंबिले आहे, त्याअर्थी पदोन्नती मध्ये देखील महिलांना त्याचप्रमाणात पदोन्नती मिळणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत आहे. जिल्हापरिषदेतील रिक्त जागांची परिस्थिती पाहता मोठ्या प्रमाणावर अनेक विभागामध्ये रिक्त पदे असल्याने तिचा प्रशासकीय क्षमतेवर तसेच अस्तित्वात असलेल्या कर्मचारी / अधिकाऱ्यांवर ताण पडतो ही वास्तविकतः आहे. ही बाब विचारात घेता मंजूर पदे तातडीने भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेने प्रस्तावाद्वारे विभागाकडे पाठविली असल्याने विभागाने या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन यवतमाळ जिल्हा परिषदेसंदर्भातील भरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. तसेच पदोन्नतीमध्ये ३० टक्के आरक्षण देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे याबाबतचा पाठपुरावा करून याप्रकरणी अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयाचा, उच्च न्यायालयातील निर्णयाचा तसेच मा. सर्वोच्च न्यायालयातील विविध निर्णयांचा सखोल अभ्यास करुन त्याद्वारे महिलांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी तसेच, या जिल्हापरिषदेत महिलांकरिता रिक्त असलेली आरक्षणाची पदे तात्काळ भरण्यात यावीत व यापुढे कोणत्याही परिस्थितीत महिलांकरिता राखीव असलेली पदे रिक्त राहणार नाहीत याची संबंधितांनी दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**१.२ यवतमाळ जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक -**

समितीने जिल्हापरिषदेचे गत ३ वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे? उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हापरिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनासांठी राखून ठेवण्यात आली आहे? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशाहीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणाऱ्या सोयी-सवलती इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी? तसेच, उक्त योजनांवर गत ३ वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला? जिल्हापरिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती इ. बाबतची माहिती देण्यात यावी. तसेच, या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यत पोहचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हापरिषदांकडे आहे काय? जिल्हापरिषद निधीतून महिलांशी संबधित कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते काय? हा निधी महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवला असल्यास, गत ३ वर्षात कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी? महिलांच्या आरोग्याबाबत जिल्हापरिषदेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती द्यावी? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी यवतमाळ जिल्हापरिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

जिल्हापरिषदेचे वर्षनिहाय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.

१) सन २०१२-१३ चे एकूण अंदाजपत्रक - रु.६,९६,१५,४५०/-

२) सन २०१३-१४ चे एकूण अंदाजपत्रक - रु.१०,४०,४९,७०८/-

३) सन २०१४-१५ चे एकूण अंदाजपत्रक - रु.७,८२,८४,७६९/-

एकूण अंदाजपत्रकाच्या ६ बाबींवरील रकमेच्या १० टक्के रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी खालील प्रमाणे राखून ठेवण्यात येते.

१) सन २०१२-१३ रु.६,६९,१०,९६४/- च्या १० टक्के रक्कम रु. ५६,३१,०००/-

२) सन २०१३-१४ रु.३,३५,००,०००/- च्या १० टक्के रक्कम रु. ९८,२०,०००/- अनुशेषासह

३) सन २०१४-१५ रु.२,७०,००,०००/- च्या १० टक्के रक्कम रु. १,१९,००,०००/- अनुशेषासह

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत महिलांचे बलशालीकरण करण्याकरिता महिलांचे स्वयंसहायत समूह स्थापन करण्यात येऊन त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाकरिता, खेळते भांडवल व बँकेमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिला जातो. तसेच स्वयंसहायत समुहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते.

**महिला व बाल विकास विभाग.**

१. ग्रामीण भागातील इयत्ता ७वी ते १०वी चे शिक्षण घेतलेल्या मुलींना व महिलांना संगणक प्रशिक्षण देणे.

२. महिला समुपदेशन केंद्रामार्फत पिडीत महिलांना मोफत कायदेशीर सेवा पुरविणे.

३. स्तनदा व गरोदर मातांना अतिरिक्त आहार, पौष्टिक आहार पुरविणे.

४. ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिलाई मशीन पुरविणे.

५. इयत्ता ५ वी ते १२वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत सायकल पुरविणे.

६. इयत्ता ८ वी ते १०वी च्या मुलींसाठी स्वसंरक्षणासाठी ज्युडो कराटेचे प्रशिक्षण आयोजित करणे.

७. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिला व मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करणे.

८. किशोरवयीन मुलींसाठी जीवनकौशल्यविषयक तज्ज्ञ मार्गदर्शकामार्फत जेंडर प्रशिक्षण आयोजित करणे.

९. पंचायत राज महिला शक्त अभियान अंतर्गत महिला सदस्य यांचे प्रशिक्षण राबविणे.

१०. महिला पदाधिकाऱ्यांसाठी अभ्यास दौरा आयोजित करणे.

११. महिलांसाठी १०२ टोल फ्री नं. वर तक्रार करू शकतात.

जिल्हापरिषद निधीतून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलतींचा लाभ महिलांना देण्यात येतो. सदर योजनांना महिला व बाल कल्याण समिती, जिल्हापरिषद

यवतमाळमार्फत राबविण्यात मंजुरी देण्यात येते. त्यानुसार प्रकल्पस्तरातून गरजू महिलांचे प्रस्ताव मागविण्यात येऊन सदर प्रस्तावांना समिती मार्फत मंजुरी घेऊन लाभ देण्यात येतो.

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**१.० जननी सुरक्षा योजना :**

जननी सुरक्षा योजनाकरिता पात्र लाभार्थी ठरविण्याबाबतचा निष्कर्ष -

१. दिनांक ८ मे २०१३ पासून अपत्य आणि वय याबाबत कोणतीही अट नाही.

२. फक्त लाभार्थी बीपीएल, एससी आणि एसटी या कुंटूबातील असणे आवश्यक आहे.

३. घरी प्रसूती झाल्यास मातेस रु. ५००/- लाभ दिला जातो.

४. प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा उपकेंद्रात प्रसूती झाल्यास रु. ६००/- लाभ दिला जातो.

५. ग्रामीण व उप जिल्हा रुग्णालय येथे प्रसूती झाल्यास रु. ६००/- लाभ दिला जातो.

**कुटूंब कल्याण कार्यक्रम -**

कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत स्त्री शस्त्रक्रिया, प्रसुतीपश्चात शस्त्रक्रिया व पुरुष शस्त्रक्रिया यांच्या चालू वर्षासाठी जिल्हानिहाय व महानगरपालिकानिहाय अपेक्षित कामाची संख्या, या कार्यक्रमांतर्गत स्त्री शस्त्रक्रिया लाभार्थीना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील लाभार्थी व प्रवर्गाप्रमाणे मोबदला दिला जातो. तसेच पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया लाभार्थीस देखील मोबदला दिला जातो. या मोबदल्याबाबत व इतर आनुषंगिक खर्चाबाबत शासन परिपत्रक क्र. कुनिशा-२००७/प्र.क्र.१९७/०७/ कु.क.१/मंत्रालय, मुंबई, दिनांक २० डिसेंबर, २००७ नुसार सुचना दिलेल्या आहेत.

१. **मानव विकास मिशन कार्यक्रमाअंतर्गत गर्भवती महिलांना बुडीत मजुरी देणे -**

महिला करीता योजना अ जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत पुसद, उमरखेड, महागाव, आर्णी, कळंब घाटंजी पांढरकवडा, झरी आणि मारेगाव या तालुक्याचा समावेश असून त्या अंतर्गत ३८ प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. मानव विकास मिशन अंतर्गत महिला डॉक्टर कडून गर्भवत महिलांची तपासणी व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची तपासणी शिबीर घेण्यात येते. या वर्षात ३५१ शिबीरे घेण्यात आली असून त्यात गरोदर माता १२४३४, स्तनदा माता ८४८० व ० ते ६ महीने बालके १००६५ ची तपासणी करण्यात आली व औषधोपचार देण्यात आला. त्यासाठी खर्च रुपये ५७,७७,२४६/- एवढा करण्यात आला तसेच गरोदर मातेला बुडित मजुरी म्हणून ९ महिन्यात रु. २,०००/- व प्रसुतीनंतर रु. ४,०००/- देण्यात येते, या वर्षात एकूण १०९६५ मातांना लाभ देण्यात आला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत वर्षनिहाय व योजनेनिहाय खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| वर्ष | स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना (लाखात) | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनान्नती अभियान (लाखात) | |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ७५३.६२ | - | २४.२३ |
| २०१३-१४ | - | २००.९८ | १९०.०५ |
| २०१४-१५ | - | ३४५.५१ | ६२२.९२ |

**महिला बाल विकास विभाग - आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना (TSP/ OTSP/SCP)**

| वर्ष | योजनेचे नाव | झालेला खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | अंगणवाडी केंद्राना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत दरीपंजी पुरविणे. | २१०९५५१ | १४२७ अंगणवाडी |
| २०१३-१४ | मुलींना महिलांना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण (Gender) | १०६६८५२ | १८०० |
| | १० वी, १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT) देणे | ४२८४० | १८ |
| | अंगणवाडी केंद्राना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत ट्रेचे वजनकाटे पुरविणे. | ६९८६०० | ४९९ अंगणवाडी |
| | मुलींना व महिलांना व्यावसायीक प्रशिक्षण देणे | १५९६९४८ | ८७६ |
| २०१४-१५ | इ. ५ ते १२ पर्यंत शिकणाऱ्या मुलीना मोफत सायकल पुरविणे. | १४९६६६५ | ४२१ |
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रे पुरविणे | २२४७७५० | ७५० अंगणवाडी |

**महिला बाल विकास विभाग - जि.प. सेस (१०%)**

| वर्ष (१) | योजनेचे नाव (२) | झालेला खर्च (३) | लाभार्थी संख्या (४) |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | मुलींना महिलांना जिवन कोशल्याचे प्रशिक्षण (Gender). | २७५९९१० | ५२५० |
| | १० वी, १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT) देणे. | १९९०८० | ७९ |
| | महिला समुपदेशन केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत झोळीचे वजनकाटे पुरविणे | ३०७००० | ४ केंद्र |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत झोळीचे वजनकाटे पुरविणे. | २१५८२०० | १६३५ अंगणवाडी. |
| | जि.प. स्वर्ण जयंती निमीत्त महिला मेळाव्याचे आयोजन | १०००० | १ प्रकल्प |
| २०१३-१४ | ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना सौंदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणे. | ५९८२८५ | ३२६ |
| | १० वी, १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT). | ५३९२८० | २१४ |
| | महिला समुपदेशन केंद्रांना मानधन देणे | ४३४००० | ४ केंद्रे |
| | अंगणवाडी केंदांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत ट्रेचे वजनकाटे पुरविणे. | ९९९६०० | ७१४ अंगणवाडी. |
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रे पुरविणे. | २६९८६७५ | ७०१ अंगणवाडी |
| | अंगणवाडी मध्ये गरोदर व स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे प्रोटीन बिस्कीट. | १४३५९९५ | ३९४५० |
| | मुलींना महिलांना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण (Gender). | १८३२१०१ | ३१०० |
| २०१४-१५ | मुलींना संरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण | ३७२०२० | १५५१ |
| | १० वी, १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT). | ५९९६५० | १७९ |
| | ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिवण काम प्रशिक्षण देणे. | ९९९६६६ | १४०६ |
| | महिला समुपदेशन केंद्रांना मानधन देणे | ९३८००० | ४ केंद्रें |
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रे पुरविणे. | २४९९४९८ | ८३४ |
| | इ. ५ ते १२ वीपर्यत शिकणाऱ्या मुलींना मोफत सायकल पुरविणे | १४९६६५५ | ४२१ |
| | महिला जि.प. सदस्य व पदाधिकाऱ्यांना अभ्यास दौरा. | ५००००० | २९ |
| | मुलींना महिलांना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण (Gender). | ९९९९१० | ६२१८ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | ग्रामिण भागातील महिलांना व मुलींना शिलाई मशिन पुरविणे. | ९९९१२० | २३६ |
| | आदर्श अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका पुरस्कार. | १००००० | ३२ |
| | पंचायत राज महिला शक्ती अभियान अंतर्गत महिला सदस्य यांचे प्रशिक्षण यशदाच्या तज्ञ प्रशिक्षकामार्फत जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रशिक्षण राबविण्यात आले. | ५९०४१९ | ३७२७ |

| योजनेचे नाव | वर्ष | प्राप्त तरतूद | झालेला खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| निराधार विधवा महिलांच्या मुलींच्या विवाह | २०१२-१३ | ३०००० | २२००० | ११ |
| करिता अनुदान रु.२०००/- प्रति महिलाना | २०१३-१४ | २८०० | २४००० | १२ |
| लाभ देण्यात येतो. | २०१४-१५ | – | – | – |

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**योजनेचे नावः-**

**१. जननी सुरक्षा योजना :**

| सन | मंजूर पीआयपी | लाभार्थ्यांना दिलेला लाभ | टक्केवारी | एकूण लाभार्थी संख्या (उद्दिष्ट) | एकूण लाभ दिलेले लाभार्थी (साध्य) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | १२०.०१ | १३४.७५ | ११२.२८% | १३२७१ | १३५९५ | १०२% |
| २०१३-२०१४ | १७८.९१ | १८८.०९ | १०५.१३% | १९६०९ | १४६६४ | ७५% |
| २०१४-२०१५ | २१६.०७ | २०५.३४ | ९५% | १९०२२ | १४६४० | ७७% |

**२. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कार्यक्रम :**

| सन | मंजूर पीआयपी | लाभार्थ्यांना दिलेला लाभ | टक्केवारी | एकूण लाभार्थी संख्या (उद्दिष्ट) | एकूण लाभ दिलेले लाभार्थी (साध्य) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | १३१.८२ | १३८.३१ | १०४.९२% | १५५०० | १६३८८ | १०६% |
| २०१३-२०१४ | १४१.८७ | १३०.५९ | ९२.०५% | १५६०० | १५८०४ | १०१% |
| २०१४-२०१५ | १२७.७० | १२०.७७ | ९५% | १५७३९ | १४७२५ | ९४% |

**३. आशा स्वयंसेविका कार्यक्रम :**

| सन | मंजूर पीआयपी | लाभार्थ्यांना दिलेला लाभ | टक्केवारी | एकूण आशा संख्या (उद्दिष्ट) | एकूण आशा (साध्य) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | १०४.०५ | १२५.४७ | १२०.५८% | २२९५ | २२३० | ९७% |
| २०१३-२०१४ | १७७.७६ | १७१.५३ | ९६.५०% | २२९५ | २२४० | ९७% |
| २०१४-२०१५ | ३३६.१६ | ३३४.०३ | ९९% | २२९५ | २२५५ | ९८% |

**४. मातृत्व अनुदान योजना : (नव संजीवन अंतर्गत)**

| सन | मंजूर पीआयपी | लाभार्थ्यांना दिलेला लाभ | टक्केवारी | एकूण लाभार्थी (उद्दिष्ट) | एकूण लाभार्थी (साध्य) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | २०.०० | १२.५० | ६२% | ३१२५ | ३१२५ | १००% |
| २०१३-२०१४ | २०.०० | १३.२६ | ६६% | ३३१५ | ३३१५ | १००% |
| २०१४-२०१५ | १८.०० | ११.८८ | ६६% | २९७१ | २९७१ | १००% |

**महिला व बाल विकास विभाग-**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१३/प्र.क्र.७६/पंरा-१, दिनांक २४ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठीच्या योजना महिला व बालकल्याण समितीमार्फत खालील नमूद केलेल्या योजना राबविण्यात येतात.

अ.क्र. योजनेचे नाव

(१) मुलींना संरक्षणासाठी ज्युडो कराटे प्रशिक्षण

(२) १० वी १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT) देणे

(३) ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिवण काम प्रशिक्षण देणे

(४) महिला समुपदेशन केंद्रांना मानधन देणे

(५) अंगणवाडीकेंद्राना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रे पुरविणे

(६) अंगणवाडी मध्ये गरोदर व स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे प्रोटीन बिस्कीट

(७) इ.५ ते १२ पर्यंत शिकणाऱ्या मुलींना मोफत सायकल पुरविणे.

(८) महिला जि.प.सदस्य व पदाधिकाऱ्यांना अभ्यास दौरा

(९) मुलींना महिलांना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण (Gender)

(१०) ग्रामिण भागातील महिलांना व मुलींना शिलाई मशिन पुरविणे

(११) आदर्श अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका पुरस्कार

(१२) पंचायत राज महिला शक्ती अभियान अंतर्गत महिला सदस्य यांचे प्रशिक्षण राबविणे.

तसेच योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी पंचायत स्तरावर जनजागृती, महिला मेळावे, चित्ररथ, वर्तमान पत्रातून प्रसिद्धी, ग्रामसभा किशोर वयीन मुलींना व महिलांना जेंडर प्रशिक्षणाचे माध्यमातून सदर योजना महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका व ग्राम पंचायत मार्फत महिलांपर्यंत माहिती पोहचविण्याचे काम केले जाते.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या मार्फत महिलांसाठी पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.

- जननी सुरक्षा योजना :- (JSY) ग्रामीण भागातील महिलांसाठी जननी सुरक्षा योजना राबविणेत येत आहे. या योजनेअंतर्गत मातेचे संस्थेत बाळंतपण झाल्यास रु.७०० व घरी प्रसुती झाल्यास रु.५०० बाळंतपणानंतर ७ दिवसाच्या आत देणेत येतात.

- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम : (JSSK) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमांतर्गत माता गरोदर राहिले पासून ते प्रसूतीनंतर ३० दिवसपर्यंत सर्व संदर्भ सेवा व औषधी उपचार हा संपूर्ण मोफत देणेत येतो.

- मातृत्व अनुदान योजना :- या योजनेअंतर्गत मातेला गरोदर पणात रु.४०० चे रोख अनुदान व रु.४०० चे औषधी पुरविणेत येतात.

- मानव विकास मिशन :- मानव विकास मिशन गरोदर पणात रु.४०० चे रोख अनुदान व रु.४०० चे औषधी पुरविणेत येतात.

- सावित्री बाई कन्या कल्याण योजना :- दारिद्रय रेषेखालील कुटूंबाने जर १ मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास मुलीच्या नावे रु.८००० चे बचत पत्र व रु.२००० रोख देणेत येतात. तसेच दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास रु.४००० चे बचत पत्र प्रत्येकीच्या नांवे व रु.२००० स्वरुपात देणेत येतात. (मुलगी १८ वर्षे वयाची होईपर्यंत.)

- नवजात बालकाची घरच्या घरी घ्यावयाची काळजी (एच.बी.एन.सी.) माता मृत्यू व बाल मृत्यू दर कमी करणे साठी आशा स्वयंसेविकामार्फत नवजात बालकाची व प्रसूती मातेची ४५ दिवसापर्यंत सर्व आरोग्य विषयक देखरेख करणेत येते. त्यासाठी आशा कार्यकर्त्यांना रु.२५० प्रति माता मानधन अदा करणेत येते.

- राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम : प्रत्येक प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय येथे किशोरवयीन मुलांमुलींसाठी स्वतंत्र क्लिनीक घेणेत येते, त्यांच्या सर्व समस्या अडचणी किशोरवयीन मुलांमुलींसाठी घ्यावयाची काळजी, वयात येतांना होणारे बदल इ.बाबत औषधोपचार व समुपदेशन करणेत येते.

- जनजागृती :
  - सदर योजनांची माहिती मातेला व जनतेला होण्यासाठी आरोग्य विभागामार्फत सर्व गावांना चित्ररथ, स्थानिक भाषेतील कलापथक, मोठ्या यात्रा, बाजार इ. ठिकाणी आरोग्य प्रदर्शन करुन योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणेत आली आहे.
  - जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर योजना हाताळणाऱ्या कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण घेणेत आले आहे.
  - आशा स्वयंसेविका मार्फत योजना ही प्रत्येक मातेपर्यंत पोहोचविणेत आली आहे. त्याबाबत सर्व आशांना योजनेविषयी माहिती कशी द्यावी याचे प्रशिक्षण देणेत आले आहे.
  - आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत माता बैठका, बचत गटांचा सहभाग, ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी ग्रामस्थांना माहिती देणेत येते.
  - आरोग्यविषयक विविध दिन साजरे करुन जनजागृती करणेत येते.

आकाशवाणीच्या माध्यमातुन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी, साथरोग अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, जिल्हा सार्वजनिक आरोग्य पारिचारीका यांच्या मार्फत जनजागृती करणेत येते.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका यांच्या मार्फत जिल्हापरिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा वेळोवेळी व आवश्यकतेनुसार पर्यवेक्षिय यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येते. तसेच ग्राम सभा. पंचायत समिती सभा, महिला बाल कल्याण समिती सभा, जिल्हापरिषद सर्वसाधारण सभा या सभामध्ये योजनांचा वेळोवेळी आढावा घेतला जातो व मुल्यामापन केले जाते.

राबविण्यात आलेल्या योजनांचे समाजकार्य महाविद्यालयामार्फत सामाजिक अंकेक्षण करण्यात येत आहे. सदर सामाजिक अंकेक्षणाचे निकष समाजकार्य महाविद्यालयाचे तज्ज्ञ प्राध्यापक ठरवितात.जिल्हा नियोजन समिती मार्फत शासनाचे वेगळे अनुदान मिळते.

**महिला बाल विकास विभाग – आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना (TSP/ OTSP/SCP)**

| वर्ष | योजनेचे नाव | झालेला खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत दरीपंजी पुरविणे. | २१०७६२८ | १४२७ अंगणवाडी |

| वर्ष | योजनेचे नाव | झालेला खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | मुलींना महिलांना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण (Gender) | १०६६८५२ | १८०० |
| | इयत्ता १० वी व १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT) देणे. | ४२८४० | १८ |
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत ट्रेचे वजनकाटे पुरविणे मुलींना व महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे. | ६९८२०९ | ३८३ |
| २०१४-२०१५ | इयत्ता ५ वी ते इयत्ता १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना मोफत सायकल पुरविणे. | १४९६८३५ | ४२१ |
| | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे योजने अंतर्गत जलशुद्धीकरण यंत्रे पुरविणे. | २२४७७५० | ७५० अंगणवाडी |

| योजनेचे नाव | वर्ष | प्राप्त तरतूद | झालेला खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| निराधार विधवा महिलांच्या मुलींच्या विवाह | २०१२-१३ | २२००० | २२००० | ११ |
| करिता अनुदान रु.२,००० प्रति महिलांना | २०१३-१४ | २४००० | २४००० | १२ |
| लाभ देण्यात येतो. | २०१४-१५ | – | – | – |

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

यवतमाळ जिल्हापरिषदेला दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली आहे? ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिवण काम प्रशिक्षण देण्यासाठी १० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे आणि रु.९,९९,६६६ रुपये खर्च झालेला असल्याचे नमूद केलेले असून १४०६ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी रु.९,९९,६६६ रुपये खर्च झालेला आहे. मग प्रती लाभार्थी किती खर्च झालेला आहे? महिलांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले आहे काय? इयत्ता १० वी व १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (एमएससीआयटी) दिलेले आहे काय? लाभार्थ्यांना कोणत्या कंपनीच्या सायकलचे वाटप करण्यात आले आहे काय?अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यवतमाळ जिल्ह्यात सन २०१२-१३ मध्ये रु.५६,६०,२०० सन २०१३-१४ मध्ये १ कोटी ३ लाख ४४ हजार रुपये तरतूद करण्यात आली होती. यामध्ये १० टक्के अनुशेष होता. मागील वर्षी महिला व बाल कल्याणासाठी १ कोटी १५ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. यावर्षी आम्ही महिला व बाल कल्याणासाठी १ कोटी ५५ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे मार्च

महिन्यापर्यंत अनुशेष राहणार नाही. आम्ही २ वर्षांत अनुशेष भरुन काढलेला आहे. आम्ही २३६ महिलांना शिलाई मशिनचे वाटप केलेले आहे. त्यांना दुसरीकडून देखील शिलाई मशीन मिळते. आम्ही जिल्हा परिषदेच्या बजेटमधून २३६ महिलांना शिलाई मशिनचे वाटप केलेले आहे. मागील वर्षी यासाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यावर्षी ३० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये १४०६ महिलांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. ई-निविदा काढून संस्थेची निवड केलेली आहे आणि त्या संस्थेमार्फत महिलांना प्रशिक्षण दिलेले आहे. मागील वर्षी एमकेसीएल मार्फत १७९ मुलींना संगणकाचे प्रशिक्षण दिलेले आहे. एमएससीआयटीचे प्रशिक्षण दिल्यानंतर रिएम्बर्समेंट केली जाते आणि त्यावर ५,९९,६५० रुपये खर्च झालेले आहेत. लाभार्थ्यांना विशाल कंपनीच्या सायकलचे वाटप करण्यात आले आहे. ई-निविदा काढून सायकलची खरेदी करण्यात आलेली आहे, असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ जिल्हा परिषद यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली :—**

महिलांच्या कल्याणकारी योजनांकरिता ५ टक्के निधी खर्च करण्यांत येतो.

सन २०१२-१३ मध्ये तरतूद रु.२५ लक्ष खर्च एकूण रु.१९.९४ लक्ष

सन २०१३-१४ मध्ये तरतूद रु.३५ लक्ष खर्च एकूण रु.०३.५२ लक्ष

सन २०१४-१५ मध्ये तरतूद रु. ३५ लक्ष खर्च एकूण रु. १५.६५ लक्ष

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

यवतमाळ जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३० मे, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागाकडून कोणत्या योजना राबविण्यात येतात? महिलांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषदेकडून कोणत्या योजना राबविण्यात येतात? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिलाई मशीनचे वाटप, तांत्रिक प्रशिक्षण, अंगणवाडी या योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येतात.

समितीने जिल्हा परिषदेने आजपर्यंत महिलांच्या विकासासाठी काय केले, दरवर्षी जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्के निधी महिला व बाल कल्याण विभागास दिला जातो काय? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू निधी दरवर्षी १०० टक्के खर्च करण्यात येतो. त्यामधून शिलाई मशीनचे वाटप ही करण्यात येते. तसेच, आता तांत्रिक प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे असे समितीस सांगितले.

समितीने कुमारी मातांकडे त्यांच्या मुलांना शिकविण्यासाठी उत्पन्नाचे साधन नसून त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येतात? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिलांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली असून त्यांतर्गत त्यांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण युनिट सुरु करण्यात आले आहे. १०० दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. खाण मालकांकडून अत्याचार करण्यात आलेल्या मुलांना त्यांच्या आवडीनुसार शिलाई मशीन वाटप करुन त्यांना प्रशिक्षण किंवा ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण दिले तर त्या आपल्या पायावर उभ्या राहू शकतील असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

समितीने यवतमाळ जिल्हा परिषदेला भेट देऊन यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षात जिल्हा परिषदेचे वर्षनिहाय अंदाजपत्रक किती आहे? उक्त अंदाजपत्रकात एकूण महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी राखून ठेवण्यात आला का? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशाहीकरण करण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती व उपरोक्त वर्षात वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च करण्यात आला? या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांना या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हापरिषदेकडे आहे काय? जिल्हा परिषद निधीमधून महिलांना संबंधित कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येत आहे काय? तसेच हा निधी कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आला आहे इ.बाबत माहिती विचारली असता जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागाकडून सन २०१२-२०१३ चे एकूण अंदाजपत्रक रु.६,९६,१५,४५० इतकी असून ६ बाबींवरील उत्पन्न रु.६,६९,१०,९६४ इतकी असून त्यातून भांडवली व वेतनावरील खर्च वजा जाता शासन निर्णयानुसार १०% रक्कम म्हणून रु.५६,३१,००० ची तरतूद करण्यात आली होती. सन २०१३-२०१४ चे एकूण अंदाजपत्रक रु.१०,४०,४९,७०८ इतकी असून ६ बाबींवरील उत्पन्न रु.३३,५०,००,००० इतकी असून त्यातून भांडवली व वेतनावरील खर्च वजा जाता शासन निर्णयानुसार १०% रक्कम म्हणून रु.९८,२०,००० ची तरतूद करण्यात आली होती आणि सन २०१४-२०१५ चे एकूण अंदाजपत्रक रु. ७,८२,८४,७६९ इतकी असून ६ बाबींवरील उत्पन्न रु.२७,००,००० इतकी असून त्यातून भांडवली व वेतनावरील खर्च वजा जाता शासन निर्णयानुसार १०% रक्कम म्हणून रु.१,१९,००,००० ची तरतूद करण्यात आली होती.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे एकूण अंदाजपत्रकाच्या ६ बाबींवरील रक्कमांच्या १०% रक्कम महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेकडून तरतूद केली होती. उक्त तरतुदीमधून जिल्हा परिषद विविध योजना राबवित असते. जिल्हा परिषद शासन निर्णयानुसार योजना राबविते अशी माहिती प्राप्त झाली. जिल्हापरिषदेने समितीला पाठविलेली लेखी माहिती सन २०१२-२०१३ मध्ये एकूण अंदाजपत्रकाचा भांडवली खर्च वजा जाता रु.२५,००,००० ची तरतूद केली आहे असे सांगण्यात आले. सन २०१३-२०१४ मध्ये एकूण अंदाजपत्रकाच्या १० टक्के रक्कम रु.५६,३१,००० आणि सन २०१४-२०१५ मध्ये एकूण अंदाजपत्रकाचा भांडवली खर्च वजा जाता रु.९८,२०,००० ची तरतूद असल्याचे दिसून येते. तथापि,

जिल्हापरिषदेने उपरोक्त नमूद प्रत्येक वर्षात बाब निहाय किती खर्च केला? तसेच प्रत्येक योजनेवर किती खर्च केला इ. बाबत ताळमेळ केल्याची लेखी अथवा मौखिक माहिती दिसून येत नाही. त्यामुळे आजपावेतो प्रत्यक्ष योजनांवर किती खर्च केला हे साक्षीच्यावेळी समितीला जिल्हापरिषदेने तथा संबंधित विभागाने लेखी स्वरुपातील माहिती पाठविली नसून मौखिकरित्या देखील समितीला सांगितलेले नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार जिल्हापरिषदेने महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी १०% रक्कमेची तरतूद राखीव ठेवून तो संबंधित योजनांवर खर्च करणे बंधनकारक असताना अशा तरतूद केलेल्या रक्कमा जिल्हापरिषदेने संबंधित योजनांवर खर्च केली किंवा कसे हे स्पष्टपणे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची १०% रक्कम खर्च करण्यात जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली असून या रक्कमेचे नेमके काय केले हा प्रश्न समितीपुढे अनुत्तरीत राहतो याबाबत समितीने तीव्र शब्दात नापंसती व्यक्त केली.

**याप्रकरणी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ या वर्षातील माहिती प्राप्त झाली असून त्यात उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे १०% रक्कम खर्च केली किंवा कसे याची माहिती समितीला प्राप्त झाली नाही. जिल्हापरिषदेच्या संबंधित विभागांनी कोणकोणत्या बाबींवर खर्च केला, तसेच संबंधित सर्व रक्कम पूर्णपणे खर्च केली नसल्याचे समितीला लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत दिसून येत नाही. त्याचप्रमाणे कोणकोणत्या बाबींवर ती खर्च केली व ती रक्कम योग्य प्रकारे खर्च केली किंवा कसे इत्यादि माहिती अपूर्ण आहे. उर्वरित रक्कम केव्हा खर्च केली अथवा नाही हे ही नमूद केलेले नाही. यास्तव उपरोक्त तीनही वर्षात तरतूद केलेली रक्कम पूर्णपणे का खर्च केली नाही, यासंदर्भात समिती तीव्र खेद व्यक्त करीत असून शासन निर्णयानुसार अंदाजपत्रकातील रक्कमेतून १०% रक्कम राखीव ठेवून ती पूर्णपणे त्या-त्या वर्षात खर्च का केली नाही. याबाबत सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशीअंती दोषारोप ठेऊन जिल्हापरिषदेकडे महिलांच्या सबलीकरणासाठी असलेला १०% निधी मोठ्या प्रमाणावर असून ही उक्त निधीतून महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबवून महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांचे सक्षमीकरण तथा बलशाहीकरण करण्यासाठी शासनाने ज्या उदात्त हेतूने शासन निर्णय निर्गमित केला, त्याचे पालन यवतमाळ जिल्हा परिषदेकडून होताना दिसून येत नाही. यास्तव संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणे क्रमप्राप्त आहे. राज्यात अनेक ठिकाणी समिती भेटी देत असताना अनेक जिल्हापरिषदांमध्ये सदरची १०% रक्कम संबंधित विभागांकडून महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांवर खर्च होताना दिसून येत नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता विभागाने याबाबत गंभीर दखल घेऊन यवतमाळ जिल्हापरिषदेने देखील १०% रक्कम म्हणून तरतूद केलेली रक्कम खर्च केली किंवा कसे याबाबत सखोल चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी.**

**१.३ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ.**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ येथे दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्याध्यापक, कापरा आश्रमशाळा, यवतमाळ यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी मुख्याध्यापकांनी आश्रमशाळेत एकूण १५ शिक्षक व १५ शिक्षकेतर कर्मचारी असून इयत्ता १ ली ते १२ वी मधील विद्यार्थ्यांची पटसंख्या ३७८ इतकी आहे. त्यापैकी १९७ मुले व १८१ मुली आहेत असे समितीस सांगितले.

समितीने विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेला भेट दिली असता कॉट, गादी, चादर व्यवस्थित असल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांना दूध दिले जाते काय अशी समितीने विचारणा केली असता विद्यार्थ्यांने दूध दिले जात नसल्याचे सांगितले. केळी, सफरचंद व अंडी दिली जातात असे विद्यार्थ्यांनी सांगितले. समितीने जेवणाकरिता ठेवण्यात आलेले ताट बघितले असता जेवण चांगले असल्याचे आढळून आले. मुलांना एक्स्ट्रा चपाती पाहिजे असल्यास ती दिली जाते काय असे विचारणा केली असता विद्यार्थ्यांनी एक्स्ट्रा चपाती दिली जात असल्याचे सांगितले.समितीने विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके मिळतात काय अशी विचारणा केली असता विद्यार्थ्यांनी वह्या, पुस्तके मिळतात असे समितीस सांगितले. समितीने मुलींना सॅनेटरी नॅपकीन दिले जातात काय अशी विचारणा केली असता मुलींनी सॅनिटरी नॅपकीन दिले जातात असे समितीस सांगितले.

समितीने स्वयंपाकगृहाची पाहणी केली असता स्वयंपाक गृहाच्या बाहेरील ओटा अस्वच्छ असल्याचे आढळून आले. समितीने धान्य भांडाराची पाहणी केली असता तुरडाळ निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आले याबाबत अधीक्षकांना विचारणा केली असता टीडीसीमार्फत तुरडाळीचा पुरवठा करण्यात आला असून सॅम्पलप्रमाणे तुरडाळीचा पुरवठा करण्यात आलेला नसल्यामुळे टीडीसीकडे तक्रार करण्यात आलेली आहे असे समितीस सांगितले. सदर पाहणीच्या वेळी समितीला धान्य भांडारात चवळी, मुग, वाटाणा, हरभरा इ. कडधान्ये नसल्याचे आढळून आले. समितीने याबाबत विचारणा केली सदरहू कडधान्याचा पुरवठा झालेला नसल्याचे समितीस सांगण्यात आले.

समितीने आश्रमशाळेच्या कार्यालयाला भेट दिली असता त्यावेळी समितीला अशी माहिती देण्यात आली की, केळी, सफरचंद व अंडी यांचा महाराष्ट्र कन्झ्युमर्स फेडरेशनकडून होणारा पुरवठा बंद करण्यात आला आहे. आता एटीसी स्तरावर निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच ऑर्डर देण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने औषधांची पाहणी केली असता Alight (अलाईट) डोळ्यात टाकण्याच्या ड्रॉपची एक्सपायरी डेट संपली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीने मुलांच्या उपस्थितीची नोंदवही पाहली असता, २७ मुली व १८ मुले उपस्थित असल्याचे आढळून आले. समितीने विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे नोंदवही तपासली असता शाळा सुरू होऊन ३ महिने झाले असूनही अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीने सदर आश्रमशाळेकडे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले असल्यामुळे त्यांच्याकडून खुलासा मागवून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे समितीने संबंधितांना सांगितले.

समितीने विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्य रजिस्टरची पाहणी केली असता ७०० नग सॅनेटरी नॅपकिन, खोबरेल तेल, आंघोळ व कपडे धुण्याचे साबण इत्यादींचे बिल अदा केल्याचे आढळून आले, परंतु सदर बिलामध्ये कोणत्या कंपनीचे साहित्य पुरविण्यात आले याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. तसेच विद्यार्थ्यांना पॅराशूट कंपनीचे खोबरेल तेल द्यावयास पाहिजे असतांना त्याऐवजी कोको क्युअर कंपनीचे खोबरेल तेल देण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

यवतमाळ जिल्हा दौऱ्याबाबत आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच महिला व बालविकास विभागाच्या सचिवांची साक्ष होईल त्यावेळी एटीसी यांना साक्षीसाठी बोलाविण्यात यावे असे समितीने संबंधितांना सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष**

यवतमाळ जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आनुषंगाने दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ येथे समितीने विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा तसेच भोजन अल्पोपहार इ. सेवा निकृष्ट दर्जाच्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. तसेच, कडधान्याचा पुरवठा होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. याबाबत एटीसी स्तरावरून निविदा प्रक्रिया होऊन पुरवठादाराकडून संबंधित आश्रमशाळेला फळ, कडधान्य इ. नियमित पुरवठा करण्यात येतो काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? याबाबतची सद्यस्थिती काय आहे? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी मुलांना देण्यात येणाऱ्या भोजनामध्ये निकृष्ट दर्जाची तुरडाळ तसेच, जेवणामध्ये दूध व मटण देण्याबाबत आहे. यापूर्वी दूध किंवा इतर पदार्थांचे टेंडर हे अतिरिक्त आदिवासी आयुक्त यांचेकडून पास केले जात होते. खूप मोठ्या प्रकल्प क्षेत्रासाठी यामुळे एकच टेंडर असायचे. आश्रमशाळेतील मुलांना पूर्वीच्या शासन निर्णयानुसार दुधाला सबस्टिट्युट पदार्थ होते. परंतु आम्ही दूध अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर केला आहे. त्यामध्ये दूध वितरीत करण्याची व्यवस्था प्रत्येक गावाकडे देण्याबाबत व त्यासाठी फंड उपलब्ध करून देण्याबाबत तरतूद केली आहे. याबाबत आदिवासी विकास महामंडळाने टेंडरमध्ये कॉम्पिटिशनने यावे व दर्जाबाबत कोणतीही तडजोड न करता जास्तीत जास्त चांगल्या दर्जाची तुरडाळ उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तसेच,

विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक उपयोगासाठीच्या वस्तु, स्वच्छतागृह इ.साठी आम्ही प्रत्येक मुलांची बँकेमध्ये खाते उघडून त्यांच्या खात्यामध्ये पैसे ट्रान्सफर करणार आहोत किंवा मुलांना रोख स्वरुपात पैसे दिल्यामुळे तेल, साबण इ. वस्तुच्या दर्जाबाबतही काही अडचणी निर्माण होणार नाही असे समितीस सांगितले.

समितीने या पैशावर नियंत्रण कोण ठेवणार तसेच, मुलांच्या पालकांनी जर हे पैसे दारु पिऊन संपवले तर त्या मुलांना आवश्यक असलेल्या वस्तु कशा खरेदी करणार अशी विचारणा केली. त्यावर विभागीय आयुक्त यांनी सर्व पालकांची तसेच शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेतलेली आहे. तसेच, याबाबतचे ब्रोशर्स तयार करण्यात आले आहेत. आमची पथके विविध गावांमध्ये जाऊन याबाबत माहिती देणार असून यापूर्वीही काही वस्तू वेळेवर मिळाल्या नाहीत किंवा त्यांचा दर्जा चांगला नसल्याबाबत तक्रारी येत होत्या आता याबाबतची पूर्ण यादी करून ब्रॅण्डेड वस्तुची किंमत काढली आहे, पालकांशी संपर्क साधला असून याबाबत आढावा घेण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. मुले सुट्या संपल्यानंतर शाळा सुरू होण्याच्या वेळेस जेव्हा परततात, तेव्हा प्रत्येक वर्ग शिक्षकांना वस्तू तपासून पाहण्याची जबाबदारी देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

समितीने शासकीय आश्रमशाळेत भेट दिली असता विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदर आश्रमशाळेकडे तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी दुर्लक्ष केले असल्यामुळे त्यांचेकडून खुलासा मागवून त्यांचेवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत? याची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय आयुक्त यांनी, दिनांक २७ ऑगस्ट रोजी पीएसी टीमने शासकीय आश्रमशाळेस भेट दिली असता सदरहू भेटीच्या वेळी डॉक्टरांनी शासकीय आश्रमशाळेतील २७९ विद्यार्थ्यांची तपासणी केलेली होती. या तपासणीत ५५ विद्यार्थी किरकोळ आजारी असल्याचे आढळून आले होते. त्यात ५५ विद्यार्थ्यांवर योग्य तो उपचार केलेला आहे. दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ रोजी आदिवासी आश्रमशाळेस भेट दिलेली होती, त्यामध्ये २७० विद्यार्थ्यांची तपासणी केली असता ४७ विद्यार्थी किरकोळ आजारी होते, त्यातील ५ विद्यार्थ्यांना यवतमाळ रुग्णालयात भरती करण्यात आल्याचे सांगितले.

समितीने आदिवासी शाळांना भेटी दिल्या असता आश्रम शाळेतील आरोग्य तपासणीच्या नोंदवहीची तपासणी केली असता एकाही विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली नाही असे आढळून आले. आदिवासी आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली पाहिजे. त्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या रक्ताची तपासणी करून त्यांचा रक्त गट कार्डावर लिहून ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. कारण एखाद्या विद्यार्थ्यास आजार झाला तर त्यांना रक्त गटाची माहिती नसते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांचे रक्त गट तपासणी करण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यातील काही आश्रमशाळांच्या स्वयंपाक घराची पाहणी केली असता त्यात तूरडाळ उपलब्ध नसल्याचे आढळून आले. तेथील अधिक्षकांना विचारणा केली असता सॅम्पल प्रमाणे डाळीचा पुरवठा केला जात नाही. आम्ही स्वतः तपासणी केली असता तेथे डांगाची

डाळ होती. सदरहू डाळीचे सॅम्पल आणलेले आहेत. आदिवासी आश्रमशाळांना एटीसीमार्फत जो धान्य पुरवठा केला जातो, त्यावर विशेष लक्ष दिले पाहिजे अशी समितीप्रमुखांनी विभागीय आयुक्तांना सांगितले.

साक्षीच्या वेळी समितीने सन २०१५ मध्ये एका आदिवासी पाड्यावर ११९ कुमारी माता मिळून आल्या होत्या. त्याच्या संदर्भात कोणती उपाययोजना करण्यात आली आहे?अशी विचारणा केली.

त्यावर श्री.शेठ यांनी कुमारी मातांच्या संदर्भात यवतमाळ जिल्ह्यामध्ये सन २०१४ मध्ये ११ गुन्हे, सन २०१५ मध्ये १०, सन २०१६ मध्ये १० गुन्हे दाखल झाले आहेत. संपूर्ण जिल्ह्यात दरवर्षी कुमारी मातांचे १० ते ११ गुन्हे दाखल होतात. पोलीस विभागाकडे तक्रार येत नाही तोपर्यंत एफआयआर दाखल करता येत नाही. सदरहू प्रकरणी अत्याचारग्रस्त कुमारी मातांना तक्रार देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागेल. असहमतीने केलेला शारीरिक संबंध हा कुमारी माता प्रकरणी बलात्कार गृहीत धरण्यात येतो. अत्याचारग्रस्त महिला कुमारी माता यांना तक्रार दाखल करण्यासाठी प्रोत्साहन देऊन तक्रार दाखल करण्यास प्रवृत्त केले तर पोलीस प्रशासनाकडून सदरहू प्रकरणी कोणतीही कमतरता ठेवण्यात येणार नाही. यवतमाळ येथे आताच जिल्हा पोलीस अधीक्षक पदावर श्री.एम.राज.कुमार यांना नियुक्त करण्यात आले आहे. कुमारी मातांना तक्रार देण्यासंदर्भात शासनाच्या वेगवेगळ्या विभागाकडून प्रोत्साहन देता येणे शक्य आहे. सदरहू प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली तर संबंधित आरोपीस अटक करण्यात येईल. आतापर्यंत कुमारी माता प्रकरणी दाखल केसेसचे दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे. समितीने भेट दिली होती त्यावेळी कुमारी दिपाली रमेश बहुले यांचा उल्लेख केला होता. सदरहू प्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून चार्जशीट पाठविण्यात आली आहे असे समितीस सांगितले.

समितीने यवतमाळ जिल्ह्यामध्ये ११९ कुमारी माता आढळून आल्या असून त्यांची आज काय परिस्थिती आहे? अशी विचारणा केली. त्यावर विभागीय आयुक्त यांनी सदरहू कुमारी माता या मखोदगड व पांढरकवडा, पोलीस स्टेशन अंतर्गत काही भागांतील असून जिल्हा बाल कल्याण समितीच्या नियमानुसार बाल माता प्रकरणी काळजी घेण्यात येईल. बाल कल्याण विकासच्या नोडल ऑफीसर यांच्या देखरेखीखाली मुलांना ठेवण्यात आले आहे. गुड टच, बॅड टच यांसदर्भांत एक व्हिडिओ सादरीकरण तयार करण्यात आले आहे. सदरहू सादरीकरण गावातील महिलांना व लहान मुलांना दाखविण्यात येते व जनजागृती करण्यात येते. तसेच, पोलीस दिदी मोहिम सुरू करण्यात आली आहे. सर्व गावातील मुला-मुलींना तक्रार अथवा मदतीसाठी संपर्क क्रमांक देण्यात आलेला आहे असे समितीस सांगितले.

समितीने कुमारी मातांकडे त्यांच्या मुलांना शिकविण्यासाठी उत्पन्नाचे साधन नसून त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येतात? अशी विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिलांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली असून त्यांतर्गत त्यांना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरिता निविदा काढण्यात आली आहे. तसेच, हँडमेड युनिट सुरू करण्यात आले आहे. १००

दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. खाण मालकांकडून अत्याचार करण्यात आलेल्या मुलांना त्यांच्या आवडीनुसार शिलाई मशिन वाटप करून त्यांना प्रशिक्षण किंवा ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण दिले तर त्या आपल्या पायावर उभ्या राहू शकतील, असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीने दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कापरा, जि. यवतमाळ आश्रमशाळेत तूरडाळ, हरभरे, मटकी निकृष्ट दर्जाचे होते. शाळा ३ महिन्यापासून सुरू होऊनही आरोग्य अधिकाऱ्यांनी आश्रमशाळेला भेट देऊन मुलींची नियमित तपासणी करणे आवश्यक असताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर आश्रमशाळेला भेट देऊन मुलांची किंवा मुलींची वैद्यकीय तपासणी केलेली नसल्याचे समितीने रजिस्टरची तपासणी केली असता निदर्शनास आले. उपरोक्त सर्वबाबी विचारात घेता समितीने या आश्रमशाळेवरील पर्यवेक्षीय जबाबदारी असणाऱ्यांविरुद्ध तीव्र नापसंती व्यक्त केली.

समितीने सदरहू आश्रमशाळेला भेट दिल्यानंतर सचिवांच्या साक्षीपर्यंत म्हणजे दिनांक ३० मे २०१७ रोजीपर्यंत आयुक्त , आदिवासी विकास विभाग यांनी या प्रकरणी त्यांना समितीने कार्यवृत्त पाठवूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याने त्यांच्याविरुद्ध समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर या आश्रमशाळेच्या सोयी सुविधांची व नियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे त्या अधिकाऱ्यांनीच समितीने पाठविलेल्या कार्यवृत्ताकडे दुर्लक्ष करून, या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालून त्यांना संरक्षण दिल्याबद्दल समिती वरिष्ठ अधिकाऱ्यांचा म्हणजे आयुक्त , आदिवासी विकास विभाग यांच्याबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत आहे. आदिवासी भागातील मुलींना चांगले शिक्षण घेता यावे, त्यांनी गरीबीरेषेच्यावर यावे यासाठी शासन त्यांच्याकरिता विविध कल्याणकारी योजना राबवित असते. याचा भाग म्हणून या शालेय मुलींकरिता शासनाने आश्रमशाळेची निर्मिती केली आहे. तद्वतच **स्वयंपाकगृहात असलेल्या डाळ, हरभरे, मटकी इत्यादि विद्यार्थ्यांने सेवन केल्यास आरोग्यास अपायकारक असल्याचे समितीला प्रथमदर्शनी दिसून आलेले आहे. या प्रकरणी सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच ज्या कंत्राटदाराने किंवा कंझ्युमर्स सोसायटीने उक्त निकृष्ट व मानवाने खाण्यास अयोग्य अशा धान्यांचा व वस्तूंचा पुरवठा केला आहे अशा कंत्राटदारावर किंवा कंझ्युमर्स सोसायटीला शासनाने काळ्या यादीत टाकून या संस्थांनी केलेला धान्य पुरवठा हा निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे त्यांना कंत्राटात नमूद केल्यानुसार त्यांच्याकडून दंड आकारण्याबरोबरच त्यांना यापुढे शासनाचे कोणतेही कंत्राट देण्यात येऊ नये. कंत्राटदार किंवा कंझ्युमर्स सोसायटी यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच या प्रकरणी आयुक्त , आदिवासी विकास विभाग यांना समितीने कार्यवृत्त पाठवूनही दिनांक ३० मे २०१७ पर्यंत या संबधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे व कार्यवाही प्रस्तावित केली असल्याचे भासवून विधानमंडळाच्या संविधानिक समितीच्या निदेशाची एक प्रकारे पायमल्ली केली आहे. **समितीने भेटीच्या वेळी निर्देश देऊनही समितीला विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत आयुक्त , आदिवासी विकास विभाग यांनी संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात, अक्षम्य विलंब केला. त्याचप्रमाणे कंत्राटदार अथवा कंझ्युमर सोसायटी यांच्याविरुद्धदेखिल कोणतीही कार्यवाही केलेली नाही. संबंधितांवर आयुक्त कार्यालयामध्ये कार्यवाही प्रस्तावित केली असल्याचे समितीसमोर विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी नमूद केले ही बाब अत्यंत गंभीर असून या दोषी अधिकाऱ्यांना आदिवासी आयुक्त यांच्याकडून पाठीशी घालण्याचे प्रकार होत असल्याचे समितीला दिसून आले असून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे ज्या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी आश्रमशाळेतील सोयीसुविधा पुरविण्यात अक्षम्य दिरंगाई केली. अशा अधिकारी कर्मचाऱ्यांवर सुमारे दोन वर्षांचा कालावधी होऊन ही कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्यामुळे अशा अधिकाऱ्यांना प्रशासन पाठीशी घालत असल्यामुळे तसेच समितीने निदेश देऊनही कारवाई होत नसल्याने त्यांचे धाडस वाढते व ते यापेक्षाही जास्त गैरव्यवहार वा अनियमितता करण्यास घाबरत नाहीत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना कुठलीही दया न दाखविता त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी. जेणेकरून भविष्यात इतर अधिकारी आश्रमशाळेत गैरव्यवहार अथवा अनियमितता करणार नाहीत. याची दक्षता घ्यावी अशी समितीची भूमिका आहे.**

**शासनाने ज्या उदात्त हेतूने या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना प्रगत घटकातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने लाखो रुपये खर्च करून आदिवासी आश्रमशाळांची स्थापना करून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या असता वा केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे व गैरप्रकारामुळे या विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येऊ पाहत आहे. पर्यायाने शासनाचा हा धोरणात्मक निर्णयदेखील अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे धोक्यात येत असून आदिवासी समूह शिक्षणापासून व इतर सोयी सुविधांपासून वंचित राहण्याची भीती समितीला वाटत आहे. म्हणून या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे समितीला अत्यंत आवश्यक वाटते. भविष्यात अशा प्रकारचे कृत्य कोणत्याही अधिकाऱ्यांकडून होणार नाही असे समितीला प्रकर्षाने वाटते. याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच धान्य पुरवठा व वस्तू पुरवठा या पद्धतीत अमुलाग्रह बदल करण्याबरोबरच कठोर कारवाई करण्याची जबाबदारी विभागाने स्वीकारावी व त्या दृष्टीने नव्याने कडक स्वरूपाचे परिपत्रक विभागाने निर्गमित करावे अशी समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावा.**

समितीच्या आणखी असे निदर्शनास आले आहे की, या आश्रमशाळेत राहणाऱ्या विद्यार्थीनींची आरोग्य अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी नियमितपणे वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असताना अशी आरोग्य तपासणी संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांनी केलेली असल्याचे दिसून येत नाही. आश्रमशाळेतील मुली

आपल्या पालकांपासून दूर राहत असल्याने महिनोनमहिने घरी जात नाहीत. त्यांची स्त्रीविषयक आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे शासनाने या मुलींच्या आरोग्य तपासणीबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. अशा शासन निर्णयानुसार आश्रमशाळेत राहणाऱ्या मुलींची ठराविक कालावधीमध्ये वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असून उक्त वैद्यकीय तपासणीत दोष आढळल्यास किंवा रोग आढळल्यास त्या मुलींना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या पालकांनादेखील कळविणे बंधनकारक आहे असे असताना **एक-एक वर्ष आश्रमशाळेतील विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी न होणे निश्चितच गंभीर बाब आहे. सबब, समितीची शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलीची तपासणी करुनच त्या मुलींना शाळेत प्रवेश दिला जावा. शासकीय आश्रमशाळेतील सर्व मुले मुली उन्हाळी सुट्टी उपभोगून शाळेत परत येताना त्या मुलींची तपासणी करीत नाही. शाळा सुरू झाल्यानंतर मुले शाळेमध्ये येतात तेव्हा काही कालावधीनंतर या सर्व गोष्टी शिक्षकांना कळतात. अशा प्रकारच्या गोष्टीस शिक्षक व तेथील संबंधित स्टाफला समाज कारणीभूत धरतो. त्यामुळे या मुली शाळेत येतेवेळी संबंधित डॉक्टरांकडून त्यांची तपासणी होणे आवश्यक आहे. अशा प्रकारची तपासणी केलेले सर्व रेकॉर्डस् शासकीय आश्रमशाळेत ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे रेकॉडर्स तपासण्यासाठी एटीसीने किमान ३ महिन्यांतून एकदा तरी आश्रमशाळेस भेट देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची चौकशी आरोग्य विभागाने करून ज्या आरोग्य अधिकाऱ्यांनी आश्रमशाळेतील मुलींची वैद्यकीय तपासणी करण्यास दिरंगाई केली आहे अशा सर्व संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांवर कठोर स्वरूपाची कार्यवाही करण्यात यावी तसेच यासंदर्भात तपासणीचे वेळापत्रक आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व या केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावी. अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## २. अकोला जिल्हापरिषद

### २.१ अकोला, जिल्हापरिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :-

दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हापरिषद, अकोला यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

समितीने जिल्हा परिषदेतील १ ते ४ मधील तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे त्यांपैकी सन २०१४-२०१५ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व त्यामध्ये वर्गनिहाय महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे. उक्त मंजूर पदांपैकी १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरिता आरक्षित करण्यात आली आहेत.महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग १ ते ४ मधील पदांपैकी सन २०१४-२०१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत व कोण कोणती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली.

उपरोक्त प्रकरणी अकोला जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला परिशिष्ट (१) प्रमाणे खालीलप्रमाणे माहिती दिली. (परिशिष्ट १ सोबत जोडले आहे.)

वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरून केली जाते. वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे विभागाचे अधिनस्त असलेल्या विविध संवर्गातील सरळसेवेने रिक्त असलेली पदे शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच सेवाप्रवेश भरती नियम, १९६७ नुसार जिल्हा निवड समितीमार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे भरण्यात येतात.

महिला उमेदवारांची नियुक्ती करण्याकरीता जिल्हा परिषदेने स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार केलेला नाही. विभागाचे अधिनस्त असलेल्या विविध संवर्गातील सरळ सेवेची रिक्त असलेली पदे शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार सेवाप्रवेश भरती नियम १९६७ नुसार तसेच सामाजिक आरक्षणानुसार दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन जिल्हा निवड समितीमार्फत भरण्यात येतात असे सांगितले.

**अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सादर केलेली माहिती :**

अकोला जिल्हा परिषदेला दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेत वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३, व वर्ग-४ ची एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यांपैकी किती पद भरलेली आहेत? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या रिक्त पदांची भरती मंत्रालय स्तरावरून होते. वर्ग-३ च्या रिक्त पदांची भरती जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर आणि वर्ग-४ च्या रिक्त पदांची भरती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यास्तरावर होते. परिशिष्ट (अ) प्रमाणे शिक्षण विभागामध्ये अधिव्याख्याता (मराठी), संवर्गाची २० पदे मंजूर आहेत. सरळसेवेची एकूण १७ पदे मंजूर आहेत. त्यांपैकी महिलांकरिता ३० टक्केनुसार ५ पदे आरक्षित आहेत. महिलांचे १ पद भरले असून ४ पदे रिक्त आहेत. ही पदे रिक्त असण्याचे कारण असे आहे की, अकोला जिल्हा परिषदेत मागील ८-९ वर्षांपासून रोस्टर तयार करण्यात आले नव्हते. आम्ही आता रोस्टर तयार करण्याची प्रोसेस सुरु केली आहे. महिलांसाठी

आरक्षित असलेल्या ५ पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत. १-२ महिला सेवानिवृत झाल्यामुळे ४ पदे रिक्त दिसत आहेत. नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या भरती प्रक्रियेत ही पदे भरण्यात येणार आहेत, असे समितीस सांगितले.

त्यावर समितीने रिक्त पदे भरण्यासाठी कोणत्या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येणार आहे का? अशी विचारणा केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रिक्त पदे भरण्यासाठी ३-४ वर्तमानपत्रांत जाहिरात देण्यात येते. राज्यस्तरीय आणि स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते. शिक्षक विभागातील अधिव्याख्याता (उर्दू) संवर्गाची सरळसेवेची २ पदे मंजूर असून महिलांकरिता राखीव असलेले १ पद रिक्त आहे. कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण), संवर्गाची सरळसेवेची ४ पदे मंजूर असून महिलांकरिता राखीव असलेले १ पद रिक्त आहे. प्राथमिक शिक्षक (मराठी) संवर्गाची सरळसेवेची २,८७७ पदे मंजूर असून महिलांकरिता ८६३ पदे राखीव आहेत. महिलांची १३०६ पदे भरण्यात आली आहेत. प्राथमिक शिक्षक (उर्दू) संवर्गाची सरळसेवेची ४९५ पदे मंजूर असून महिलांकरिता १४८ पदे राखीव आहेत. त्यांपैकी महिलांची ११९ पदे भरण्यात आली असून २९ पदे रिक्त आहेत. नियमित भरती प्रक्रियेमध्ये ही पदे भरण्यात येणार आहेत. परंतु, आम्हाला पात्र उर्दू शिक्षक मिळत नाहीत. म्हणून आम्ही त्यासाठी रिक्रुटमेंटची प्रक्रिया राबविणार आहोत. तसेच, कृषी विभागातील कृषी अधिकारी संवर्गाची सरळसेवेची ४ पदे मंजूर आहेत. त्यांपैकी महिलांकरिता राखीव असलेले १ पद रिक्त आहे. विस्तार अधिकारी (कृषी) संवर्गाची सरळसेवेची ७ पदे मंजूर आहेत. त्यांपैकी २ पदे महिलांसाठी राखीव असून ही दोन्ही पदे रिक्त आहेत. आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक संवर्गाची सरळ सेवेची ४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी महिलांसाठी राखीव असलेले १ पद रिक्त आहे असे समितीस सांगितले.

समितीने कृषी विभाग, बांधकाम विभाग, सामान्य प्रशासन विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागातील बरीच पदे रिक्त असून सदरहू रिक्त पदे भरण्याची प्रोसेस लवकरात लवकर सुरू करून ही पदे भरण्यात यावीत असे सूचना केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागातील कनिष्ठ सहायक संवर्गाची १८ पदे रिक्त आहेत. ग्रामपंचायतीमध्ये जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना पदोन्नती देऊन आपण ही पदे भरली जातात. मे महिन्यात रिक्रुटमेंट होते. सन २०१४ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होत्या. त्यामुळे रिक्रुटमेंट उशिरा झालेली आहे. नोव्हेंबर, २०१५ मध्ये रिक्रुटमेंट करणार आहोत. नियमित सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारेदेखील पदे भरणार आहोत असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेत वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ ची एकूण मंजूर पदांची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे :-

सद्यःस्थितीत अकोला जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागाशी संबंधित वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

**वर्ग-१**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | मंजूर पदे (३) | कार्यरत पद (४) | रिक्त पद (५) |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | १ | १ | ० |
| २. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १ | १ | ० |
| ३. | शिक्षणाधिकारी(निरंतर शिक्षण) | १ | १ | ० |
| | एकूण . . | ३ | ३ | ० |

**वर्ग-२**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | मंजूर पदे (३) | कार्यरत पद (४) | रिक्त पद (५) |
|---|---|---|---|---|
| १. | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | २ | १ | १ |
| २. | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | २ | २ | ० |
| ३. | उप शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) | १ | ० | १ |
| ४. | गट शिक्षणाधिकारी | ७ | २ | ५ |
| ५. | अधीक्षक (म.शि.से.) /(प्राथ.) | १ | १ | ० |
| ६. | अधीक्षक (म.शि.से.) /(माध्य.) | १ | १ | ० |
| ७. | अधीक्षक (सा.रा.से.) /(प्राथ.) | १ | ० | १ |
| ८. | अधीक्षक (सा.रा.से.) (माध्य.) | १ | १ | ० |
| ९. | अधीक्षक (जी.शै.सा.व्या.वि.सं.) | १ | ० | १ |
| १०. | अधीक्षक, शालेय पोषण आहार | ७ | ६ | १ |
| | **एकूण . .** | **२४** | **१४** | **१०** |

वर्ग-१ व वर्ग-२ मधील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेमधील वर्ग-३ ची रिक्त पदे जिल्हाधिकारीस्तरावर वर्ग-४ ची रिक्त पदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर भरण्यात येतात.

**अभिप्राय व शिफारशी :**

अकोला जिल्हा परिषदेला दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३० मे, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली होती. साक्षीच्या

वेळी समितीने जिल्हा परिषदेमध्ये महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे ३० टक्के आरक्षणानुसार भरण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कोणती कार्यवाही करण्यात येते तसेच संवर्गनिहाय मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ मधील किती व कोणती पदे महिलांकरीता आरक्षित करण्यात आली आहे व सन २०१७ अखेर किती पदे भरण्यात आली आहे याबाबतची विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने वर्ग १ ते वर्ग २ च्या रिक्त पदांची भरती मंत्रालयस्तरावरुन होते. तसेच वर्ग ३ च्या रिक्त पदांची भरती जिल्हाधिकारीस्तरावर होत असून वर्ग ४ च्या रिक्त पदांची भरती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर होते. जिल्हापरिषदेमध्ये जास्त पदे शिक्षण विभागांशी संबंधित रिक्त पदे असून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने वर्ग २ चे गटशिक्षण अधिकारी या मंजूर ७ पदांपैकी सध्या फक्त दोनच पदे कार्यरत असून ५ पदे रिक्त आहे. तसेच, वर्ग-२ मधील इतर पदनामामध्येसुद्धा काही पदे रिक्त असल्यामुळे एकूण २४ मंजूर पदांपैकी १४ पदे कार्यरत असून १० पदे रिक्त असल्याचे निदर्शनास येते. **अकोला जिल्हा परिषदेने महिलांच्या आरक्षित पदांसंबंधात समितीला कोणतीही सविस्तर माहिती सादर केली नाही तसेच, साक्षीच्या वेळीही याबाबत विचारणा केली असता समितीला याबाबतही समाधानकारक उत्तरे मिळाली नाही. याबाबत समिती अकोला जिल्हापरिषद महिलांच्या आरक्षित पदे भरण्याबाबत खुपच उदासीन असल्याचे दिसून येते व त्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करते आणि जिल्हा परिषदेतील महिलांच्या ३० टक्के आरक्षित जागा भरण्यासंदर्भात कोणत्या स्तरावर विलंब झाला याची चौकशी करण्यात यावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर कठोर कारवाई करावी. तसेच भविष्यात महिलांमार्फत राखीव असलेल्या ३० टक्के जागादेखील भरण्यासंदर्भात खबरदारी घ्यावी त्यानुषंगाने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी.**

**२.२ अकोला जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील वर्षनिहाय अंदाजपत्रक :**

समितीने जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील (सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रकमेचे आहे ? उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण किती रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनासांठी राखून ठेवण्यात आली आहे ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांचे बलशाहीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्टया मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच महिलांकरिता देण्यात येणाऱ्या सोयी-सवलतीं इत्यादी योजनांबाबत माहिती देण्यात यावी ? तसेच, उक्त योजनांवर गत ३ वर्षांत वर्षनिहाय व योजनानिहाय एकूण किती खर्च झाला ? जिल्हा परिषदेमार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सवलती इ.बाबतची माहिती देण्यात यावी. तसेच, या योजनांची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी व त्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी योजना जिल्हा परिषदांकडे आहे काय? जिल्हा परिषद निधीतून महिला संबंधित कार्यक्रमासाठी १०% रक्कम खर्च करण्यात येते काय ? हा निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखून ठेवला असल्यास, गत ३ वर्षांत कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी ? महिलांच्या आरोग्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याची सविस्तर माहिती द्यावी ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी अकोला जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :–**

महिला व बाल कल्याण विभाग स्वतःचे अंदाजपत्रक तयार करून विषय समितीची मान्यता घेऊन वित्त विभागाकडे मान्यतेकरिता सादर करते. तसेच उपलब्ध तरतुदीनुसार योजनांवर खर्च करण्यात येतो.

**जिल्हा परिषदेचे गेल्या तीन वर्षांचे वर्षनिहाय अंदाजपत्रक :**

| अ.क्र. | वर्ष | वर्षनिहाय अदांजपत्रक | महिला व बाल कल्याण योजनांसाठी राखून ठेवण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १) | २०१२-१३ | १७,१०,७४,००० | १,३१,९०,००० |
| २) | २०१३-१४ | १८,२७,०५,००० | २,२१,१२,००० |
| ३) | २०१४-१५ | ३०,०६,२८,००० | ३,२४,६७,००० |

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील महिलांना स्वयंसहायता समुहांमार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान अंतर्गत बँकेकडून कर्ज स्वरुपात अर्थ सहाय उपलब्ध करून देण्यात येतो. तसेच प्रथम व द्वितीय प्रतवार झाल्यावर त्या आनुषंगाने फिरता निधी देण्यात येतो.

उद्योगधंदे उभारण्यासाठी दारिद्र्य रेषेखालील महिलांना स्वयंसहायतात समुहांमार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान अंतर्गत बँकेकडून कर्ज स्वरुपात अर्थ सहाय उपलब्ध करून देण्यात येतो, तसेच जिल्हा स्तरीय प्रदर्शनीच्या माध्यमातुन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते.

महिलांच्या कल्याणाकरिता भारत सरकार मार्फत राज्य शासनाकडून चालविली जाणारी योजना सावित्रीबाई फुले कल्याण पारितोषिक योजना या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील जोडप्यांत मुलगा नसतांना त्यांनी एक किंवा दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांना प्रोत्साहन दिले जाते. ह्यासाठी राज्य शासनाकडून अनुदान दिले जाते. राज्य शासनाकडून दिले गेलेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

१) सन २०१२-१३- रुपये ३ लाख ७० हजार

२) सन २०१३-१४- रुपये ५ लक्ष ८० हजार

३) सन २०१४-१५- रुपये ३ लक्ष २० हजार

विधवा/परित्यक्ता आणि निराधार महिला यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हा परिषदेमार्फत योजना राबविण्यात येत नाही.

१) महिला बाल कल्याण विभाग अंतर्गत :- सन २०१२-१३ मध्ये एकुण १,३९,९००००/-सन २०१३-१४ मध्ये एकूण २,२१,१२००० व सन २०१४-१५ मध्ये ३,२४,६७००० रकमेची तरतुद करण्यात आली होती. सन २०१३-१४ मध्ये ७५,९४,८९३ व सन २०१४-१५ मध्ये ४४,७०,६७७ रक्कम खर्च करण्यात आली. उक्त तरतुदीनुसार वैयक्तिक व सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.

२) समाजकल्याण विभाग अंतर्गतः- आर्थिकदृष्ट्या मागास असणारे महिलांना सक्षम करणेकरिता राबविण्यात आलेल्या योजनांवर झालेल्या खर्चाची माहिती :—

| अ.क्र. | योजनेचे नाव | विभागाचे नाव | वर्ष | प्राप्त निधी | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | किशोरवयीन मुलींना जिवन कौशल्याचे प्रशिक्षण देणे | महिला व बाल कल्याण | २०१२-१३ | | |
| २ | व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे | महिला व बाल कल्याण | २०१३-१४ | | |
| ३ | १००% अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे | महिला व बाल कल्याण | २०१४-१५ | १०,००००० | |
| ४ | ५ वी ते १० वी च्या मुलींना १००% अनुदानावर सायकल पुरविणे | महिला व बाल कल्याण | २०१४-१५ | ५५,५०,००० | |
| ५ | १.स्वर्णजयंती जयंती ग्राम स्वरोजगार योजना २.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान ३.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | २०१२-१३ | ——— | १६५.९२ (लाखात) |
| | | | २०१३-१४ | ——— | ३०५.१५ (लाखात) |
| | | | २०१४-१५ | ——— | १७४.९३ (लाखात) |

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या बचत गटाची संख्या सरासरी ७१६३ असून त्यापैकी ३२०५ महिला बचत गटांना लघु उद्योगाकरिता अर्थ सहाय बँकेकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे. ते नियमित सुरू आहे.

जिल्ह्यामध्ये इंदिरा आवास योजने अंतर्गत सन २००६-०७ ते २०१४-१५ पर्यंत पंचायत समिती क्षेत्रनिहाय खालीलप्रमाणे घरे बांधण्यात आली आहेत.

| अकोला | बार्शिटाकळी | अकोट | तेल्हारा | बाळापूर | पातुर | मुर्तिजापूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ४२६८ | १९०१ | २४७७ | १७८५ | १९७६ | २२५८ | १९३२ |

उपरोक्त प्रमाणे एकूण १६५९७ घरे बांधण्यात आली आहेत.इंदिरा आवास योजना अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घराची मालकी संयुक्त पणे पती-पत्नीच्या नावे करण्याची कार्यवाही ग्राम पंचायत स्तरावर करण्यात येते.सन २००२-२००३ च्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणनेनुसार इंदिरा आवास योजनेअंतर्गत कायम प्रतिक्षा यादी सन २००६-२००७ मध्ये तयार करण्यात आली असून सदर योजने अंतर्गत याच लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येतो. तथापि या यादीमध्ये विधवा व परित्यक्ता महिलाचा सुद्धा समावेश करण्यात येतो.

जि.प.सेस फंडामधून महिला व बाल कल्याण समितीला १०% निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. वेळोवेळी प्राप्त झालेले शासनाचे निर्णय व त्यात नमूद असलेल्या विविध योजना महिला व बाल कल्याण विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येतात.

महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत प्रकल्प अधिकाऱ्यांची ०८ पदे मंजुर आहेत. त्यापैकी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची ३ पदे भरली आहेत. रिक्त पदांवर संबंधीत प्रकल्पातील जेष्ठ पर्यवेक्षिका तसेच विस्तार अधिकारी व इतरत्र प्रकल्पातील प्रकल्प अधिकारी यांना अतिरिक्त प्रभार देण्यात आले आहे.

या विभागामार्फत सावित्रीबाई फुले कल्याण योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील एक किंवा दोन मुलीवर कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया झालेल्या लाभार्थी रोख व राष्ट्रीय बचत प्रमाण पत्राद्वारे आर्थिक मदत देण्यात येते.

तसेच दुर्धर आजार जसे कॅन्सर, किडणी, हृदय रोग, या आजारावरील वैद्यकीय खर्च भागविण्याकरिता महिला रुग्णांना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून आर्थिक मदत रु.१५००० पर्यंत दिली जाते.

**अकोला जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

अकोला जिल्हा परिषदेला दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून महिलांच्या विकासासाठी गत तीन वर्षात (सन २०१२-१३,२०१३-१४ व २०१४-१५) वर्षनिहाय किती रकमेची तरतूद करण्यात आली होती व प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली ? लेखी माहितीमध्ये महिला व बाल कल्याण विभागांतर्गत सन २०१३-१४ मध्ये ७५,९४,८९३ रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये ४४,७०,६७७ रुपये खर्च करण्यात आल्याचे नमूद केले आहे. सन २०१४-१५ मध्ये खर्च कमी होण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला व बाल कल्याण विभागांतर्गत सन २०१२-१३ मध्ये एकूण १,३१,९०,००० रुपये, सन २०१३-१४ मध्ये एकूण २,२१,१२,००० व सन २०१४-१५ मध्ये ३,२४,६७,००० रुपये इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. महिला व बाल कल्याण समितीला जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून १० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येतो.आम्ही प्रत्येक वर्षाची आकडेवारी येथे नमूद केलेली आहे. सन २०१३-१४ या वर्षाच्या बजेटमध्ये जेवढी रक्कम या शीर्षाखाली ॲलोकेट करण्यात आली होती तेवढी ती खर्च झाली नाही. कारण, सन २०१३ मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका होत्या आणि सन २०१४ मध्ये लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या आणि या निवडणुकांची आचारसंहिता लागू होती. लाभार्थी निवड व अन्य कार्यपद्धती संदर्भात शासनाने सन २००४ मध्ये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु, आम्हाला त्या निकषानुसार लाभार्थी मिळाले नाहीत.

त्यावर समितीने २०१३-१४ मध्ये रु.२,१२,१२,००० आणि सन २०१४-१५ मध्ये रु.३,२४,६७,००० इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली होती. परंतु उक्त ३ वर्षांमध्ये महिला बाल कल्याण विभागाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये महिलांच्या कल्याणाकरिता कोणताही खर्च केलेला नाही. २०१३-१४ मध्ये रु.७५,९४,८९३ आणि सन २०१४-१५ मध्ये रु.४४,७०,६७७ इतका निधी खर्च केल्याचे नमूद केले आहे. नोव्हेंबर, २०१० च्या शासन निर्णयानुसार महिलांच्या कल्याणाकरिता योजना राबविणे अत्यावश्यक आहे. या बाबतची माहिती नगरसेविकांना का दिली नाही ? महिला व बालकल्याण विभागाने सन २०१२-१३ मध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेवर १६५.९२ लक्ष रुपये,सन २०१३-१४ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती योजनेवर ३०५.१५ लक्ष रुपये आणि सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती योजनेवर १७४.९३ लक्ष रुपये खर्च करण्यात आले. या उलट सन २०१४-१५ मध्ये १०० टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशीन पुरविण्यासाठी १० लाख रुपये प्राप्त झाले होते. तसेच पाचवी ते दहावीच्या मुलींना १०० टक्के अनुदानावर सायकल पुरविण्यासाठी ५५ लक्ष ५० हजार रुपये प्राप्त झाले असताना सदर रक्कम खर्च न केल्यामुळे लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागले. सदर निधी त्यावर्षी खर्च का करण्यात आली नाही ? सन २०१२-१३ मध्ये महिलांच्या कल्याणकारी योजनांकरिता खर्च केला नाही. सदर निधी खर्च न केल्यामुळे लाभार्थ्यांना योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागले. त्यांच्यावर अन्याय झाला आहे, असे आपल्याला वाटत नाही का ?अशी विचारणा केली. या संदर्भात सन २०१२-१३ मध्ये कार्यरत असलेले उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांना कारणे दाखवा नोटीस पाठवून त्यांचा खुलासा मागवून घ्यावा. तसेच त्या प्रकरणी कारवाई सह संपूर्ण अहवाल सचिवालयाकडे त्वरित पाठवावा असे निदेश दिले.

त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी डीआरडीए मार्फत बचत गटांना रिव्हॉलव्हिंग फंड दिला जातो. प्रत्येक तालुक्याकरिता दर ३ महिन्यांनी बैठक घेतली जाते. त्यात जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व विस्तार अधिकारी (एनआरएचएम) असतात. आम्ही प्राधान्याने केंद्र शासनाच्या ३ महत्वाच्या योजनांवर फोकस करीत आहोत. सदर योजना आधार लिकेंजेस आहेत. मागील महिन्यात आरोग्य विभागाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांसमवेत ग्रामीण रुग्णालयात बैठक घेतली होती. त्यावेळी लोकांनी आम्हाला असे सांगितले की, आयसीआयसीआय बँकेत खाते उघडण्याकरिता एक हजार रुपये मागितले जातात. यामुळे महिला लाभार्थ्यांकरिता झीरो बॅलन्सवर खाते उघडण्याबाबत सर्व बँकांना लेखी स्वरुपात कळविण्यात आले आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आनुषंगाने दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी अकोला जिल्हा परिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली. साक्षीच्या वेळी समितीने अकोला जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून १० टक्के निधी लाभार्थ्यांना न दिल्यामुळे संबंधित लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली असून त्यांचा सविस्तर खुलासा करावा तसेच, सन २०१२-१३ या वर्षी महिलांच्या कल्याणकारी योजनांकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बाल कल्याण) यांना कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा मागविण्यात आला आहे काय, त्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ? अशी विचारणा केली.

योजना राबविताना लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर त्यांच्याकडून १० टक्के सहभाग रक्कम भरून घ्यावी लागते. जिल्हा परिषदेने एकूण उत्पन्नाच्या १० टक्के निधी राखून ठेवला होता. तसेच योजनांना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता देणे व पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून १० टक्के सहभाग घेणे ही प्रक्रिया पूर्ण होऊ न शकल्यामुळे योजना राबविता आली नाही. उक्त योजनेंसाठी निधीची तरतूद करण्यात आली. सदरहू निधी मागील वर्षातील अनुशेष असा उल्लेख करून दर्शविण्यात आला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

अकोला जिल्हापरिषेला दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या भेटीच्या अनुषंगाने आणि दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीतून समितीने जिल्हा परिषदेचा गेल्या ३ वर्षातील अंदाजपत्रकातील १० टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च केला जातो का, तसेच सन २०१२-१३ मध्ये कल्याणकारी योजनाकरिता निधी खर्च न केल्यामुळे लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेता आला नाही. याबाबत दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या एकूण अंदाजपत्रकांपैकी १० टक्के निधी महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्यावर खर्च केला जातो. तथापि, सन २०१३ मध्ये जिल्हापरिषदेच्या निवडणुका आणि सन २०१४ मध्ये लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका आणि त्याची आचारसंहिता लागू झाल्यामुळे लाभार्थी निवड व अन्य कार्यपद्धती लागू न करता आल्यामुळे लाभार्थी मिळाले नाहीत. समितीसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण समितीला योग्य वाटत नाही तसेच ज्या अधिकाऱ्यांनी गत ३ वर्षाचे महिलासाठींचा निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च न करता तसाच ठेवून दिला याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित दोषी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्याचा खुलासा घेण्याऐवजी त्यांना पाठीशी घालत असणे समितीच्या निदर्शनास आले ही अत्यंत गंभीर बाब आहे. सबब, **समिती अकोला जिल्हा परिषदेने सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ यावर्षातील महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाचा निधी महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच त्यांना देण्यात येणारे विविध योजनांवर शासन निर्णयानुसार खर्च न केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**२.३ अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता.गोरेगाव, जि.अकोला यांची साक्ष**

अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. गोरेगाव, जि. अकोला येथे दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्यासंदर्भात मुख्याध्यापिका, अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता.गोरेगाव, जि.अकोला यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी मुख्याध्यापकांनी आश्रमशाळेत एकूण १३० मुली असून शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत अनुसूचित जाती प्रवर्गाचे ८० टक्के विद्यार्थी आणि अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती प्रवर्गाचे २० टक्के

विद्यार्थी आहेत. इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या वर्गासाठी ४ शिक्षकांची आणि इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ५ शिक्षकांची पदे मंजूर आहेत. शाळेत ५ शिक्षक, २ क्लार्क व १ संगणक ऑपरेटर एवढा स्टाफ आहे. शिक्षकाची पदे रिक्त आहे. शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी सहायक आयुक्त , समाजकल्याण विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. शाळेत जेवढे विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी आले त्या सर्वांना प्रवेश दिलेला आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांला प्रवेश नाकारण्यात आला नाही असे समितीस सांगितले.

तद्नंतर समितीने विद्यार्थ्यांना नाश्ता दिला जातो का ? असे विचारले असता मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना नाश्त्यामध्ये कडधान्याची उसळ, पोहे, उपमा दिला जातो तसेच, जेवणामध्ये भाजी-पोळी, डाळ-भात व महिन्यातून एकदा नॉनव्हेज जेवण दिले जाते असे समितीस सांगितले.

त्यावर समितीने विद्यार्थ्यांना खोबरेल तेल दिले जाते का अशी विचारणा केली असता मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना खोबरेल तेल, टूथपेस्ट, आंघोळ व कपडे धुण्याचा साबण दिला जातो. सदर साहित्याचा पुरवठा महाराष्ट्र कन्झ्युमर फेडरेशन मार्फत केला जातो.

समितीने विद्यार्थीनीना सॅनेटरी नॅपकीन पुरविले जातात काय अशी विचारणा केली असता मुख्याध्यापिका यांनी मुलींना यादीनुसार जे साहित्य पुरविले जाते त्यामध्ये सॅनेटरी नॅपकीनचा समावेश नाही परंतु आम्ही एनआरएचएम मार्फत आशा वर्कर यांच्या माध्यमातून आमच्या स्तरावर सॅनेटरी नॅपकीनची खरेदी करतो आणि ते मुलींना देतो. परंतु सॅनेटरी नॅपकिनची खरेदी केल्यानंतर त्याचे बील सादर करावे लागते असे समितीस सांगितले.

समितीने शाळेतील मुलींच्या ब्लडग्रुपची तपासणी करण्यात येते का अशी विचारणा केली असता मुख्याध्यापिका यांनी रिलायन्स फाऊंडेशनने ब्लडग्रुप तपासणीचे शिबिर अंतर्गत सर्व मुलींच्या ब्लडग्रुपची तपासणी केली आहे. तसेच, वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत मुलींची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते असे समितीस सांगितले.

समितीने अन्नधान्याचा पुरवठा नियमित होतो का अशी विचारणा केली असता अन्न धान्याचा पुरवठा नियमित असून विद्यार्थ्यांचे जेवण तयार करण्यासाठी महाराष्ट्र कन्झ्युमर फेडरेशन मार्फत कॉन्ट्रॅक्टरची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विद्यार्थ्यांना चार्टमध्ये नमूद करण्यात आलेले जेवण दिले जाते. विद्यार्थ्यांना सकाळी ७.३० ते ८.०० या वेळेत नाश्ता तसेच, सकाळी १०.०० वाजता दुपारचे जेवण व सायंकाळी ७.०० वाजता सायंकाळचे जेवण दिले जाते अशी समितीस माहिती देण्यात आली.

समितीने स्वयंपाकगृहाची पाहणी केली असता वॉटरकुलर बंद स्थितीत होते तसेच वॉश बेसिन तुटलेल्या अवस्थेत होते. मुख्याध्यापिका यांनी आश्रमशाळेत एकूण ४ वॉटरकुलर असून ते १५ दिवसांपासून बंद आहेत तसेच, वॉटर कुलरची दुरुस्ती करण्याबाबत सहायक आयुक्ताना पत्र दिले आहे असे समितीस सांगितले. समितीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या खिचडी तपासली असता त्यामध्ये फक्त हळद, कडीपत्ता,

मोहरी दिसून आली आणि त्यात तुरडाळ, मसाला, कांदा, लसूण आढळून आलेला नाही. समितीने खिचडीची चव घेतली असता खिचडीला चव नसल्याचे आढळून आले. याबाबत समितीने ठेकेदाराबद्दल चौकशी केली असता मुख्याध्यापिका यांनी श्री.तिवारी या ठेकेदारामार्फत विद्यार्थ्यांना जेवण दिले जाते असे समितीस सांगितले. परंतु विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जा चांगला नसल्याचे समितीला आढळून आले.

समितीने बाथरुम व शौचालयाची पाहणी केली असता तेथे स्वच्छता नसल्याचे आढळून आले यासंदर्भात संबंधितांना विचारणा केली असता क्रिस्टल कंपनीला स्वच्छतेचे कंत्राट दिलेले आहे. कंपनीमार्फत सफाई कर्मचारी व सिक्युरिटी गार्ड अशा एकूण १९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे असे सांगण्यात आले. बाथरुम व शौचालयामध्ये स्वच्छता का नाही अशी समितीने विचारणा केली असता पाण्याची कमतरता असल्याचे मुख्याध्यापिका यांनी समितीला सांगितले. शाळेतील शौचालयाची अवस्था दयनीय असल्याचे समितीस दिसून आले.

श्री.चव्हाण, सहायक आयुक्त यांना समितीने शाळेला भेट देणार असल्याची पूर्ववत कल्पना दिली असताना देखील ते गैरहजर होते. याबाबत समितीने त्यांचेकडून खुलासा मागविण्यात यावा असे सांगितले.

समितीने शाळेत पिण्याच्या पाण्याची तसेच शौचालय व आंघोळीच्या पाण्याची समस्या असल्यामुळे संबंधितांकडे पत्रव्यवहार केलेले आहे काय अशी विचारणा केली असता मुख्याध्यापिका यांनी शाळेच्या आवारात बोअरवेल घेण्यात यावी याकरीता वेळोवेळी सहायक आयुक्त व विभागीय आयुक्तांकडे पत्रव्यवहार केलेला असून शाळेच्या आवारातील हँडपंपच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आली होते तेव्हा सदर पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे आरोग्य अधिकारी यांनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे असे समितीस सांगितले.

समितीने सदर पत्रव्यवहाराची फाईल तपासली असता मुख्याध्यापिका यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार केल्याचे तसेच याप्रकरणी सहायक आयुक्त व विभागीय आयुक्त यांनी दुर्लक्ष केल्याचे तसेच, मुलींना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवून त्यांच्या आरोग्याला अपायकारक ठरेल असे पाणी पिण्यास बाध्य केले असल्याचे समितीस आढळून आले.

**सहायक आयुक्त , समाज कल्याण, अकोला यांनी अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. गोरेगाव, जि. अकोला आश्रमशाळेबाबत खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली आहे.**

महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. गोरेगाव, जि. अकोला येथे भेट दिली असता स्वयंपाकगृहातील वॉटर कुलर बंद अवस्थेत असल्याचे समितीस आढळून आलेले होते. त्यानुसार निवासी शाळेच्या परिसरात उपलब्ध असलेल्या भूगर्भ जलसाठा पाऊस न पडल्यामुळे आणि अत्यल्प असल्याने आणि वॉटर कुलर मध्ये पाणी न भरल्यामुळे (पाण्याअभावी) बंद होते. तथापि, आता शाळेमध्ये नवीन विंधन विहीर खोदण्यात आली असून त्यास चांगल्या प्रकारे पाणी लागले आहे व त्यावर मोटार बसविण्यात आली असून पाण्याची समस्या सोडवून स्वयंपाकगृहातील वॉटर कुलर सुव्यवस्थित स्थितीमध्ये सुरू आहेत.

समितीने भेट दिली असता शाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारबाबत समितीने नाराजी व्यक्त केली होती. त्यानुसार निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थींनीना सकस व पुरेसा आहार देण्याबाबतचे निर्देश संबंधित पुरवठा धारकास देण्यात आले आहे. तसेच भोजनाचा दर्जा सुधारण्याबाबत पुरवठादाराला रु. ५००० दंड आकारण्यात आलेला आहे. निवासी शाळेतील मुख्याध्यापकांना भोजनाचा दर्जा सुधारण्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांनी टँकरने पाणीपुरवठा सुरू ठेवणे, कुपनलिकेच्या कामाबाबत पाठपुरवठा न करणे, कंपनीच्या कर्मचारी यांचेकडून नीट काम करवून न घेणे यासाठी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्थापित करण्यात आली असून त्याचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

समितीने पाहणी करतेवेळी इमारतीच्या परिसरात आढळून आलेल्या अस्वच्छतेबाबत विचारणा केली होती. त्यानुसार निवासी शाळेच्या इमारतीची व तसेच शालेय परिसराची नियमित स्वच्छता होणाच्या दृष्टीने बाह्यस्त्रोताद्वारे मा. आयुक्त स्तरावरून मे. क्रिस्टल कं.प्रा.लि., मुंबई यांच्याद्वारे कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. शाळेच्या इमारतीची व परिसराची दिवसातून दोन वेळा नियमित सफाई व स्वच्छता ठेवण्यात येते. तथापि स्वच्छता होण्याकरिता पुरेश प्रमाणात पाणी उपलब्ध नसल्याकारणाने पाहिजे त्या प्रमाणात स्वच्छता ठेवता येत नाही. तथापि, कंपनीने कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांना रु.५,००० दंड करण्यात आला आहे. तसेच, स्वच्छता ठेवणेबाबत निवासी शाळेच्या मुख्याध्यापक यांनी स्वतः जातीने लक्ष देऊन सफाई कर्मचाऱ्याकडून सफाई करून घेण्याबाबत निर्देश दिले आहे. या व्यतिरिक्त कामात सुधारणा न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याला कामावरून कमी करण्याची शिफारस संबंधित मॅनेजरला सक्त ताकीद दिली आहे. त्याचप्रमाणे निवासी शाळेतील सर्व प्रवेशित विद्यार्थींनी व कर्मचाऱ्यांना आपल्यास्तरावरून शालेय परिसर अस्वच्छ होणार नाही याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

समितीने पाहणी करतेवेळी पिण्याचे व वापरावयाचे पाण्याच्या व्यवस्थेबाबत विचारणा केली होती. त्यानुसार निवासी शाळेच्या परिसरात उपलब्ध असलेला भूगर्भ जलसाठा पाऊस न पडल्याने अत्यल्प आहे व त्यामुळे शाळेच्या कुपनलिकेतील (बोअरवेल) पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध नाही. प्रवेशित विद्यार्थ्यांना बाह्यस्त्रोताद्वारे पाण्याची व्यवस्था म्हणून टँकरद्वारे उपलब्ध करून घेण्यात आले होते. तसेच, पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था होण्याकरिता कुपनलिका (बोअरवेल) भुगर्भातील जलबिंदु स्त्रोत शोधून मिळण्याबाबत मा. जिल्हा भूजल सर्वेक्षण अधिकारी, अकोला यांना कार्यालयीन पत्र क्रमांक १७१७/दिनांक ५ जुलै २०१५ नुसार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जि.अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४८८/दिनांक ७ ऑगस्ट २०१५ अन्वये पिण्याचे पाण्याकरिता विंधन विहीर स्थळ निश्चिती करून देण्याबाबत स्थळ दर्शक नकाशासह शिफारस करण्यात आली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्रमांक १८७९/ दिनांक ७ ऑगस्ट २०१५ अन्वये निवासी शाळेकरिता कुपनलिका (बोअरवेल) करून मिळण्याकरिता अंदाजपत्रक मिळण्याबाबत जिल्हा भूजल

सर्वेक्षण अधिकारी, अकोला यांना पत्र सादर करण्यात आले होते. सहायक आयुक्त यांना केवळ रु.५,००० असल्यामुळे मा.प्रादेशिक उपायुक्त , समाजकल्याण विभाग, अमरावती यांना पाठवून आदेश क्रमांक ४४३३, दिनांक २६ जून २०१५ अन्वये निवासी शाळेकरिता नवीन विंधन विहीर करण्याकरिता अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने एकूण किंमत रु.९९,३०० खर्चाकरिता दिनांक २६ ऑगस्ट २०१५ रोजी मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून त्यानुसार नवीन विंधन विहीर खोदण्यात आली आहे व त्यास चांगल्याप्रकारे पाणी लागले आहे. त्यावर मोटार बसविण्यात आली असून पाण्याची समस्या सोडविण्यात आली आहे. त्यामुळे पाण्याची व इतर कोणत्याही प्रकारची अडचण शाळेवर नाही. यावेळी पाऊस अत्यल्प पडल्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती होती. त्यामुळे शाळेतील कुपनलिकेमध्ये पुरेसे पाणी नसल्यामुळे केवळ काही दिवसाकरिता टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. मात्र आता नवीन कुपनलिका खोदली असून त्यास चांगले पाणी लागले आहे. तसेच, शाळेतील मुलींना सोई-सुविधेअंतर्गत सोलर वॉटर हिटर, प्रोजेक्टर, झेरॉक्स मशीन, साहित्यामध्ये मुलीना सॅनेटरी नॅपकीनचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

सहायक आयुक्त , समाज कल्याण, अकोला यांनी अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता.गोरेगाव, जि.अकोला आश्रमशाळेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने भेट दिली असता विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधांचा अभाव असल्याचे आढळून आले होते. शासनाने यासंदर्भात पुढे काय कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी समितीने ज्यावेळी भेट दिली त्यावेळी या शाळेमध्ये पाणी टंचाईची समस्या होती. तेथे पाण्याच्या अनुपलब्धततेमुळे थोडी अस्वच्छता होती. दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी विंधन विहीर खोदण्यात आली त्याला पाणी लागले. यातील पाणी स्वयंपाकगृह, वॉटर हिटर, प्युरिफायर, वॉटर कुलर याकरिता पाणीपुरवठा करण्यासाठी पाईपलाईन बसविण्यात आलेली आहे. या सर्व सोईसुविधा देण्यात आल्या होत्या. श्री. तिवारी हे पूर्वीचे ठकेदार होते, त्यांच्या भोजन ठेक्याबाबत अनेक तक्रारी होत्या. त्यांच्याकडून भोजन ठेका काढण्यात आला होता. अमरावती येथील एका ठेकेदाराला आता या शाळेचा भोजन ठेका देण्यात आलेला आहे. यांच्या भोजन ठेक्याबाबत अद्याप कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच, या शाळेला आता आयएसओ नामांकन प्राप्त झालेले असून आयएसओच्या दर्जाप्रमाणे ही शाळा आयएसओच्या सर्व नॉर्म्सची पूर्तता करीत आहे. या शाळेमध्ये गरम पाण्याकरिता ५०० लिटरचे वॉटर हिटर दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७ रोजी बसविण्यात आलेले आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय या सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. ही शाळा डिजीटल स्कूलमध्ये कन्व्हर्ट व्हावी याकरिता एलईडी टिव्ही, स्क्रिन याचा पुरवठा करून डिजीटल क्लासरुमची यंत्रणाही येथे बसविण्यात आलेली आहे. विद्यार्थीनीच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आलेले आहेत. झेरॉक्स मशीनही येथे इन्स्टॉल करण्यात आलेली आहे. स्वच्छतागृहे आऊटसोर्सिंग एजन्सीमार्फत स्वच्छ करून घेतली जात आहेत, त्याची छायाचित्रेही समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

समितीने भेट दिल्यामुळे शासकीय निवासी शाळा ज्याप्रमाणे डेव्हलप झाल्या आहेत त्याप्रमाणे इतर शाळादेखील डेव्हल्प झाल्या आहेत काय अशी समितीने विचारणा केली.

त्यावर सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी सामाजिक न्याय विभागाकडे एकूण ८३ निवासी शाळा आहेत त्यापैकी बहुतांशी शाळा डेव्हलप केलेल्या आहेत. दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजी या निवासी आश्रमशाळेला आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे त्याप्रमाणे इतरही बऱ्याच शाळांना आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे असे समितीस सांगितले.

समितीच्या असेही निदर्शनास आले होते की, आदिवासी आश्रमशाळांना महिन्याला प्रत्येकी १० सॅनेटरी नॅपकीन दिले जातात परंतु, समाजकल्याण विभागाच्या जेवढ्या निवासी शाळा आहेत त्या शाळांमध्ये सॅनेटरी नॅपकीन दिले जात नाहीत. आता दर महिन्याला एका मुलीला किती सॅनेटरी नॅपकीन दिले जातात ? अशी समितीने विचारणा केली.

त्यावर सचिव सामाजिक न्याय विभाग यांनी मुलींच्या शासकीय वसतीगृहामध्ये आम्ही ज्या सर्व सुविधा देतो त्याप्रकारच्या सर्व सुविधा समाजकल्याण विभागाच्या शाळांमध्ये देण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. परंतु दीड ते दोन वर्षांपासून त्या प्रस्तावात अनेक चुका असल्याचे सांगून परत पाठविण्यात येत आहे असे समितीस सांगितले.

समितीने या प्रस्तावांमध्ये सॅनेटरी नॅपकीनचा समावेश आहे काय ? अशी विचारणा केली.

त्यावर विभागीय सचिवांनी सॅनेटरी नॅपकीनसाठी प्रत्येकी रु. १०० देण्याचे सांगितले आहे. तसेच, पुढच्या वर्षापासून ईन्सुलेटींग मशीन आणि व्हेंडीग मशीन या दोन्ही मशिनिही मुलीपर्यंत पोहचविल्या जातील असे समितीस सांगितले.

तसेच सहायक आयुक्त यांनी स्वच्छतेसाठी रुपये ५०० प्रति व्यक्तीप्रमाणे डीव्हीईटीमार्फत त्यांना देण्यात येतात अशी समितीस माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीने दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या अनुसूचित जातीच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, ता. गोरेगाव, जि. अकोला येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली होती. त्यावेळी समितीला आश्रमशाळेत एकूण १३० मुली असून शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत अनुसूचित जाती प्रवर्गाचे ८० टक्के विद्यार्थी आणि अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती प्रवर्गाचे २० टक्के विद्यार्थी आहेत अशी माहिती समितीला देण्यात आली. त्यानंतर समितीने विद्यार्थ्यांना नाश्ता किती वाजता दिला जातो, तसेच दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण किती वाजता दिले जाते याची विचारणा केली असता विद्यार्थ्यांना सकाळी ७-३० ते ८-०० या वेळेत सकाळचा नाश्ता, सकाळी १०.०० वाजता दुपारचे जेवण व सायंकाळी ७-३० ते ८-०० या वेळेत रात्रीचे जेवण दिले जाते अशी समितीस माहिती देण्यात आली. **याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून अशी शिफारस करते की, विद्यार्थ्यांना सायंकाळी ७-०० वाजता जेवण देण्याऐवजी त्यांना रात्री**

**८-०० किंवा ८-३० पर्यंत जेवण देण्यात यावे. तसेच जेवणानंतर ठराविक वेळाने एखादे फळ किंवा दुध विद्यार्थ्यांना देण्यात यावे जेणेकरून त्यांना रात्री उपाशी झोपावे लागणार नाही. यासाठी शासनाने आश्रमशाळेतील आहारात बदल करण्याबाबत विचारविनिमय करावा व त्यादृष्टीने निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच, समितीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या खिचडीची तपासणी केली असता त्यामध्ये फक्त हळद, कडीपत्ता, मोहरी दिसून आली परंतु, त्यात तुरडाळ, मसाला, कांदा, लसूण आढळून आलेला नाही. समितीने खिचडीची चव घेतली असता खिचडीला चव नसल्याचे आढळून आले. याबाबत समितीने ठेकेदाराबद्दल चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कोणती कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सदरहू ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून त्यास ५,००० रुपये दंड आकारण्यात आला असून उक्त ठेकेदारास बदलून अमरावती येथील ठेकेदाराला शाळेचा भोजन ठेका देण्यात आला आहे. या ठेकेदाराबाबत अद्यापपर्यंत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. **विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या भोजनाबाबत श्री. तिवारी या ठेकेदारावर अगदी साध्या स्वरूपाची कारवाई केल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे जेवण देऊन त्याविरुद्ध केवळ ५,००० रुपये दंड आकारुन प्रशासनाने एक प्रकारे त्यास संरक्षण दिले असून त्याची पाठराखण केली आहे. त्यामुळे ही कारवाई सौम्य असल्यामुळे भविष्यात या ठेकेदारास कुठेही काम करणे शक्य होऊ नये यासाठी त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांत देण्यात यावा.**

समितीने आदिवासी आश्रमशाळांच्या विद्यार्थीनीला प्रत्येकी १० सॅनेटरी नॅपकीन दर महिन्याला दिले जातात परंतु समाजकल्याण विभागाच्या जेवढ्या आश्रमशाळा आहेत त्या शाळांमध्ये सॅनेटरी नॅपकीन दिले जात नाही आणि दिले जात असतील तर किती दिले जातात याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, मुलींच्या शासकीय वसतीगृहामध्ये ज्या सर्व सुविधा देतो त्या सर्व सुविधा समाजकल्याण विभागाच्या शाळामध्ये देण्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला असून दीड ते दोन वर्षांपासून त्या प्रस्तावात अनेक चुका असल्याचे सांगून वित्त विभागाकडून प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे यावर सदर प्रस्तावात मुलींना देण्यात येणाऱ्या सॅनेटरी नॅपकीनचा समावेश आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सॅनेटरी नॅपकीनसाठी प्रत्येकी १०० रुपये देण्याची विभागीय सचिवांनी समितीला माहिती दिली तसेच पुढच्या वर्षापासून इन्स्युलेटींग मशीन व वेन्डींग मशीन या दोन्ही मशीन मुलीकडे पोचविल्या जातील अशी माहिती समितीला दिली. **समितीला आश्वासित केल्याप्रमाणे सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळांमध्ये मुलींना सॅनेटरी नॅपकीन पुरविण्याबाबत प्रलंबित असलेला प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यात यावा व सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळामध्ये मुलींना सॅनेटरी नॅपकीन पुरविण्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन उक्त योजनेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत देण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## ३. अमरावती महानगरपालिका

### ३.१ अमरावती महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत

महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी महानगरपालिका, अमरावती यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

समितीने शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित सेवामधील भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याच्या धोरणांची अंमलबजावणी महानगरपालिकेच्या सेवांमधील भरती करताना करण्यात येते काय? असल्यास त्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादीबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी? महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहेत? त्यापैकी सन २०१४-१५ अखेर किती पदे भरण्यात आली आहेत? महानगरपालिकेतील विविध पदांवर महिला उमेदवारांच्या नियुक्ती करण्याबाबत महानगरपालिकेने सेवा प्रवेश नियमावली तयार केली आहे काय? महिला उमेदवारासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आले आहे काय? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी अमरावती महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :–**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च ३५% पेक्षा जास्त असल्याकारणाने रिक्त पदे भरता आली नाही. तसेच अमरावती महानगरपालिकेस शासनाने नवीन नोकर भरती करण्यास शासन निर्णय दिनांक २७ डिसेंबर, २००४ अन्वये बंदी घातली आहे. त्यामुळे शासनाकडून रिक्त पदे भरण्यास मंजुरी प्राप्त करावी लागते. शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाने ठरवून दिलेल्या निकष, शासन निर्णय, परिपत्रकानुसार रिक्त पदांवर ३० टक्के महिला आरक्षण घेऊन भरण्यात येईल.

अमरावती महानगरपालिकेमध्ये मंजूर पदांची संख्या २४३९ व ४०७ शिक्षक त्यापैकी ६५३ महिला अधिकारी/कर्मचारी/शिक्षिका कार्यरत आहे. (गट अ-१, गट ब-३, गट क-२९३, गट ड-३५६) सेवाप्रवेश नियमावली मंजुरीच्या अंतिम प्रक्रियेत आहे. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी स्वतंत्र नोंदवही नाही. रोस्टर एकत्रित स्वरूपात आहे, अशी माहिती समितीला दिली.

**पदांचा गोषवारा**

| अ.क्र. (१) | पदाचे नाव (२) | मंजूर पदे (३) | कार्यरत पदे (४) | रिक्त पदे (५) | महिलांसाठी मंजूर पदे ३० टक्के आरक्षणाप्रमाणे (६) | कार्यरत महिला अधिकारी/ कर्मचारी (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गट अ | २१ | १४ | ७ | १ | ३ |
| २ | गट ब | २७ | १५ | १२ | ४ | ३ |
| ३ | गट क | ७५६ | ४३५ | ३२१ | २०१ | ४५ |
| ४ | गट ड | १६३५ | ११३१ | ५०४ | ४९० | ३४७ |
| | **एकूण गट अ, ब, क, ड** | **२४३९** | **१५९५** | **८४४** | **६९६** | **३९८** |

वरील रिक्त पदांच्या गोषवाऱ्यात शिक्षकांची पदांची माहिती समाविष्ट करण्यात आली नाही. तसेच, शासन निर्णय क्रमांक ८१/२००१/मसक्षा-२००१/प्र.क्र.४१५/शा-२, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई. दिनांक २५ मे २००१ महिलांसाठी विहित करण्यात आलेले ३० टक्के आरक्षणानुसार पदांची माहिती देण्यात आली आहे.

समितीने महानगरपालिकेत विशाखा समिती स्थापन करण्यात आली आहे काय, विशाखा समितीचा फलक का लावण्यात आला नाही ? विशाखा समितीमध्ये किती महिला सदस्यांचा समावेश आहे ? अशी विचारणा केली असता आयुक्त यांनी अमरावती महानगरपालिकेत विशाखा समिती स्थापन करण्यात आली असून त्यामध्ये एक महिला सदस्य असून ज्या सदस्यांचा समावेश आहे त्यांची नावे व फोन क्रमांकासह दोन दिवसात फलक लावण्यात येईल असे समितीस सांगितले.

**अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त यांची साक्ष :–**

अमरावती महानगरपालिकेला गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्त यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अमरावती महानगरपालिकेत महिला उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या पदांच्या संदर्भांत स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले त्यासंदर्भांत समितीला माहिती द्यावी, अशी सूचना केली. गट अ व गट-ब मध्ये ३० टक्के आरक्षणानुसार रोस्टर तयार केले आहे काय? गट-अ ते गट-ड मध्ये एकूण किती मंजूर पदांपैकी किती पदे रिक्त आहेत, ३० टक्के महिला आरक्षणानुसार एकूण पदांची संख्या किती आहे? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी अमरावती महानगरपालिकेत स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही. परंतु, स्वतंत्र रोस्टर ठेवले असून त्यामध्ये एससी, एसटी, व्हीजेएनटी असे संवर्गनिहाय रोस्टर तयार केले असल्याचे असे समितीस सांगितले. गट-अ मध्ये एक, गट-ब मध्ये ३, गट-क मध्ये २९३ आणि

गट-ड मध्ये ३५६ अशा एकूण ६५३ महिला अधिकारी/कर्मचारी महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत आहेत. गट-अ आणि गट-ब मधील पदांना ३० टक्के आरक्षण दिलेले नाही. महानगरपालिकेत २००१ पासून भरती बंद आहे. गट-क व गट-ड मधील पदांना आरक्षण आहे. महानगरपालिका आस्थापनेवर एकूण २४३९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १५९५ पदावर अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच ६४९ महिला अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत, असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली.**

समितीच्या दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजीच्या बैठकीनंतर आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी अमरावती महानगरपालिकेचे सेवा प्रवेश नियम व आकृतीबंध शासनाकडे प्राप्त झाले असून, या अनुषंगाने प्रथम आकृतीबंध निश्चित झाल्याशिवाय त्याबाबतचे सेवाप्रवेश नियम निश्चित होऊ शकत नसल्यामुळे आकृतीबंधाच्या अनुषंगाने अधिकची माहिती विहित नमुन्यात अमरावती महानगरपालिकेकडून मागविण्यात आलेली आहे. अमरावती महानगरपालिकेत विधी अधिकारी चे रिक्त असलेले पद भरण्याकरीता दिनांक २ ऑक्टोबर २०१५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुषंगाने विधी अधिकाऱ्याचे पद भरण्यात आले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :–**

अमरावती महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ३० मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या संदर्भात स्वतंत्र नोंदवही का ठेवण्यात आली नाही, महिलांच्या ३० टक्के आरक्षणानुसार सदर पदे भरणे आवश्यक असतानाही सदर पदे का भरण्यात आली नाही तसेच कोणती व किती पदे रिक्त आहेत तसेच, सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत? असे विचारणा केली.

त्यावर आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी अमरावती महानगरपालिकेची सेवाप्रवेश नियमावली आणि आकृतीबंध मंजूर नव्हता. सेवाप्रवेश व आकृतीबंध तयार करून त्यास महासभेची मान्यता घेऊन शासनास सादर करण्यात आले असून त्यामध्ये दुसऱ्यांदा त्रुटी असल्यामुळे त्या त्रुटींची पुर्तता करून सेवाप्रवेश व आकृतीबंध पुन्हा शासनाकडे पाठविण्यात येईल. सेवाप्रवेश व आकृतीबंध नसल्यामुळे रिक्त पदे भरण्यास मान्यता देता येत नाही. आकृतीबंध व आर.आर. यांना मान्यता मिळाल्यानंतर वर्ग-३ मधील पदे तातडीने भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल तसेच, महानगरपालिकेला समांतर आरक्षण लागू आहे, असे समितीस सांगितले.

त्यानंतर समितीने अमरावती महानगरपालिकेमध्ये विशाखा समितीच्या सदस्यांचा फलक लावण्यात आलेला आहे काय, तसेच विशाखा समिती पुर्नगठीत करून जास्तीत-जास्त महिला सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे काय, असल्यास, सविस्तर माहिती देण्यात यावी. विशाखा समितीकडे किती प्रकरणे आली व किती निकाली काढण्यात आली व किती प्रलंबित आहेत याची सद्यःस्थिती देण्यात यावी.

त्यावर आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी विशाखा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये ११ जणांचा समावेश असून त्यात ९ महिला सदस्य, २ एनजीओ, ॲडव्होकेट, डॉक्टर आहेत. या समितीच्या अध्यक्षा स्वतः डॉक्टर आहेत. आयुक्ताच्या कक्षाच्या बाहेर फलक लावलेला आहे. सध्या समितीकडे एकही प्रकरण प्रलंबित नाही. एक प्रकरण प्रलंबित होते. त्याचा आरोप सिद्ध होत नसल्याचा अहवाल देण्यात आलेला आहे. महिला कर्मचाऱ्याने अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. ते अधिकारी शेरेबाजी करतात अशाप्रकारचे ते प्रकरण होते. त्यात फारसे काही निष्पन्न झाले नाही. कुठलेही पुरावे समितीसमोर आलेले नाहीत किंवा कुठलाही कर्मचारी साक्षीसाठी पुढे आलेले नसल्यामुळे आरोप सिद्ध होत नसल्याचा समितीचा अहवाल आलेला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :–**

समितीने दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने तसेच आयुक्त , अमरावती महानगरपालिका आणि नगरविकास विभाग यांची दिनांक ३० मे २०१७ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या संदर्भात स्वतंत्र नोंदवही का ठेवण्यात आली नाही तसेच, गट अ ते गट ड यामध्ये ३० टक्के महिला आरक्षणानुसार किती पदे रिक्त आहेत याबाबत विचारणा केली असता आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी अमरावती महानगरपालिकेची सेवा प्रवेश नियमावली आकृती बंध मंजूर नव्हत्या त्या सेवा प्रवेश आकृतीबंधाबरोबर महासभेशी मान्यता घेऊन शासनास तो प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून महापालिकेत स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नसून स्वतंत्र रोस्टर ठेवले आहे. व ते संवर्गनिहाय तयार करण्यात आले आहे. सेवाप्रवेश व आकृतीबंध यांना शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर वर्ग ३ ची १५६ आणि वर्ग ४ यांची १४७ ही पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने पाठपुरवठा करण्यात येईल असे समितीला सांगितले याबाबत समितीने वरील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी महानगरपालिकेने शासनाकडे सतत पाठपुरावा करून समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे **याबाबत लवकरात लवकर शासनाची पद भरतीच्या प्रस्तावास मान्यता घेऊन महिलांकरिता रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीला कळविण्यात यावा.**

**३.२. अमरावती महानगरपालिकेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक :-**

दिनांक २० ऑगस्ट २०१५ रोजी महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी महानगरपालिका, अमरावती यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली होती.

महानगरपालिकेचे गत तीन वर्षांतील वर्षनिहाय सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे आहे? शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५% निधी महिला व बाल कल्याण विभागासाठी राखून ठेवण्यात येतो. त्या

अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेत मागील ३ वर्षांत सदरहू ५ % निधी कसा खर्च करण्यात आला आहे? महानगरपालिकेमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता देण्यात येणाऱ्या सोई-सवलती इ. योजनांबाबत माहिती देण्यात यावी. उक्त योजनांवर सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षांत व वर्षनिहाय व योजना एकूण किती खर्च झाला? महानगरपालिकेच्या एकूण उत्पनाच्या किती टक्के रक्कम महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत खर्च करण्यात येते? अशी विचारणा केली.

**उपरोक्त प्रकरणी अमरावती महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

अ) सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील वार्षिक अंदाजपत्रक बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

(आकडेवारी कोटीत)

| सन | वार्षिक अंदाजपत्रक (कोटीमध्ये) |
|---|---|
| २०१२-१३ | २६२.४५ |
| २०१३-१४ | ३५४.०० |
| २०१४-१५ | ३२५.३० |

ब) शासन धोरणानुसार प्रत्येक महानगरपालिकेत महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी खालील प्रमाणे राखून ठेवण्यात आले आहे. (आकडेवारी कोटीत)

| सन | वार्षिक अंदाजपत्रक (कोटीमध्ये) |
|---|---|
| २०१२-१३ | ०.७० |
| २०१३-१४ | ०.७० |
| २०१४-१५ | १.०० |

**ब)** **सन २०१२-१३**

| अ.क्र. | योजना/कार्यक्रम | खर्च (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १) | महिलांकरिता समुपदेशन केंद्र चालविणे. | ०.८० |
| २) | महिला/मुलींना संगणकाचे (MSCIT) प्रशिक्षण देणे | ६.३० |
| ३) | महिला/मुलींना संगणकाचे (DTP) प्रशिक्षण देणे | १.९८ |
| ४) | महिला/मुलींना विविध व्यवसायाचे कौशल्यवृद्धी प्रशिक्षण देणे | १४.८८ |
| ५) | महाविद्यालयीन युवतींकरिता जीवनाच्या उंबरठ्यावर कार्यशाळेचे आयोजन करणे. | १.२६ |
| ६) | महिलांकरिता हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी शिबीर आयोजीत करणे. | ०.२० |
| ७) | लहान मुलांकरिता विविध वार्डामध्ये खेळणी साहित्य बसविणे. | २३.११ |

**नाविन्यपूर्ण योजना**

स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिका अमरावती महानगरपालिका नाविण्यपूर्ण उपक्रम राबवित आहे व त्यामध्ये ५० टक्के महिलांकरिता आरक्षण आहे.

**सन २०१३-१४**

| अ.क्र. | योजना/कार्यक्रम | खर्च (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १) | महिलाकरिता समुपदेशन केंद्र चालविणे. | ०.८० |
| २) | अंगणवाडी केंद्रातील लहान मुलांना शारीरीक व बौध्दीक विकासाकरिता खेळणी पुरविणे. | ५.९२ |
| ३) | ३ जानेवारी २०१४, सावित्रीबाई फुले जयंतीदिनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे. | १.०० |
| ४) | महिला/ मुलींना विविध व्यवसायाचे कौशल्यवृध्दी प्रशिक्षण देणे. | ४.३९ |
| ५) | जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम | ०.११ |
| ६) | अपंग मुले/व्यक्ती यांना ३ चाकी सायकली पुरविणे. | ०.०८ |
| ७) | महिला/मुली यांना पोलीस सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण देणे. | ६.३० |
| ८) | अपंग मुले, महिला व व्यक्ती यांना विविध साहित्य बसविणे/ पुरविण्याचे शिबिराचे आयोजन करणे. | ५.४७ |

**सन २०१४-१५**

| अ.क्र. | योजना/कार्यक्रम | खर्च (लक्ष रुपये) |
|---|---|---|
| १) | महिलाकरिता समुपदेशन केंद्र चालविणे | ०.८० |
| २) | बाल आनंद महोत्सव | २.९८ |
| ३) | ३ जानेवारी २०१४ सावित्रीबाई फुले जयंतीदिनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे | १.२० |
| ४) | महिला/मुलींना विविध व्यवसायाचे कौशल्यवृद्धी प्रशिक्षण देणे | १.६० |
| ५) | लहान मुलांकरिता शाळेमध्ये व इतर खेळणी बसविणे | २०.५८ |
| ६) | अपंग मुले/व्यक्ती यांना ३ चाकी सायकली पुरविणे | ०.८० |
| ७) | जागतिक महिला दिन, मेळावा व रोजगार मार्गदर्शन कार्यक्रम | १.२६ |
| ८) | महिला व मुलींना तांत्रिक प्रशिक्षण (ॲडव्हान्स) | ५.०६ |
| ९) | झोपडपट्टी भागातील युवतींकरिता रक्त क्षय आजारावर मार्गदर्शन व तपासणी | ०.५० |

महानगरपालिका मार्फत सवलती उपलब्ध नसून राज्य शासन केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजने अंतर्गत बचत गटाबाबत महिलांना शासनाच्या योजना पुरविल्या जाते व महिलांकरिता विविध स्वंयरोजगार व लघुउद्योग प्रशिक्षण कार्यक्रम व प्रशिक्षण मेळावे आयोजित करणे. सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षांत व वर्षनिहाय व योजनानिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.

| २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|
| ३३.९१ | ३९.०९ | ५१.७७ |

महानगरपालिकेच्या एकूण महसुली उत्पन्नामधून बांधिल खर्च जसे आस्थापना खर्च पेट्रोल डिझेल, निवृत्ती वेतन, दुरुस्ती देखभाल वगळता उर्वरित उत्पन्नाच्या ५% रक्कम तरतूद महिला व बालकल्याणकारी योजनेकरिता ठेवण्यात येत आहे.

**अमरावती महानगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष -**

अमरावती महानगरपालिकेचे सन २०१२-१३ चे एकूण अंदाजपत्रक २६२.४५ कोटी रुपयांचे होते. त्यापैकी महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्के प्रमाणे ७० लाख रुपये तरतूद करण्यात आली होती. परंतु यापैकी फक्त ३३ लाख ९१ हजार रुपये खर्च केल्याचे नमूद केले आहे. सन २०१३-१४ चे

अंदाजपत्रक ३५४ कोटी रुपयांचे होते. त्यापैकी महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्के प्रमाणे ७० लाख रुपये तरतूद करण्यात आली होती. परंतु यापैकी फक्त ३९ लाख ९ हजार रुपये खर्च केल्याचे नमूद केले आहे आणि सन २०१४-१५ चे अंदाजपत्रक ३२५.३० कोटी रुपयांचे होते. त्यापैकी महिला व बाल कल्याण विभागासाठी ५ टक्के प्रमाणे १ कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती. परंतु यापैकी फक्त ५१ लाख ३७ हजार रुपये खर्च केल्याचे नमूद केले आहे. महिला व बाल कल्याण समितीच्या शिफारशीनुसार हा खर्च करण्यात आला आहे काय ? महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता खर्च केली जाते ? महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता शासन निर्णयानुसार एकूण बजेटच्या ५ टक्के रक्कम तरतूद करणे आवश्यक असताना कमी तरतूद का करण्यात आली ? सदर रक्कम दुसऱ्या प्रयोजनाकरिता का वापरण्यात आली ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी त्या काळात वार्षिक अंदाजपत्रक तयार करीत असताना शासन निर्णयानुसार कार्यवाही केली नसल्यास संबंधितांविरुद्ध प्रशासकीय कारवाई केली जाईल असे सांगितले.

मुख्य लेखाधिकारी यांनी महानगरपालिकेच्या एकूण महसुली उत्पन्नातून आस्थापना खर्च, पेट्रोल, डिझेल, निवृत्ती वेतन, देखभाल व दुरुस्ती अशा प्रकारचा बांधिल खर्च वगळता उर्वरित उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरिता खर्च केली जाते. तसेच, मागील वर्षी महानगरपालिकेचे एकूण महसूली उत्पन्न १२० ते १३० कोटी रुपये होते, असे समितीस सांगितले.

समितीने फायबर टॉयलेटकरिता २.९१ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्यात भ्रष्टाचार झाल्याबाबत तक्रारी करण्यात आल्या आहेत. तसेच, सदर टॉयलेट बंद स्थितीत असून यावर केलेला खर्च वाया गेल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यावर, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी २.९१ लक्ष रुपये खर्च करून महिलांकरिता फायबर टॉयलेट बांधण्यात आले होते. सदर टॉयलेट बांधण्याकरिता साधारणतः ७५ हजार रुपयांपर्यंत खर्च होणे अपेक्षित होते. परंतु तसे घडले नाही. याप्रकरणी चौकशी केली असता दोषी आढळून आलेल्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना अद्याप जामीन मिळालेला नाही. तसेच, त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे असे समितीस सांगितले.

महानगरपालिका मार्फत सवलती उपलब्ध नसून राज्य शासन केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजने अंतर्गत बचत गटाबाबत महिलांना शासनाच्या योजना पुरविल्या जाते व महिलांकरिता विविध स्वंयरोजगार व लघुउद्योग प्रशिक्षण कार्यक्रम व प्रशिक्षण मेळावे आयोजित करणे.

सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या तीन वर्षात व वर्षनिहाय व योजनानिहाय माहिती खालील प्रमाणे आहे.

| २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|
| ३३.९१ | ३९.०९ | ५१.७७ |

शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार महानगरपालिका, अमरावती मध्ये महिलांकरीता खालील कल्याणकारी योजना नियमितपणे राबविण्यात येत आहेत.

१. जननी सुरक्षा योजना.

२. सवित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना.

३. कुटुंब कल्याण योजना.

४. अर्श क्लिनीक

५. आरसीएच कॅम्प्स.

६. जननी शिशु सुरक्षा योजना.

७. महिलांची हिमोग्लोबीन तपासणी.

**विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे लेखी माहिती दिली.**

महसूली उत्पन्न, बांधील खर्च, महिला व बालविकास कल्याणासाठी करण्यात आलेली तरतूद, त्याची टक्केवारी याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

| वर्ष | एकूण महसूली उत्पन्न | एकूण बांधील खर्च | बांधिल खर्च वजा करुन येणारे उत्पन्न | महिला व बालविकास-साठी करावयाची प्रत्यक्ष तरतूद | महिला व बालविकास-साठी करण्यात आलेली प्रत्यक्ष तरतूद | रकाना क्र.४ व त्याअनुषंगाने करण्यात आलेली तरतूद याची टक्केवारी | प्रत्यक्षात झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ३५४.०० | ३३५.०३ | १८.९७ | ०.९४८५ | ०.७० | ३.६९% | ०.३९ |
| २०१४-१५ | ३२५.३० | २९८.८२ | २६.४८ | १.३२४० | १.०० | ३.७८% | ०.५१ |
| २०१५-१६ | २२२.४१ | १८२.०२ | ४०.३९ | २.०१९५ | १.०० | २.४८% | ०.१८ |
| २०१६-१७ | २८६.२४ | १०४.४० | १८१.८४ | ९.०९२० | ३.०० | १.६५% | ०.३२ |

शासन धोरणानुसार (शा.नि.क्र.जीईएन-१०९३/११९८/नवि-१४, दिनांक १४ जुलै, १९९३ नुसार) बांधील खर्च वगळून व महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार महिलांच्या विकासासाठी अमरावती महानगरपालिकेने वरीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

या प्रयोजनार्थ महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत याबाबतचे प्रस्ताव महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेसाठी प्रशासनाकडून सादर करण्यात येतात. समितीच्या मान्यतेनुसार सदरची कामे पूर्ण केली जातात.

कार्यवृत्तात नमूद गार्डनवरील खर्च हा उपरोक्त महिला व बालविकास याकरीता उपलब्ध निधीतून करण्यात आलेला नाही. इतिवृत्तात नमूद खर्च हा आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांजकडून प्राप्त निधीतून व दिनांक १२ मार्च, २०१३ च्या आदेशान्वये दिलेल्या निकषानुसार करण्यात आला आहे.

याशिवाय महानगरपालिकेच्या स्वनिधीतून, महिलांचे आरोग्य संवर्धन करुन त्यांचा शारीरिक व मानसिक विकास साधण्याकरीता सन २०१५-२०१६ मध्ये रु.१.८२ कोटी खर्च करुन शहरात ५६ बगीच्यामध्ये ग्रीन जीमची व्यवस्था करण्यात आली आहे.

महानगरपालिकेत विविध स्त्रोतातून प्राप्त होणारे उत्पन्न व महानगरपालिकेची आर्थिक क्षमता इ. विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत महिला व बालविकास या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पात तरतूद केली जाते.

या प्रयोजनार्थ महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत याबाबतचे प्रस्ताव महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेसाठी प्रशासनाकडून सादर करण्यात येतात. समितीच्या मान्यतेनुसार सदरची कामे पूर्ण केली जातात.

अमरावती महानगरपालिका अंतर्गत महानगरपालिकेच्या मालकीची एकूण व्यापारी संकुले - २७

यामध्ये एकूण गाळयांची संख्या - १०७५

यापैकी महिलांना वितरीत गाळयांची संख्या - १३०

महिला संस्था / महिला बचत गट यांना (प्रत्येकी १ प्रमाणे) वितरीत गाळयाची संख्या - २

सदरच्या गाळयाचे वाटप हे शासन निर्णयापूर्वीचे म्हणजेच वर्ष २००१ पूर्वीचे आहे.

या संकुलातील गाळे वाटपाचा २५ वर्षाकरीता करारनामा करण्यात आलेला आहे.

यापुढे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या गाळयांच्या संदर्भात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

समितीने अमरावती महानगरपालिकेमध्ये सुवर्ण जयंती रोजगार योजनेअंतर्गत कोणते प्रशिक्षण देण्यात आले आहे, प्रशिक्षण कोठे आयोजित करण्यात आले याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. सदर

प्रशिक्षणाची आयुक्तांनी संपूर्ण चौकशी केली आहे काय, त्यामध्ये कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत, दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली आहे याची माहिती देण्यात यावी अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी हा विषय जुना आहे. समितीच्या म्हणण्यानुसार चौकशी करण्यात आली आहे. संचालक, नगर प्रशासन संचालनालय यांनी मनपा आयुक्तांकडे सन २०१४ मध्ये शिफारस केली होती. उद्योग लक्ष्मी, पुणे या संस्थेच्या माध्यमातुन हा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रशिक्षणबद्दल अडचण नव्हती . जे सहभागी होते त्यांना हॉटेल ताजमध्ये जेवू घातले असा त्यात एक मुद्दा होता. तक्रारीचे स्वरुप असे होते की, एपीएलच्या महिलांना त्यात इन्हॉल्व्ह करुन घेतले नव्हते . मुळात हे प्रशिक्षण बीपीएल घटकातील महिला बचत गटांसाठी होते. यात काही महिलांना सामील व्हायचे होते. पंरतु तत्कालीन आयुक्तांनी त्यांना सामील करुन घेतले नाही अशी पार्श्वभूमी आहे. समितीने केलेल्या सूचनेनुसार मी पुन्हा स्वतंत्र अहवाल सादर करतो, असे समितीस सांगितले.

दिनांक ३० मे, २०१७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी सदस्यांनी “ताज हॉटेल प्रशिक्षण” यासंदर्भात आवश्यक ती चौकशी करुन १५ दिवसात समितीस अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांना निदेश दिले होते. सदरहू निदेशाच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेचा दिनांक १९/०६/२०१७ च्या पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला असून या अहवालानुसार असलेली वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे -

- सदरहू प्रशिक्षण कार्यक्रम नगरपंचायत संचालनालयाच्या सुचनेनुसार आयोजित करण्याबाबत आदेश होते.

- त्यानुसार, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथील आंतरराष्ट्रीय मार्केटींग स्टडी टूर कॉन्फरन्स Enterpreneur Development Education and Business Foundation करीता दिनांक २० जून, २०१४ रोजी अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.

- सदरहू अभ्यास दौरा हा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या पत्रात नमूद केल्यानुसार, उद्योगलक्ष्मी, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात आला होता.

सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत अभ्यास दौरा / उद्योजक कार्यशाळा महिलांची कौशल्य आणि उद्योजकता क्षमता वाढविणे, व्यवसाय विकास, वित्त आणि कर्ज पुरवठा, घरगुती उद्योगांना उत्तेजन, फिरत्या सामान खरेदी केंद्रासाठी योग्य ते उत्तेजन फेरीवाल्यांच्या बाजारांना उत्तेजन फिरत्या बिझनेस सेंटर तर्फे उद्योगासाठी तंत्रज्ञानाची जोड निर्माण करणे, घरगुती उद्योगासाठी मायक्रो बिझनेस सेंटर तर्फे उद्योगासाठी जागा(शेड) पुरवण्याची व्यवस्था करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रासाठी मायक्रो बिझनेस सेंटर्स तयार करणे इ. कार्येक्रम राबविण्याचे नमुद आहे.

यासंबंधातील शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूची दिनांक १५ जून, २००९ नुसार दारिद्रय रेषेखालील महिलांचाच समावेश या कार्यशाळेत करण्यात आला होता. या कार्यशाळेत नोंदणीकृत नसलेले अथवा

महापालिकेकडून अथवा शासन निर्णयानुसार स्थापित नसलेले ए.पी.एल. बचत गटातील महिलांचा समावेश तत्कालीन आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी केला नाही, म्हणून आरोप प्रत्यारोप करुन विविध शंकेचे वातावरण निर्माण झाले.

ताज पॅलेस, मुंबई ही एक भारत सरकारची, ऐतिहासिक इमारत (हेरीटेज) असून, सदरचे हॉटेल हे जगातील एक नामांकित हॉटेल आहे. ज्या पद्धतीने या हॉटेलची स्थापना झाली व ते आज नावारुपास आले, त्यावरुन या महिलांना स्फुर्ती मिळावी यासाठी त्याचप्रमाणे गरीब घरातील महिला सुद्धा जास्तीत जास्त प्रमाणात खाद्य पदार्थ, कॅटरीन, मेस इ. व्यवसाय करीत असून त्यांना त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी उपयोग व्हावा यादृष्टीने तसेच वेळेचे व्यवस्थापन करीत असून, त्यांना त्यांच्या वाढीसाठी उपयोग व्हावा यादृष्टीने तसेच वेळेचे महत्त्व व शिक्षणाचे महत्त्व कळावे, त्यांच्या उद्योजकीय कार्यक्षमतेत वाढ व्हावी यासाठी या कार्यशाळेची मदत झालेली असल्याचे दिसून येते.

सदरचा कार्यक्रम हा नियमानुसार तसेच तत्कालीन आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली व उपायुक्त यांचे नियंत्रणात झालेला असून, या कार्यक्रमाचे प्रत्येक देयक लेखा विभाग व लेखा परिक्षण विभाग, अमरावती महानगरपालिका यांचेमार्फत आयुक्त यांचे मंजूरीने पुर्तता झालेली आहे, असे निदर्शनास येते.

सदरची कार्यशाळा सुवर्णजयंती योजनेचा एक भाग म्हणून झालेले असल्याने, या कार्यशाळेसाठी जो काही खर्च झालेला आहे त्याचे लेखापरिक्षण, जिल्हाधिकारी कार्यालय (डुडा) मार्फत महालेखापाल कार्यालयाकडून येणाऱ्या वर्षनिहाय पथकाने केलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही ही आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, यांचे परिपत्रकात नमूद केल्यानुसार व शासनाच्या मार्गदर्शक सुचीनुसार झालेली असल्याचे दिसून येते असे चौकशी अहवालात नमूद केले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

अमरावती महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक

३० मे, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अमरावती महानगरपालिकेमध्ये महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरीता शासन निर्णयानुसार ५ टक्के रकमेची तरतूद करणे आवश्यक असताना यासाठी कमी रकमेची तरतूद का करण्यात आली, सदर रक्कम कोणत्या प्रयोजनार्थ वापरण्यात आली, याप्रकरणी दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे अशी विचारणा केली.

त्यावर, आयुक्त यांनी शासन निर्णयाप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये रुपये ७० लक्ष तरतूद असावयास हवी होती. परंतु त्यावर्षी ३.६९ टक्के एवढा खर्च झालेला आहे. सन २०१४-१५ मध्ये रुपये १ कोटी रुपयांची तरतूद असून खर्चाची टक्केवारी ७८ टक्के आहे. सन २०१५-१६ मध्ये खर्चाची तरतूद १ कोटी

असून खर्चाची टक्केवारी २.४८ टक्के इतकी आहे. तीन वर्षाचा खर्च पाहिल्यानंतर असे दिसून येते की, तो ३५ टक्के खर्च झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे असे समितीस सांगितले.

समितीने अमरावती महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी व्यापारी संकुलातील वितरीत होणाऱ्या गाळयांपैकी ३० टक्के गाळे स्वयंसहायित्त गटांसाठी राखून ठेवण्याबाबतचा शासन निर्णय असतानाही प्राधान्याने महिला बचत गटांना गाळयांचे वाटप का करण्यात आले नाही ? अशी विचारणा केली.

त्यावर आयुक्त यांनी महानगरपालिकेतर्फे सन १९८३ ते सन २००१ पर्यंत १०७५ गाळे बांधण्यात आलेले आहेत. या गाळयाचे वितरण ३० वर्षाकरीता करण्यात आलेले आहे. पूर्वीचे करार संपल्यानंतर गाळे वाटप करताना ३० टक्के गाळे महिलांना देण्याबाबत विचार करण्यात येईल, काही गाळयांची मुदत २०१८ मध्ये, २०२० मध्ये संपत असल्याने यापुढे महिलांना गाळे प्राधान्याने देण्याचा विचार करण्यात येईल. तसेच, १०७५ गाळयांपैकी १३० गाळे रुटीन प्रोसेस मधून महिलांना वितरीत करण्यात आले आहे असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने अमरावती महानगरपालिकेला दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी भेट देऊन सन २०१२-१३, सन २०१३-१४, सन २०१४-१५ चे या वर्षातील अंदाजपत्रकाबाबत विचारणा केली त्याबाबत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने आणि दिनांक ३० मे, २०१५ रोजी साक्षीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने तरतूद करण्यात आलेल्या निधीच्या केलेल्या खर्चाबाबत विचारणा केली असता आयुक्त महानगरपालिका अमरावती यांनी महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नातून आस्थापना खर्च पेट्रोल, डिझेल, निवृत्तीवेतन व दुरुस्ती अशा प्रकारचा बांधिल खर्च वगळता उर्वरित उत्पन्नाच्या ५ टक्के रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरीता खर्च केली जाते अशी माहिती दिली. तसेच, समितीने फायबर टॉयलेटरवर २.९१ लक्ष इतकी अंदाजपत्रक तयार करुन त्यावर जो खर्च करण्यात आला त्यासंदर्भात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे काय अशी समितीने विचारणा केली असता आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी २.९१ लक्ष खर्च करुन महिलांकरीता फायबर टॉयलेट बांधण्यात आले होते. सदर टॉयलेटरवर साधारणतः रु.७५०००/- पर्यंत खर्च होणे अपेक्षित असताना त्याप्रमाणे खर्च न होता अधिकचा खर्च झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे चौकशी करुन दोषी आढळून आलेल्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्यापपर्यंत त्यांना जामीन मिळाला नाही तसेच त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे अशी समितीस माहिती दिली. **याबाबत फायबर टॉयलेट बांधण्याप्रकरणी जे अधिकारी दोषी आढळून आले आहे याबाबत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित दोषींवर प्रशासकीय कारवाई करुन सेवेतून निलंबित करण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. सध्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कार्यवाहीची स्थिती काय आहे त्यांचेविरुद्ध चौकशी प्रलंबित असल्यास ती तातडीने पूर्ण करुन त्यादृष्टीने कारवाई**

**करावी. तसेच, फौजदारी प्रकरण देखील तातडीने निकाली काढावे तसेच, निश्चित केलेल्या अहवाल वर्षात महानगरपालिकेने तिच्या एकूण उत्पन्नाच्या (महसुली खर्च वजा जाता) ५% रक्कम शासन निर्णयानुसार महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांवर खर्च केलेले नाहीत. याबाबतचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

अमरावती महानगरपालिकेचे तीन वर्षाचे आर्थिक अंदाजपत्रक पाहिले असता सदर अंदाजपत्रकातील प्रत्यक्षात झालेला खर्च व केलेल्या तरतुदीपेक्षा फारच कमी झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. महानगरपालिकेने महिलांचे आरोग्य संवर्धन तसेच महिलांच्या कल्याणकारी योजना यावर प्रत्येक वर्षी प्राप्त झालेल्या तरतुदीमधून केवळ ७० टक्के ते ८० टक्के एवढी रक्कम खर्च करण्याचे उद्दीष्ट ठेवलेले असतानाही त्याहीपेक्षा कमी रक्कम महिलांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात आल्याचे दिसून येते याबाबत समिती तीव्र नापंसती व्यक्त करते व अमरावती महानगरपालिकेने आपल्या एकूण अंदाजपत्रकांपैकी जो निधी ५ टक्के महिलांच्या कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक असताना संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे खर्च केली नसल्यामुळे त्यांची चौकशी करून त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करावी व यापुढे उक्त ५ टक्के रक्कम नियमानुसार खर्च करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

त्याचवेळी समितीने अमरावती महानगरपालिकेने सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत सन २०१४ मध्ये जो प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता त्यावर सुमारे ३३ लक्ष रुपये खर्च केलेला आहे. त्यासंबंधात समितीने नापंसती व्यक्त करून याबाबतची चौकशी करून समितीने अहवाल साक्षीच्या वेळी सादर करावा असे निदेश दिले होते. त्यानुषंगाने दिनांक १९ जून, २०१७ च्या पत्रान्वये आयुक्त , अमरावती महानगरपालिका यांनी समितीस अहवाल सादर केला. या योजनेअंतर्गत अभ्यास दौरा, उद्योजक कार्यशाळा यात महिलांची कौशल्या वा उद्योजक क्षमता वाढविणे, व्यवसाय विकास, वित्त, कर्ज पुरवठा, घरगुती उद्योगांना उत्तेजन, फिरत्या सामान खरेदीसाठी योग्य ते मार्गदर्शन, फिरत्या बिझनेस सेंटर तर्फे उद्योगासाठी तंत्रज्ञानाची जोड निर्माण करणे इ. कार्यक्रम राबिवण्याचे नमूद केले होते. तसेच, या कार्यशाळेत दारिद्रय रेषेखालील महिलांचा समावेश करण्यात आला होता. ही कार्यशाळा तत्कालीन आयुक्त यांचे मागदर्शनाखाली आणि उपायुक्त यांच्या नियंत्रणात झालेला असून यांचे लेखापरीक्षण जिल्हाधिकारी कार्यालय यांचेमार्फत झालेले आहे असे चौकशी अहवालात नमूद केले आहे. यावरुन असे लक्षात येते की, अमरावती महानगरपालिका महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी जे प्रशिक्षण कार्यक्रम राबविते त्या प्रशिक्षणावरच जास्त खर्च केला असल्याचे व इतर योजनांवर तुरळक खर्च केला असल्याचे दिसून येते. सुमारे ३३ लक्ष खर्च ताज हॉटेलची फेरी मारुन येण्यात व्यर्थ खर्च केली त्याउलट इतर योजनांवर काहीही खर्च केला नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

महानगरपालिकेने यापुढे महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, प्रशिक्षण तसेच महिला बचत गटांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणारे गाळे, महिलांना संगणक प्रशिक्षण, शिलाई मशिन प्रशिक्षण इ. देण्याबाबत महिलांचा ५ टक्के निधी शासन निर्णयानुसार खर्च करावा व त्यांना शिलाई तसेच स्वावलंबनासाठी आवश्यक बाबी पुरविण्यावर भर द्यावा व महिलांना सक्षम करावे तसेच महिलांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत काढण्यात येणाऱ्या दौऱ्यावर दौऱ्याच्या फलनिश्चितीचा अंदाज घेऊन इतर योजनांवर दुर्लक्ष होणार नाही याची खबरदारी घेऊन प्रशिक्षणांच्या कार्यवृत्तावर खर्च करताना संबंधित उद्योगधंदे किंवा लघुउद्योग उभे असल्याशिवाय किंवा त्यासाठी तरतूद केल्याशिवाय असे प्रशिक्षणासाठी दौरे आयोजित करण्यात येऊ नये व त्यावर जास्त प्रमाणात खर्च करण्यात येऊ नये अशी समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करण्यात यावा.

# परिशिष्ट - " अ " माहिती

## जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपाच्या वर्ग-१ ची मंजुर , भरलेल्या व रिक्त पदांबाबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | त्यापैकी महिला अधिकारी / कर्मचारी संख्या | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | |
| | **१. सामान्य प्रशासन विभाग** | | | | | | | | | | |
| १ | अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| २ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| ३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| ४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.वा.क.) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| ५ | गट प्रमुख जलस्वराज प्रकल्प | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| ६ | प्रकल्प संचालक, ग्रामिण विकास यंत्रणा | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| ७ | गट विकास अधिकारी वर्ग-१ | ०० | ०७ | ०७ | ०० | ०६ | ०६ | ०० | ०८ | ०० | |
| | **२. कृषी विभाग** | | | | | | | | | | |
| ८ | कृषि विकास अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | **३. पशुसंवर्धन विभाग** | | | | | | | | | | |
| ९ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | **४. वित्त विभाग** | | | | | | | | | | |
| १० | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | |
| ११ | वरिष्ठ लेखाधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | **५. आरोग्य विभाग** | | | | | | | | | | |
| १२ | जिल्हा आरोग्य अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| १३ | अति. जिल्हा आरोग्य अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| १४ | जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | **६. ग्रामिण पाणी पुरवठा** | | | | | | | | | | |
| १४ | कार्यकारी अभियंता | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. बांधकाम विभाग | | | | | | | | | | | |
| १५ | कार्यकारी अभियंता | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| ८. लघुसिंचन विभाग | | | | | | | | | | | |
| १६ | कार्यकारी अभियंता | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| ९. शिक्षण विभाग | | | | | | | | | | | |
| १७ | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| १८ | शिक्षणाधिकारी (माध्य.) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| १९ | शिक्षणाधिकारी (निरंतर) | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| १०. समाजकल्याण विभाग | | | | | | | | | | | |
| २० | समाज कल्याण अधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | |
| | एकुण | ०८ | १३ | २१ | ०७ | ०७ | १४ | ०० | ०० | ०० | |

## जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपाच्या वर्ग-२ ची मंजुर , भरलेल्या व रिक्त पदांबाबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | त्यापैकी महिला अधिकारी / कर्मचारी संख्या | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | |
| | १. सामान्य प्रशासन विभाग | | | | | | | | | | |
| १ | गट विकास अधिकारी वर्ग २ | ०० | ०८ | ०८ | ०० | ०७ | ०७ | ०० | ०० | ०० | |
| २ | बाल विकास प्रकल्प अधिकारी | ०० | ०८ | ०८ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०० | ०० | |
| ३ | सहा.प्रकल्प अधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | |
| | २. कृषी विभाग | | | | | | | | | | |
| ४ | जिल्हा कृषी अधिकारी | ०२ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | |
| ५ | जिल्हा मोहिम अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | ३. पशुसंवर्धन विभाग | | | | | | | | | | |
| ६ | पशुधन विकास अधिकारी | ३९ | ०० | ३९ | ३७ | ०० | ३७ | ०२ | ०० | ०२ | |
| | ४. वित्त विभाग | | | | | | | | | | |
| ७ | लेखाधिकारी | ०० | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | ५. आरोग्य विभाग | | | | | | | | | | |
| ८ | वेद्यकीय अधिकारी | १०१ | ०० | १०१ | ८६ | ०० | ८६ | ११ | ०० | ११ | |
| ९ | प्रशासकीय अधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | | | ०० | |
| १० | सांख्यिकी अधिकारी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | ६. ग्रामिण पाणी पुरवठा विभाग | | | | | | | | | | |
| ११ | उप अभियंता | ०६ | ०० | ०६ | ०४ | ०० | ०४ | ०० | ०० | ०० | |
| १२ | सहा. भुवेज्ञानीक | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| १३ | कनिष्ठ भुवेज्ञानीक | ०२ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०१ | ०० | ०० | |
| | ७. बांधकाम विभाग | | | | | | | | | | |
| १४ | उप अभियंता | ०३ | ०० | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | उप कार्यकारी अभियंता | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| | ८. लघुसिंचन विभाग | | | | | | | | | | |
| १५ | उप अभियंता | ०५ | ०० | ०५ | ०३ | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. शिक्षण विभाग | | | | | | | | | | | |
| १६ | उप शिक्षणाधिकारी | ०० | ०४ | ०४ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| १७ | अधिक्षक वर्ग-२ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| १८ | गट शिक्षणाधिकारी | ०० | ०७ | ०७ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०० | ०० | |
| १९ | लेखाधिकारी | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| २० | अधिक्षक शा.पो.आ. | ०० | ०७ | ०७ | ०० | ०५ | ०५ | ०० | ०१ | ०१ | |
| २१ | मुख्याध्यापक | ०० | ०७ | ०७ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०२ | |
| | एकुण | १३२ | ४७ | २०९ | १३७ | २६ | १६३ | २२ | ०४ | २५ | |

# जिल्हा परिषद, अकोला

## जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपाच्या वर्ग-३ ची मंजुर, भरलेल्या व रिक्त पदांबाबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | | महिलांकरिता ३० % नुसार | | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | सरळ सेवेची एकुण मंजुर पदे | महिलांकरिता राखीव पदे | त्यापैकी भरलेली पदे | रिक्त पदे | |
| | **१. शिक्षण विभाग** | | | | | | | | | | | | | | |
| १ | अधिव्याख्याता (मराठी) | .०० | २० | २० | .०० | १४ | १४ | .०० | ०६ | ०६ | १७ | ०५ | ०१ | ०४ | |
| २ | अधिव्याख्याता (उर्दु) | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०० | ०१ | |
| ३ | माध्य.शिक्षक उ.श्रे.(मराठी) | ०० | ५२ | ५२ | ०० | ५१ | ५१ | ०० | ०१ | ०१ | ४२ | १२ | २५ | ०० | |
| ४ | माध्य.शिक्षक उ.श्रे.(उर्दु) | ०० | २७ | २७ | ०० | २८ | २८ | ०० | +१ | +१ | १९ | ०५ | ११ | ०० | |
| ५ | माध्य.शिक्षक नि.श्रे.(मराठी) | ०० | ६५ | ६५ | ०० | ५० | ५० | ०० | १५ | १५ | ५० | १५ | १५ | ०० | |
| ६ | माध्य.शिक्षक नि.श्रे.(उर्दु) | ०० | ४० | ४० | ०० | ३६ | ३६ | ०० | ०४ | ०४ | २६ | ०७ | १७ | ०० | |
| ७ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | ०० | १५ | १५ | ०० | ०९ | ०९ | ०० | ०६ | ०६ | ११ | ०३ | ०३ | ०० | |
| ८ | कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) | ०० | १७ | १७ | ०० | ०३ | ०३ | ०० | १४ | १४ | ०४ | ०१ | ०० | ०१ | |
| ९ | प्रयोगशाळा सहायक | ०५ | ०० | ०५ | ०५ | ०० | ०५ | १+ | ०० | १+ | ०७ | ०२ | ०० | ०२ | |
| १० | प्राथ.शिक्षक (मराठी) | ०० | २९५३ | २९५३ | ०० | ३०४७ | ३०४७ | ०० | ०० | ०० | २८७७ | ८६३ | १३०६ | ०० | |
| ११ | प्राथ.शिक्षक (उर्दु) | ०० | ५२६ | ५२६ | ०० | ५०० | ५०० | ०० | ०० | ०० | ४९५ | १४८ | ११९ | २९ | |
| १२ | मुख्याध्यापक (मराठी) | ०० | १२९ | १२९ | ०० | १५३ | १५३ | ०० | ७४ | ७४ | ०० | ०० | ८८ | ०० | |
| १३ | मुख्याध्यापक (उर्दु)) | ०० | ३३ | ३३ | ०० | २९ | २९ | ०० | ०९ | ०९ | ०० | ०० | ०२ | ०० | |
| १४ | केंद्र प्रमुख | ०० | ८५ | ८५ | ०० | ६८ | ६८ | ०० | १७ | १७ | ०० | ०० | २१ | ०० | |
| | एकुण | ५ | ३९६५ | ३९७० | ५ | ३९९१ | ३९९६ | १+ | १४६ | १४४ | ३५५० | १०६२ | १६०८ | ३७ | |
| | **२. कृषी विभाग** | | | | | | | | | | | | | | |
| १५ | कृषि अधिकारी | १४ | ०० | १४ | १० | ०० | १० | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०१ | ०० | ०१ | |
| १६ | विस्तार अधिकारी (कृषी) | १५ | ०० | १५ | १२ | ०० | १२ | ०३ | ०० | ०३ | ०७ | ०२ | ०० | ०२ | |
| | एकुण | २९ | ० | २९ | २२ | ० | २२ | ७ | ० | ७ | ११ | ३ | ०० | २ | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३. आरोग्य विभाग | | | | | | | | | | | | | | |
| १७ | सहायक परिचारीका प्रसविका | २१५ | ०० | २१५ | १८० | ०० | १८० | ३५ | ०० | ३५ | २१५ | ६५ | १८० | ०० | |
| १८ | आरोग्य सेवक पुरुष | ११९ | ०० | ११९ | ९३ | ०० | ९३ | २६ | ०० | २६ | १०७ | ०० | ०० | ०० | |
| १९ | आरोग्य पर्यवेक्षक | १६ | ०० | १६ | १५ | ०० | १५ | ०१ | ०० | ०१ | ०४ | ०१ | ०० | ०१ | |
| २० | औषधी निर्माण अधिकारी | ३७ | ०० | ३७ | ३१ | ०० | ३१ | ०६ | ०० | ०६ | ३७ | ११ | ०३ | ०८ | |
| | आरोग्य सहायक | ४१ | ०० | ४१ | ४१ | ०० | ४१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | |
| | स्वास्थ अभ्यांगता | ३२ | ०० | ३२ | ३० | ०० | ३० | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ३० | ०० | |
| | एकुण | ४६० | ० | ४६० | ३९० | ० | ३९० | ७० | ० | ७० | ३६३ | ७७ | २१४ | ९ | |
| | ४. बांधकाम विभाग | | | | | | | | | | | | | | |
| २१ | कनिष्ठ अभियंता | ३७ | ०० | ३७ | २३ | ०० | २३ | १४ | ०० | १४ | २८ | ०८ | ०१ | ०७ | |
| २२ | स्थापत्य अभियांत्रीकी सहायक | ४५ | ०० | ४५ | २२ | ०० | २२ | २३ | ०० | २३ | ४९ | १५ | ०२ | १३ | |
| २३ | कनिष्ठ आरेखक | ०२ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०० | ०१ | |
| २४ | आरेखक | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | मुख्य आरेखक | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| | कनिष्ठ यांत्रीकी | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | |
| | जोडारी | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | |
| | एकुण | ८८ | ० | ८८ | ५० | ० | ५० | ३८ | ० | ३८ | ८१ | २४ | ३ | २१ | |
| | ५. ग्रामिण पाणी पुरवठा विभाग | | | | | | | | | | | | | | |
| २५ | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता | १६ | ०० | १६ | १५ | ०० | १५ | ०१ | ०० | ०१ | १६ | ०१ | ०१ | ०० | |
| | एकुण | १६ | ०० | १६ | १५ | ०० | १५ | ०१ | ०० | ०१ | १६ | ०१ | ०१ | ०० | |
| | ६. लघुसिंचन विभाग | | | | | | | | | | | | | | |
| २६ | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता | २४ | ०० | २४ | १८ | ०० | १८ | ०६ | ०० | ०६ | २४ | ०७ | ०३ | ०४ | |
| २७ | स्थापत्य अभियांत्रीकी सहायक | ०४ | ०० | ०४ | ०० | ०० | ०० | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०१ | ०० | ०१ | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | २८ | ० | २८ | १८ | ० | १८ | १० | ० | १० | २८ | ८ | ३ | ५ |
| | **७. सामान्य प्रशासन विभाग** | | | | | | | | | | | | | |
| २८ | कक्ष अधिकारी | ०० | १३ | १३ | ०० | १२ | १२ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| २९ | अधिक्षक | ०० | २६ | २६ | ०० | २४ | २४ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०० | ०४ | ०० |
| ३० | विस्तार अधिकारी (सांख्यिकी ) | ०० | १८ | १८ | ०० | १७ | १७ | ०० | ०१ | ०१ | १८ | ०५ | ०४ | ०१ |
| ३१ | लघुलेखक उच्चश्रेणी | ०० | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० |
| ३२ | लघुलेखक निम्नश्रेणी | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३३ | लघुटंकलेखक | ०० | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० |
| ३४ | वरिष्ठ सहायक (मंत्रा.) | ०० | ९३ | ९३ | ०० | ७४ | ७४ | ०० | १९ | १९ | २३ | ०७ | ०७ | ०० |
| ३५ | कनिष्ठ सहायक (मंत्रा.) | ०० | २२६ | २२६ | ०० | २०८ | २०८ | ०० | १८ | १८ | १६९ | ५१ | ३३ | १८ |
| ३६ | वाहन चालक | ८५ | ०० | ८५ | ५७ | ०० | ५७ | २८ | ०० | २८ | २१ | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ८५ | ३८३ | ४६८ | ५७ | ३४१ | ३९८ | २८ | ४२ | ७० | २३३ | ६३ | ४८ | १९ |
| | **८. पंचायत विभाग** | | | | | | | | | | | | | |
| ३७ | विस्तार अधिकारी (पंचायत) | २२ | ०० | २२ | २० | ०० | २० | ०२ | ०० | ०२ | ०७ | ०२ | ०२ | ०० |
| ३८ | ग्रामविकास अधिकारी | ६९ | ०० | ६९ | ५५ | ०० | ५५ | १४ | ०० | १४ | १७ | ०५ | १४ | ०० |
| ३९ | ग्रामसेवक | ३३९ | ०० | ३३९ | २९९ | ०० | २९९ | ४० | ०० | ४० | ३३९ | १०२ | ४० | ६२ |
| | एकुण | ४३० | ० | ४३० | ३७४ | ० | ३७४ | ५६ | ० | ५६ | ३६३ | १०९ | ५६ | ६२ |
| | **९. महिला व बालकल्याण विभाग** | | | | | | | | | | | | | |
| ४० | पर्यवेक्षीका | ०० | ४९ | ४९ | ०० | २९ | २९ | ०० | २० | २० | २५ | २५ | २९ | ०० |
| | एकुण | ०० | ४९ | ४९ | ०० | २९ | २९ | ०० | २० | २० | २५ | २५ | २९ | ०० |
| | **१०. वित्त विभाग** | | | | | | | | | | | | | |
| ४१ | सहायक लेखाधिकारी | ०० | १८ | १८ | ०० | १७ | १७ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० |
| ४२ | कनिष्ठ लेखाधिकारी | ०० | १२ | १२ | ०० | १२ | १२ | ०० | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०० |
| ४३ | वरिष्ठ सहायक (लेखा) | ०० | ३६ | ३६ | ०० | ३६ | ३६ | ०० | ०० | ०० | १७ | ०५ | ०३ | ०२ |
| ४४ | कनिष्ठ सहायक (लेखा) | ०० | २५ | २५ | ०० | २३ | २३ | ०० | ०३ | ०३ | १९ | ०६ | ०३ | ०३ |
| | एकुण | ० | ९१ | ९१ | ० | ८८ | ८८ | ० | ४ | ४ | ३९ | १२ | ८ | ५ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११. पशुसंवर्धन विभाग | | | | | | | | | | | | | | | |
| ४५ | सहा.पशुधन विकास अधिकारी | १६ | ०० | १६ | १५ | ०० | १५ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | |
| ४६ | पशुधन पर्यवेक्षक | ३९ | ०० | ३९ | ३८ | ०० | ३८ | ०० | ०० | ०० | ३९ | ०३ | ०२ | ०१ | |
| एकुण | | ५५ | ० | ५५ | ५३ | ० | ५३ | ०१ | ० | ०१ | ३९ | ०३ | २ | ०१ | |

## जिल्हा परिषद अकोला

### जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपाच्या वर्ग-४ ची मंजुर,भरलेल्या व रिक्त पदांबाबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | | महिलांकरिता ३० % नुसार | | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | तांत्रीक | अतांत्रीक | एकुण | सरळसेवेची एकुण मंजुर पदे | महिलांकरिता राखीव पदे | त्यापैकी भरलेली पदे | रिक्त पदे | |
| | | | | | | | **१. सामान्य प्रशासन विभाग** | | | | | | | | |
| १ | परिचर | ०० | ४९९ | ४९९ | ०० | ४४९ | ४४९ | ०० | ५० | ५० | ४९९ | १५० | ९१ | ५९ | |
| | | | | | | | **२. पशुसंवर्धन विभाग** | | | | | | | | |
| २ | पटटीबंधक | १४ | ०० | १४ | ०९ | ०० | ०९ | ०५ | ०० | ०५ | ०० | ०० | ०० | ०० | |
| | एकुण | १४ | ४९९ | ५१३ | ०९ | ४४९ | ४५८ | ०५ | ५० | ५५ | ४९९ | १५० | ९१ | ५९ | |

# परिशिष्ट - "ब"

# शासन निर्णय

**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००६/१२०७/प्र.क्र.०८/पंरा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जून, २००६.

**वाचा :-** १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :- झेडपीई-१०९२/प्र.क्र.३१८/०५, दिनांक ३.१२.१९९३.
२) शासन पत्र क्रमांक झेडपीई-१०९३/सीआर-४३९/०५, दिनांक २.९.१९९३.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :-झेडपीई-१०९४/सीआर-९६६/०५, दिनांक १२.८.१९९४.
४) शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०९३/सीआर-४३९/०५, दिनांक १२.१०.१९९३.
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:- झेडपीई-१०/२००१/प्र.क्र.२०६/०५, दिनांक ६.११.२००१.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये बदल /सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक जिल्हा परिषदांमधील लोकप्रतिनिधींना अशा योजनांबाबत फारशी माहिती नसल्यामुळे अथवा योजनेसाठी अत्यल्प तरतूद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी खालील योजना राबविण्याबाबत शासन आदेश देत आहे.

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-** शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, पब्लिक स्पिकिंग, आत्मविश्वास निर्माण, बालवाडी शिक्षिका, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, इ. मोबाईल दुरुस्ती, संगणक दुरुस्ती, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (full time domestic help), शासकीय व अशासकीय नोकरीसाठी प्रशिक्षण उदा. महिला हवालदार, ड्रायव्हर व कंडक्टर, विमा एजंट, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, पॅकेजिंग, फुडप्रोसेसिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, कचऱ्यापासून खतनिर्मिती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, शोभिवंत फुलझाडांची लागवड व विक्री, औषधी वनस्पतीचे उत्पन्न, इ. १४ वर्षे वय किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींना व शाळेतून गळती झालेल्या मुलींना अशा व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वतः भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

**२) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-** या योजनेमध्ये मुलींना कुंग्फू-कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

**<u>३) शाळेत जाणा-या मुलींना सायकल वाटप</u>** :- ज्या गावात शाळा नाही त्या गावातील मुलींना इतर गावातील माध्यमिक शाळेला जावे लागते. तसेच ज्या गावातून सदर माध्यमिक शाळेला जाण्यासाठी एसटी/बस सेवा उपलब्ध नाही, फक्त अशाच गावातील लाभार्थ्यांना सायकल वाटप करण्यात यावे. एसटी/बस सुविधेसंबंधी दाखला एसटी/बस डेपो व्यवस्थापकाकडून घेण्यात यावा. १०% लाभार्थीचा स्वहिस्सा असावा.

**<u>४) महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल</u>** :- जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत यामध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींना यशदा व इतर संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. म्हणून प्रशिक्षणासाठी स्वतंत्र योजनेची आवश्यकता नाही. मात्र चांगल्या योजनांची अंमलबजावणी पाहण्यासाठी अभ्यास सहल आयोजित करण्यास हरकत नाही. या योजनांवर प्रतिलाभार्थी दरवर्षी रु.२०००/- खर्च मर्यादा सुचविण्यात आली होती. याशिवाय एका वर्षात या योजनेवर एकूण खर्च रु.२०,०००/- पेक्षा अधिक करण्यात येऊ नये अशी अट जोडण्यात यावी.

**<u>५) आर्थिकदृष्टया गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर</u>** :- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील नोकरी करणा-या किंवा शेतावर कामासाठी जाणा-या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी या योजनेखाली पाळणाघर उपलब्ध करुन देता येईल. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य अश्या स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. यासाठी लाभार्थ्यांची निवड व किती अनुदान द्यावे याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्रामपंचायत यांनी ) निर्णय घ्यावा. पाळणाघर चालविण्यासाठी अटी :- १) योजनेचा खर्च, आयांच्या मानधनावर व मुलांच्या आहारावर करण्यात यावा. २) एका आयाने किमान पाच मुलांचा सांभाळ करणे आवश्यक आहे. त्यासाठी तिला किमान रु.६००/- प्रति महिना मानधन देण्यात यावे. ३) प्रतिदिवस प्रतिमूल रु.२ ते ५/- पर्यंत आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार पालकांनी द्यावा. ४) पाळणाघर दररोज किमान ८ (आठ) तास सुरु असावे. ५) पाळणाघराच्याबरोबर संडास/बाथरुम तसेच पाण्याची सोय असावी. ६) पाळणाघरासाठी जागा ग्रामपंचायतीनी द्यावी. तसेच स्टोव्ह, गादी, भांडी इ.साहित्य महिला संस्थांनी उपलब्ध करुन द्यावे.

**६) महिलांना कायदेशीर/विधिविषयक सल्ला देणे** :- बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. तसेच महिलांसबंधी विविध कायद्यांची कल्पना नसते. विशेषतः हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे व यासाठी या विषयाबाबत कुशल वकीलाची नेमणूक करण्यात यावी. तसेच चांगल्या वकीलाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समिती असावी व यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनीयर जे.एफ.एम.सी. (ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट) इ.अधिकारी असावेत, जेणेकरुन फक्त चांगल्या वकीलांची निवड होईल.

**७) किशोरवयीन मुलींना व मुलांना लैंगिक शिक्षण, जेंडर (gender) प्रशिक्षण व जीवनकौशल्याचे प्रशिक्षण देणे** :- किशोरवयीन मुलांना व मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु लैंगिक व विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे.

**या प्रशिक्षणात मुलींसाठी साधारणतः खालील बाबींचा समावेश असावा** :-

अ) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्र व उद्देश

ब) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.

क) स्त्रियांच्या मासिक पाळीसंदर्भातील गैरसमज. उदा.मासिक पाळीच्या काळात स्त्रिया अशुध्द असतात आणि त्यांना इतरांपासून व स्वयंपाकघरापासून वेगळे ठेवणे.

ड) गर्भधारणेचे शास्त्र, सर्वसाधारणपणे कुटुंबनियोजनाची साधने.

ढ) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.

फ) लैंगिक छळ, त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थितीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.

भ) एडस् नियंत्रण.

यासंदर्भात आरोग्य संचालनालय, केईएम रुग्णालय तसेच मुंबई महानगरपालिकेने चांगले मार्गदर्शक पुस्तक प्रसिध्द केले आहे. त्याच प्रकारच्या पुस्तिका तयार करुन वापरणे, मुलांसाठी स्वतंत्र विषयक निश्चित करावे. उदा. शरीरशास्त्र, विकास, एडस्, मुली/स्त्रियांबरोबर कसे वागावे, लैंगिक रोगांबद्दल गैरसमज व अंधश्रध्दा इ.

**<u>८. महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-</u>** कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड अनु.क्र.६ मधील योजनेत अंतर्भूत केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वतःची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वतः कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. समुपदेशकाचे व सल्लागाराचे मानधन जास्तीत जास्त साधारणपणे दरमहा रु.८०००/- पर्यंत असावे. तथापि स्थानिक दराप्रमाणे मानधन ठरवावे. याशिवाय कार्यालयीन / प्रशासकीय आवर्ती मासिक खर्चासाठी जिल्हा परिषदा यांनी स्वतः मर्यादा निश्चित करावी व त्याप्रमाणे अनुदान देण्यात यावे. तसेच वस्तू साहित्य खरेदीवर एकूण योजनेवरील खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करण्यात येऊ नये.

**९. सामुहिक विवाह :-** हुंडापध्दतीला आळा घालण्यासाठी कमीतकमी खर्चात कोणत्याही इच्छुक मुलामुलींसाठी सामुहिक विवाह आयोजित करण्यात यावेत व यात प्रति दांपत्य रु.५०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा. विशेषत: गरीब कुटुंब, कर्जात बुडालेला शेतकरी, भूमिहीन शेतमजूर अशा प्रकारच्या कुटुंबांना या योजनेचा लाभ द्यावा.

**१०. तालुकास्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-** ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणा-या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षांपूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

**११. कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार :-** ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाडयांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, अंडी, फळे, गूळ, शेंगदाणे, इ. वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा.

**१२. अंगणवाडयांना साहित्य पुरविणे :-** एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडयांना लागणा-या साहित्याची खरेदी, जी नियमित योजनेखाली खरेदी करणे शक्य होणार नाही, अशा वस्तूंवर महिला व बाल कल्याण समितीने खर्च करावा. तथापि, ज्या अंगणवाडया समिती स्वत:च्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वत:च्या निधीमधून करावा.

अंगणवाडी साहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया विहित पध्दतीने दरवर्षी एप्रिल महिन्यापासूनच सुरु करावी. यामुळे अंगणवाडयांना वेळेवर आवश्यक साहित्यपुरवठा होऊ शकेल.

**<u>१३. अंगणवाडीतील बालकांसाठी जंतनाशन कार्यक्रम :-</u>** अंगणवाडीतील बालकांना जंताचा प्रादुर्भाव आल्याचे दिसून येत आहे. परिणामी बालकांचे वजन न वाढणे व कुपोषणाचे प्रमाण वाढत जाणे. अंगणवाडयांना शासनामार्फत जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात येतो. तथापि नियमितपणे दर सहा महिन्यांनी बालकांचे जंतनाशन (डिवार्मिंग) करणे आवश्यक असल्याने ज्या भागात अंगणवाडयांना जंतनाशक गोळयांची कमतरता भासेल, अशा ठिकाणी जंतनाशक गोळयांचा पुरवठा करण्यात यावा. जंतनाशनाची औषधे दर सहा महिन्यांनी म्हणजेच १४ नोव्हेंबर (बालदिन) व १ मे (महाराष्ट्र दिन) या दिवशी अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत देण्यात यावीत.

**<u>१४. कुपोषण कमी करण्यासाठी परसबाग तयार करणे :-</u>** ग्रामीण / आदिवासी भागात फळे, पालेभाज्या, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्या यांचा आहारात दररोज वापर होत नसल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषणाचे प्रमाण जास्त असेल त्या भागात बालकांना / गर्भवती स्त्रिया / स्तनदा माता यांना आहारात दररोज भाज्या उपलब्ध होण्यासाठी परसबाग तयार करण्यात यावी. या योजनेमध्ये परसबाग तयार करण्यासाठी बीज देण्यात यावे. तसेच अंगणवाडी सेविका / आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत बीजाची वाढ, संगोपन याबाबत कुटुंबकर्त्यास ज्ञान देण्यात यावे. परसबाग लावण्यासाठी सांडपाण्याचा उपयोग करण्यात यावा.

**<u>१५. अर्भकांसाठी हायपोथर्मिया प्रतिबंध किट देणे :-</u>** ग्रामीण/आदिवासी भागात अर्भकास (एक वर्षापर्यंतच्या) बाळास जन्मानंतर काही दिवस कडे घातले जात नाही अथवा जमिनीवर झोपविले जाते. त्यामुळे बाळाचे तपमान कमी होते. नंतरच्या काळात बाळाने लघवी/संडास केल्यानंतर ओले होणारे कपडे न बदलल्याने शरीराचे तपमान कमी होऊन मुले आजारी पडतात/कुपोषित होतात. या बाबी टाळण्यासाठी बाळाच्या वापरासाठी हायपोथर्मिया प्रतिबंधक किट उपलब्ध करुन देण्यात यावी. या किटमध्ये मच्छरदाणी, मिनी वुलन ब्लँकेट (3"x4"),

सुती कपडे (नॅपकिन) (4"x3") चे चार संच इ. वस्तूंचा समावेश असावा. त्या किटमधील वस्तूंचा वापर करण्याबाबत गर्भवती स्त्रिया/ संगोपनकर्त्यास प्रशिक्षण देण्यात यावे.

**१६. गरोदर स्त्रिया / स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठ पुरविणे :-** ग्रामीण / आदिवासी भागात दैनंदिन आहारात आयोडीनयुक्त मीठाचा वापर होत नसल्याने गलगंड सारखे गंभीर आजार उद्‌भवतात. अशा रोगांवर प्रतिबंध करण्यासाठी गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांना आयोडीनयुक्त मीठाचा पुरवठा करण्यात यावा.

**१७. बारावी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणे :-**सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १२ वी पास मुलींना MS-CIT अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

उपरोक्त योजनांखालील प्रशिक्षक, समुपदेशक, स्वयंसेवी संस्था इ.ची निवड करताना अनुक्रमांक '६' येथील योजनेप्रमाणे निवड समिती गठित करण्यात यावी. तसेच **वस्तू व साहित्य खरेदीवर योजनेच्या एकूण खर्चाच्या ३०% पेक्षा जास्त खर्च करु नये.** जेणेकरुन जास्त भर प्रशिक्षणाच्या योजनांवर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक **20060629153623001** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनील चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,

(कृ.मा.प.)

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संचालक, महिला व बालविकास, पुणे,
संचालक, एकात्मिक बालविकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मुख्यमंत्र्यांचे सचिवालय,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
ग्राम विकास व जलसंधारण विभागाची सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

**महानगरपालिका व नगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग.
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.२५५/०५/नवि-२०
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक ८ नोव्हेंबर , २०१०

**वाचा :** १) नगर विकास विभाग, शासन पत्र क्र. जीईएन- १०९३/३२५/प्र.क्र.२४/नवि-३२, दि. १७ एप्रिल, १९९३.

२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/११९८/नवि-१४, दिनांक १४ जुलै, १९९३.

३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६

**प्रस्तावना :-**

शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीमुळे प्रत्येक "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच "क" वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल, अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन /३२५/प्र.क्र.२४/३२,दिनांक १७ एप्रिल, १९९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत. सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये कालमानानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, वगळणे आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालकं यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/कार्यक्रमांमध्ये बदल/सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संकीर्ण २००५/प्र.क्र.१५६/०५/नांव-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६ या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या योजना /कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने

राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना/ कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी महिला व बालकल्याण यासाठी राखीव ५% तरतूदीतून खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

**शासन निर्णय:-** महिला व बालकल्याण यासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून खालील बाबींवर खर्च करण्यात यावा:

१. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाडयाने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये ICDS योजनेसाठी रु.१/- दरमहा नाममात्र भाडयावर उपलब्ध करुन देणे.
२. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक/शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.
३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.
४. मुलांकरीता पोषक आहार पुरविणे.
५. ०-३ वर्षाच्या मुलांकरीता Creche किंवा Day care centre बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणा-या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.
६. गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विदयार्थी व अंगणवाडर विदयार्थी यांची वैदयकीय तपासणी व औषधोपचार करणे.
७. मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे.
८. महिलांसाठी प्रसुतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.
९. मुलींना/महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
१०. काम करणा-या महिलांसाठी वसतिगृह बांधणे.
११. शिकणा-या मुलींसाठी वसतिगृह बांधणे.
१२. पोलीओग्रस्त किंवा अपंग मुलांना Prosthetic aids पुरविणे.
१३. महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, helpline चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.
१४. BPL खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थितीत भत्ता देणे.
१५. मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे.

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करुन राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना रहातील. तथापि नगरपरिषद/ नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रु. १० लाख प्रति योजना या आर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार रहातील. रु. १०

लाखाच्या वर एखादया योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास , पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रु.१० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांना रहातील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटींमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

आयुक्त; महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायती यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी व या योजनांवर करण्यांत येणा-या खर्चाची माहिती महिला व बाल विकास विभागास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.शि.घाटगे )
कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन

प्रति,
सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी,मुंबई - २५
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती (सर्व)
विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती, नांव-२०

--------

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०/२००१/६६/ प्र.क्र.२२/ नवि -२७
मंत्रालय -४०० ०३२. दिनांक २२ नोव्हेंबर २००१

शासन परिपत्रक

शासनाने महिला धोरण,२००१ जारी केले असून यामध्ये महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांची आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती तसेच सन २००२-०३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रीभूत मानून नियोजन केले जाईल या बाबींचा महिला धोरणात समावेश आहे. त्याच बरोबर विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना, तसेच त्यांची कार्यक्षमता, कौशल्य वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य दिले जाईल, ही बाब समाविष्ट आहे.

०२. शासनाच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने नगरपरिषदा/ महानगरपालिका यांना कळविण्यात येते की, नगरपरिषदांनी / महानगरपालिकांनी शहरी सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांची स्थापना वाढविण्याच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यात यावे, यामध्ये आदिवासी महिला, मागासवर्गीय, आपद्ग्रस्त आणि शहरी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. यासाठी महिला व त्यांच्या गटांसाठी नगरपरिषदा व महानगरपालिकांमार्फत निर्माण करण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलातील वितरीत होणाऱ्या गाळ्यांपैकी ३०% गाळे महिलांच्या स्वयंसहाय्यीत गटासाठी राखून ठेवण्यात यावे व त्याचे वाटप संबंधित गटात होईल याची दक्षता घेण्यात यावी. असे गाळे वाटप करताना गाळे बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम मोबदला स्वरूपात ना नफा ना तोटा या तत्वात घेवून गाळे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

रामानंद तिवारी
प्रधान सचिव



४६९-१४

**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : झेडपीए २०१०/अनौसंक्र ३३/प्र.क्र.१६८/पंरा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १० मार्च, २०११.**

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक : झेडपीए १००७/४५४/प्र.क्र.५१/पंरा-१**
**दिनांक : १९ डिसेंबर, २००७.**

**शासन निर्णय :-**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदभांधीन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाहय झाल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांनी खालील योजना सक्षमपणे राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

***गट" अ" - प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना***

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

शासकीय किंवा अशासकीय संस्थांमार्फत काही तांत्रिक / व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. अशा संस्थांमधून खालील प्रकारच्या प्रशिक्षणासाठी योजना राबवाव्यात. उदा.व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, गवंडी, सुतारकाम, प्लंबर प्रशिक्षण, घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती ( टी.व्ही., रेडिओ, म्युझिक सिस्टीम दुरुस्ती, मिक्सर, इस्त्री, टोस्टर, मोबाईल व संगणक दुरुस्ती,) वाहन दुरुस्ती, सौंदर्यप्रसाधनांचे प्रशिक्षण, केटरींग, बेकींग, विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, घरगुती कामकाजाचे प्रशिक्षण (Full time domestic help), शासकीय व ड्रायव्हर व कंडक्टर, रिसेप्शनिस्ट, लघुलेखन/ टंकलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, वृध्दांची देखभाल, लहान मुलांची देखभाल, फिजिओथेरपी प्रशिक्षण, फुडप्रोसेसिंग, पॅकेजिंग, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस (कचऱ्यापासून खतनिर्मिती गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन), रोपवाटीका तसेच शोभिवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री, या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु.५०००/- पर्यंत प्रशिक्षणाचे शुल्क (Fees) भरण्याची तरतूद

राहील. प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्याने स्वतः भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा असावा. शुल्क भरण्याचे नियम व प्रक्रिया संबंधित जिल्हा परिषदांनी ठरवावी.

**२) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :-**

या योजनेमध्ये मुलींना कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही वयोगटातील परंतु आर्थिकदृष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. सदर प्रशिक्षण किमान तीन महिन्यांचे असावे. ते शाळा व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजित करण्यात यावे. या योजनेतून प्रशिक्षकाच्या मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी रु.३००/- प्रतिमहापर्यंत खर्च करण्यात यावा.

**३) महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे :-**

कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. यासाठी समुपदेशक व सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करण्यात यावा. समुपदेशक व सल्लागाराची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सिनिअर जे.एफ.एम.सी. (ज्युडीसियल मॅजेस्ट्रेट) इ. अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत करण्यात येईल. सदर योजना महाविद्यालय / तज्ज्ञांच्या संस्थांमार्फत राबवावी. उदा. ज्या संस्थांकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनासाठी आवश्यक मनुष्यबळ, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील. सध्या देण्यात आलेल्या सुविधा व समुपदेशन यांचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्यास असे प्रस्तावही मंजूर करण्यात यावेत. मात्र यासाठी संस्थेकडे स्वतःची जागा असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी स्वतः कार्यालयीन फर्निचर व इतर अनावर्ती खर्चाची व्यवस्था करावी. तालुका आणि जिल्हा पातळीवर काम करणाऱ्या समुपदेशकाला रु. ९०००/- इतके मानधन देण्यात यावे. काही जिल्हा परिषदांमध्ये व पंचायत समित्यांमध्ये यापूर्वीच समुपदेशन केन्द्र चालविण्यात येत आहेत. मात्र तेथे समुपदेशकाला अत्यल्प मानधन मिळत असल्यामुळे सदर केन्द्रे व्यवस्थितपणे चालत नाहीत. तर अशा समुपदेशन केन्द्रांचे बळकटीकरण करण्यात यावे व तेथे समुपदेशकाला वरीलप्रमाणे वाढीव मानधन देण्यात यावे.

**४) तालुकास्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-**

ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ वी ते १२ वी वर्गापर्यंत शिकणा-या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वतःच्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा किंवा ज्युनिअर कॉलेज असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. यामुळे १८ वर्षांपूर्वी लग्न न करण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांना प्रवृत्त करता येईल. या योजनेखाली वसतीगृह इमारतींचे बांधकाम न करता, भाडयावर इमारत/घर/फ्लॅट घेण्यात यावेत. सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. त्याशिवाय लाभार्थीकडून कोणतीही फी घेऊ नये. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा जिल्हा परिषदांनी निश्चित करावी, पण ती रु.५००/- प्रति लाभार्थी प्रति माह (भाडे वगळून) यापेक्षा जास्त नसावी.

**५) दहावी व बारावी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे :-**

सध्या शासकीय/निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.संगणकाबाबतचे ज्ञान तसेच संगणक चालविण्याचे कौशल्य प्राप्त करण्यासाठी १० वी व १२ वी पास मुलींना MS-CIT व समकक्ष अभ्यासक्रम उदा. डाटा एंट्री ऑपरेटर प्रशिक्षण देण्याची योजना यामुळे

उपयुक्त राहील. त्याप्रमाणे एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेला फी देऊन त्याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

**६) आर्थिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलामुलींसाठी पाळणाघर :-**

नोकरी करणाऱ्या किंवा शेतावर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघर (Day Care Centre) उपलब्ध करुन देण्यात यावे. पाळणाघर संध्याकाळी ६.०० वाजपर्यंत किंवा स्थानिक गरजेनुसार सुरु ठेवावे. सदर पाळणाघर चालविण्यासाठी जिल्हा परिषदेने योग्य महिला बचत गटाची किंवा स्वयंसेवी संस्थेची निवड करावी. लाभार्थ्यांची निवड माता समिती किंवा ग्रामपंचायतीने करावी. या योजनेखाली पाळणाघर चालविणा-या महिलांचे मासिक मानधन व इमारतीचे भाडे अशा बाबींवर खर्च करण्यात यावा.

**७) किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटूंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देणे :-**

किशोरवयीन मुलींना शाळेत सर्वसाधारण शिक्षण देण्यात येते. परंतु विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे की, त्यामुळे त्यांना काही मानसिक व सामाजिक, मनोवैज्ञानिक अडचणींना तोंड द्यावे लागते. याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ज्ञ/स्वयंसेवी संस्थांमार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. उदा. शाळेत / महाविद्यालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला एक वर्ग (तसेच मुलांसाठी स्वतंत्र वर्ग) भरविण्यात यावेत. प्रत्येक वर्ग १ ते २ तासांचा असावा. बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे. त्यांना प्रत्येक सत्रासाठी साधारणपणे रु.२०० ते ४०० मानधन देण्यात यावे. लहान बालकांना विशेषतः मुलींना लैंगिक हिंसाचारापासून वाचविण्यासाठी समितीने विशेष प्रयत्न करावेत.

**८) महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे :-**

बहुतेक मुलींना व महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांबद्दल माहिती नसते. विशेषतः हुंडाविषयक कायदे, स्त्रीधन, मालमत्ता अधिकार, वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, पोटगीविषयक कायदे, बलात्कारविषयक कायद्यातील तरतूदी, लग्नानंतरचे अधिकार. त्यामुळे सदर विषयावर महाविद्यालय व इतर ठिकाणी मुली व महिलांसाठी लेक्चर ठेवण्यात यावे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग तसेच UNFPA (United Nation Population Fund) मार्फत सदर प्रशिक्षण वर्ग आयोजित करता येतील, व प्रती प्रशिक्षण वर्ग प्रशिक्षकाला रु. ५००/- पर्यंत मानधन द्यावे. यासाठी तालुका स्तरावरील मोफत कायदेविषयक सल्लागार समिती किंवा विधी सेवा समिती यांचेही मार्गदर्शन घ्यावे.

महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करावे. एका शिबिरासाठी रु. २०००/- पर्यत खर्च करण्यात यावा.

**९) अंगणवाडयांसाठी स्वतंत्र इमारत/ भाडे :-**

ज्या ठिकाणी अंगणवाडीसाठी स्वतंत्र शासकीय इमारत नाही तेथे खाजगी इमारतीत अंगणवाड्या चालविण्यासाठी आवश्यकतेनुसार भाडयाची तरतुद करण्यात यावी. तसेच अंगणवाड्यामध्ये शौचालये बाधण्यासाठी निधीची तरतुद करण्यात,यावी.

नवीन अंगणवाडीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्याची मर्यादा रु. ४ लक्ष ठेवावी.

१०) **महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींचे जिल्हा व जिल्ह्याबाहेर पंचायत राज, आदर्श गाव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व बाल विकासाचे उपक्रम इत्यादी विषयांची माहिती घेण्यासाठी अभ्यास सहलीचे आयोजन करावे. प्रतिवर्षी अशा प्रकारे किती अभ्यास सहली आयोजित कराव्यात याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी प्रतिवर्ष एकूण रु. ५.०० लक्षाची कमाल मर्यादा विहित करण्यात येत आहे.

११) **पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण**

पंचायत राज संस्थामधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिधींना कामकाजाचे प्रशिक्षण देण्यासाठी पंचायत महिला शक्ती अभियान २००७ सालापासून राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत प्रशिक्षणासाठी तरतुद केलेल्या निधी व्यतिरिक्त जादा लागणारा निधी आवश्यकतेनुसार समितीकडून खर्च करण्यात यावा.

१२) **आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार :-**

अंगणवाडी व बालवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांना समितीस स्वतःच्या निधीमधून पुरस्कार देता येईल व उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकांची निवड तसेच पुरस्काराची रक्कम किती असावी, याबद्दल जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे. योजनेवर जास्तीत जास्त रु. २ लक्ष खर्च करण्यात यावा.

***गट "ब" च्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना)***

१३) **कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार :-**

राज्याच्या ग्रामीण / आदिवासी भागातील मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित मुलांना अंगणवाड्यांमार्फत दुप्पट आहार दिला जातो. तथापि कुपोषण कमी करण्यासाठी तो पुरेसा नसल्याने कुपोषित मुलांना अंगणवाडीत पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त विशेष आहार म्हणून अंगणवाडीतील मुले व किशोरवयीन मुलांना Micronutrient Supplementation Syrup यांचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दूध, सोयादूध (टेट्रापॅक), चिक्की, लाडू, अंडी, फळे (केळी), गूळ, शेंगदाणे, या वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा. गरोदर व स्तनदा मातांना अतिरिक्त पौष्टीक व प्रथिनेयुक्त आहार द्यावा, जेणेकरुन त्यांच्यात रक्ताक्षयाचे प्रमाण कमी होईल, व जन्माचे वेळेला नवजात मुलाचे वजन किमान २.५ किलो राहील.

१४) **अंगणवाडी / बालवाडींना साहित्य पुरविणे :-**

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडींना साहित्य मिळाले नसल्यास त्या साहित्याची बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी गरज असल्यास साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. तथापि, ज्या अंगणवाड्या / बालवाड्या समिती स्वतःच्या निधीमधून चालविल, त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा. सदर साहित्यामध्ये वजनकाटे व जलशुध्दीकरण यंत्र याचा समावेश करावा. तसेच वेगवेगळया प्रकारची खेळणी व शैक्षणिक तक्ते हे एकात्मिक बालविकास सेवेकडून पुरविण्यात येत असतात, म्हणून ते पुरवू नये.

१५) **महिलांना साहित्य पुरविणे :-**

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील महिलांना स्वयंरोजगारासाठी तसेच इंधनाची बचत करण्यासाठी खालील साहित्यांचा पुरवठा करण्यात यावा. मसाला पल्वलायझर मशिन, पत्रावळी मशिन , शेवया मशिन, पिठाची गिरणी हे साहित्य पुरवावे. इंधनाची बचत होणेचे दृष्टीने तसेच महिलांना धुराचा त्रास होवू नये म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुलींचा वापर ही काळाची गरज आहे म्हणून सुधारित चुली /निर्धुर चुली पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना सौर कंदील आणि सोलर कुकर पुरविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. वरील सर्व वस्तू वाटप करताना प्रति महिला जास्तीतजास्त रु. १०.०००/- खर्च करण्यात यावा तसेच प्रत्येक लाभार्थीचा १०% सहभाग घेण्यात यावा.

गट "ब" च्या वरील योजनांवर, म्हणजे वस्तु व साहित्य खरेदीवर एकूण खर्चाच्या ३० टक्के पेक्षा जास्त खर्च करु नये. म्हणजे गट "अ" च्या योजनांवर जास्त भर द्यावा, व त्यावर किमान ७०% खर्च करण्यात यावा. एकूण खर्चाच्या ३ टक्के रक्कम अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३१५२०१४३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व) ( मु. का.अ. यांचे मार्फत )
२) मा. विधान परिषद/ मा. विधान सभा सदस्य (सर्व)
१) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२) विभागीय आयुक्त (सर्व).
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ४११ ००१..
७) संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
९) मुख्यमंत्र्यांचे सचिवालय.
१०) मा. मंत्री (ग्रा. वि.) यांचे खाजगी सचिव.
११) मा. राज्यमंत्री (ग्रा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक.
१२) निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत,**

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र.४१५ /का-२
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २५.५.२००१

**निर्णय** :- शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा दि.१ एप्रिल,१९९४ पासून राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सदर ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत परिशीष्ठ-१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून महिलांच्या ३०% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी महिलांच्या ३०% आरक्षणासंदर्भात करण्यात आलेली कार्यवाही ही परिशिष्ट-१ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

## (एक) आरक्षणाची व्याप्ती, अटी व शर्ती

(१) शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्था यांच्या सेवेत नियुक्तीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत.

(२) महिलांच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या पदापैकी त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

(३) महिलांचे आरक्षण हे समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्रक्र.३१/९८/१६-अ, दि.१६.३.९९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.( प्रत सोबत जोडली आहे) सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

(४) महिलांसाठी विहीत करण्यात आलेले सदर ३०% आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(५) महिला आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे ते आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत महिला आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या, सामाजिक आरक्षण/उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क) (ड), वि.मा.प्र., इमाव, आणि खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

(६) महिलांसाठीचे सदर आरक्षण हे मागासवर्गीयांचे आरक्षण ज्या ज्या ठिकाणी लागू आहे त्या सर्व ठिकाणी लागू राहील.

(७) भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

(८) महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(९) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) खुल्या प्रवर्गातील ज्या व्यक्तीचे /कुटुंबाचे सर्व मार्गांनी येणारे एकूण आर्थिक उत्पन्न सलगच्या मागील तीन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी रु.दोन लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल ती व्यक्ती/कुटुंब उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट म्हणून संबोधण्यात येईल. या संदर्भातील कुटुंबाच्या व्याख्येमध्ये विवाहीत महिलेच्या बाबतीत पती,पत्नी व मुले यांचा समावेश राहील. आणि अविवाहीत मुलीच्या संदर्भात आई, वडील व अविवाहीत भावंडे यांचा समावेश राहील.

(११) इतर मागावर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले निकष व अटी लागू राहतील.

(१२) सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत इतर मागासवर्गासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) बाबतची उत्पन्न मर्यादा वाढविल्यास सदर वाढीव उत्पन्न मर्यादा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आपोआप लागू राहील

(१३) मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग यांना सेवा भरतीसाठी जे सेवाभरती नियम, अटी व शर्ती लागू आहेत तेच सेवाभरती नियम, अटी व शर्ती त्या त्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या आरक्षणाबाबतही लागू राहतील.

(१४) महिला आरक्षणाच्या अमलबजावणीचे सनियंत्रण महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात यावे.

(१५) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

## (दोन) प्रमाणपत्रे

### (अ) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र व त्याची तपासणी

(१) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतचा अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना परिशीष्ट २ व ३ म्हणून सोबत जोडला आहे.

(२) वरील प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यात येईल त्यांची प्रमाणपत्रे तपासण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्याकडून महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता ज्या महिलांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी /कार्यालयांनी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे तपासणीसाठी पाठवावा.

(४) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी सदर प्रमाणपत्र या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार आहे किंवा नाही हे तपासावे. तसेच, सदर प्रमाणपत्राच्या पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने या शासन निर्णयातील परिशीष्ट-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळण्याकरिता जी माहिती सादर केली असेल ती माहिती मूळ कागदपत्रांवरून तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून तपासून घ्यावी. व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयांना परत पाठवावे.

(५) जर एखादया प्रमाणपत्राबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना शंका असल्यास त्यांनी याबाबतचा सविस्तर तपशील आपल्या अहवालात नमूद करावा.

(६) ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी तपासून प्रमाणित केली असतील त्या उमेदवारांची महिलांच्या आरक्षित पदावर नेमणूक करण्यास हरकत नाही.

(७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल एक महिन्यात संबंधित कार्यालयांना पाठवावा.

(८) आयुक्तांचा अहवाल एक महिन्यात प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयांनी प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी.

(९) ज्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांबाबत शंका उपस्थित झाली असेल अशा उमेदवारांच्याबाबतीत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांसह संबंधित जिल्हा दंडाधिकारी यांना अ.शा. शासकीय पत्राद्वारे कळवावे व त्यांचा अहवाल ठराविक कालमर्यादेत मागवावा.

(१०) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी उपस्थित केलेल्या शंका संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना मान्य असल्यास त्यांनी संबंधित प्रमाणपत्र रद्द करावे.

### (ब) मागासवर्गीय उमेदवारांची प्रमाणपत्रे व त्यांची तपासणी

(१) अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यामधील महिलांनी त्यांच्या प्रवर्गातील महिला आरक्षणाच्या लाभाकरिता त्या त्या प्रवर्गात मोडत असल्याचे प्रमाणपत्र आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सादर करणे आवश्यक राहील व सदर प्रमाणपत्रे तपासण्याबाबत आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांनी जी कार्यपध्दती विहीत केली आहे तीच कार्यपध्दती अंमलात राहील.

### (क) मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर नियुक्ती झाल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे व त्याची तपासणी

(१) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरीता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील.

(अ) अशा महिला उमेदवारांनी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहीत केल्याप्रमाणे त्यांच्या

संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करावीत व ती त्या विभागानी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार तपासून घ्यावीत. अशा महिला उमेदवारांकडून खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

(ब) ज्या त्यांच्या संबंधित जातीचे प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसतील किंवा सादर करु शकत नसतील अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ३ नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) या शासन निर्णयाच्या परीशिष्ट-२ नुसार संबंधित तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे क्रिमीलेअरच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.

(२) वर नमूद केलेल्या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास, तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गाप्रमाणेच उन्नत व्यक्ति/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.

(३) हे प्रमाणपत्र देण्यासाठी तहसिलदार व नायब तहसिलदार यांना सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. याबाबतच्या अर्जाचा नमुना व प्रमाणपत्राचा नमुना या शासन निर्णयाच्या परिशिष्ठ २ व ३ प्रमाणे राहील.

(४) वरील प्रमाणपत्र तपासण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद (दोन) (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(तीन) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(चार) हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. २९/१६-अ, दि. ३.४.२००१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(चंद्रसेन तुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
सर्व जिल्हा, महिला व बाल विकास अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व तहसिलदार/नायब तहसिलदार
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
सर्व शासन अनुदानित संस्था
निवड नस्ती का-२
- [illegible]

मप्रमु-२०८३ (३१) (१०८७-५-०१)-२

# परिशिष्ट - “ क ” बैठकीची उपस्थिती

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट,२०१५**

**स्थळ : यवतमाळ, जिल्हा परिषद**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

**जिल्हापरिषद, यवतमाळ**

(१) डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ. शरद कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजेंद्र भोयर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(४) श्री. व्ही. के. मरसाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण विभाग)

(५) श्री. सुरेश शहापूरकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्रीमती ए. आर. इंगोले, जिल्हा महिला बालविकास अधिकारी

(७) श्रीमती जे. व्ही. राऊत, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(८) श्री. चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी, माध्यमिक

(९) डॉ. सुचिता पाटेकर, शिक्षणाधिकारी, प्राथमिक

(१०) डॉ. दिलीप सोनकुसळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(११) श्री. जे. आर. राठोड, कृषी विकास अधिकारी

(१२) डॉ. रंजन वानखेडे, जिल्हा सनियंत्रण अधिकारी, माविम

(१३) श्री. वि. वा.अहिरराव, कार्यकारी अभियंता

(१४) श्री. के. आर. गाडेकर, कार्यकारी अभियंता

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०१५**

**स्थळ : अमरावती महानगरपालिका**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(४) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

**महानगरपालिका, अमरावती**

(१) श्री. चंद्रकांत गुडेवार, आयुक्त

(२) श्री. आर. बी. ओगले, सहायक आयुक्त

(३) श्री. एन. एस. वानखेडे, महिला बालविकास अधिकारी

(४) श्री. एस. डी. गोसावी, मुख्य लेखाधिकारी

(५) डॉ. श्याम सोनी, वैद्यकीय अधिकारी

(६) श्री. महेश देशमुख, पर्यावरण अधिकारी

(७) श्रीमती वंदना गुल्हाने, सहायक प्रकल्प अधिकारी

(८) श्रीमती प्रिया तेलकुंटे, मुख्य लेखापरिक्षक

(९) श्री. पी. बी. ठाकरे, प्रभारी क्रीडा अधिकारी,

(१०) श्रीमती मिनाक्षी शेंडे, सहायक सनियंत्रण अधिकारी

(११) श्री. खुशाल राठोड, जिल्हा समन्वय अधिकारी

(१२) श्री. बी. के. तिरपुडे, उप अभियंता

(१३) श्री. पी. एम. येवनीकर, उद्यान निरीक्षक

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५**

**स्थळ : अकोला जिल्हापरिषद**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स.

(३) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(४) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

**जिल्हापरिषद, अकोला**

(१) श्री. एम. देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. एस. एम. कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)

(३) श्रीमती मा. पं. केदार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

(४) डॉ. एम. एस. तुपकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(५) श्री. व्ही. एल. कुंभारे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(६) डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. अ. ज. सोनवणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

(८) श्री. पी. एम. मुकुंद, शिक्षणाधिकारी (नि.शि.)

(९) श्री. एच. जी. ममदे, कृषी विकास अधिकारी

(१०) श्री. एस. ओ. जटाळे, वरिष्ठ लेखा अधिकारी

(११) श्री. आर. एम. चंदन, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**मंगळवार, दिनांक ३० मे, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(३) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(४) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

**विभागीय सचिव**

(१) श्री. रजनिश सेठ, प्रधान सचिव, गृह विभाग

(२) श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, वित्त विभाग

(४) श्री. मनिष वर्मा, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(५) श्री. ज. ना. पाटील, सह सचिव, नगरविकास विभाग

(६) श्री. बाजीराव जाधव, सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(७) श्रीमती विनिता सिंगल, सचिव, महिला व बाल विकास विभाग

(८) संजय दुसाने, सह संचालक, न.प.प्रशासन

९) श्री. आर. जी. कुलकर्णी, आयुक्त , सार्वजनिक आरोग्य विभाग

(१०) डॉ. जगदीश पाटील, सहकार आयुक्त , महाराष्ट्र राज्य

(११) श्री. व्यंकटेश भट, उप सचिव, गृह विभाग

(१२) श्री. गिरिष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१३) श्री. मनोहर ठोंबरे, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(१४) श्री. अनिल परशुरामे, उप सचिव, महिला व बालविकास विभाग

(१५) श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बाल विकास विभाग

**अमरावती महानगरपालिका**

(१) श्री. हेमंतकुमार पवार, आयुक्त , महानगरपालिका, अमरावती.

**यवतमाळ जिल्हापरिषद**

(१) श्री. दिपक सिंगल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, यवतमाळ

(२) डॉ. के. झेड. राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ

(३) डॉ. सुचिता पाटेकर, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि. यवतमाळ

**अकोला जिल्हापरिषद**

(१) श्री. गिरीश करोदे, अप्पर आयुक्त , अकोला

(२) श्री. सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अकोला

(३) श्री. अनंत वैद्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अकोला

(४) श्री. एम. राज कुमार, पोलीस अधीक्षक

(५) श्री. एस. पी. सोनकुसरे, महिला व बालविकास अधिकारी, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

**महिलांचे हक्क व कल्याण समिति**

**बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७**

**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

(१) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.तथासमितीप्रमुख

(२) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(३) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.

(४) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(५) श्रीमती सुमन पाटील, वि.स.स.

(६) ॲड. हुस्नबानु खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती प्रियांका कांदळगावकर, कक्ष अधिकारी

**विभागीय सचिव**

(१) श्रीमती एम.निलीमा केरकेट्टा, सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय विभाग

(३) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(४) श्री. र. प. आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग

(५) श्री. टि. वा. करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(६) श्री. स. ज. मोघे, उप सचिव, नगरविकास विभाग

(७) श्री. अंजिक्य बगाडे, अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग

**क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी**

(१) श्री.सं. ज. सुंरजे, सहायक आयुक्त , मा व क अमरावती

(२) श्री. डी. डी. ढेरे, मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद

(३) श्री. अमोल यावलीकर, सहा.आयुक्त , समाज कल्याण, अकोला

(४) श्री. जी. के. आरवेल, जिल्हा परिविक्षा अधिकारी, अकोला

(५) श्री. आर. व्ही. जाधवर, समाजकल्याण अधिकारी, गट ब

(६) श्रीमती एल. आर. बनसोड, प्रादेशिक उपायुक्त , समाजकल्याण विभाग, अमरावती

(७) श्रीमती मीना अंबाडेकर, मुख्याध्यापक, निवासी शाळा, गोरेगाव, जि. अकोला

(८) श्रीमती अनुराधा ओक, शिक्षण उपसंचालक, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**समिती प्रमुख**

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. तथा समितीप्रमुख

**समिती सदस्य**

(१) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(२) श्रीमती तृप्ती सावंत, वि.स.स.

(३) श्रीमती अमिता चव्हाण, वि.स.स.

(४) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(५) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(६) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती प्रियांका कांदळगांवकर, कक्ष अधिकारी

समितीने उक्त बैठकीत यवतमाळ, जिल्हापरिषद, अकोला, जिल्हा परिषद व अमरावती महानगरपालिका येथे दिलेल्या भेटीच्या संदर्भात प्रारुप अहवालावर विचार विनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई